भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९

## (१८९९ चा अधिनियम क्रमांक २)

[२६ डिसेंबर १९९२ रोजी यथाविद्यमान]

# The Indian Stamp Act, 1899

## (Act No. 2 of 1899)

[*As in force on 26th December 1992*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

(१९९४)

[किंमत रु. ११.५०]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ डिसेंबर १९९२ रोजी यथाविद्यमान असलेला भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ४, अंक २, दिनांक ५ ऑगस्ट १९९३ यात पृष्ठे ११६ ते १६५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

**नवी दिल्ली,**
दिनांक ५ ऑगस्ट १९९३.

---

## PREFACE

This edition of the The Indian Stamp Act, 1899 as on the 26th December 1992 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 4, dated 5th August 1993 on pages 116 to 165.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 5th August 1993.

# भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९

## कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

कलमे प्रारंभिक


प्रास्ताविका

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.


### प्रकरण २ रे

#### मुद्रांक शुल्के

##### क.—संलेखांची शुल्कपात्रता


३. शुल्क आकारण्यास पात्र असलेले संलेख.

४. विक्री, गहाण किंवा संव्यवस्था अशा एकाच संव्यवहारात उपयोगात आणलेले अनेक संलेख.

५. अनेक वेगवेगळ्या बाबींच्या संबंधातील संलेख.

६. १ ल्या अनुसूचीमधील अनेक वर्णनांमध्ये मोडणारे संलेख.

७. सागरी विमापत्रे.

८. १८७९ चा अधिनियम क्र. ११ याखाली कर्जासाठी काढलेली बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे.

९. शुल्के कमी किंवा माफ करण्याची किंवा त्यांबाबत तडजोड करण्याची शक्ती.


##### ख.—मुद्रांक व त्यांचा वापर करण्याची पद्धती यांविषयी


१०. शुल्कांचा भरणा कसा करावयाचा.

११. चिकट मुद्रांकांचा वापर.

१२. चिकट मुद्रांक रद्द करणे.

१३. छापील मुद्रांकांनी मुद्रांकित केलेले संलेख कसे लिहावेत.

१४. त्याच मुद्रांकानिशी तो एकच तेवढा संलेख करावयाचा.

१५. कलम १३ किंवा १४ याविरुद्ध लिहिलेला संलेख अमुद्रांकित मानावयाचा.

१६. शुल्क दर्शविणे.


##### ग.—संलेखांवर मुद्रांक लावण्याच्या वेळेविषयी


१७. भारतात निष्पादित केलेले संलेख.

१८. भारताबाहेर निष्पादित केलेली विनिमयपत्रे व वचनचिठ्ठ्या सोडून अन्य संलेख.

१९. भारताबाहेर विकर्षिलेली विनिमयपत्रे आणि वचनचिठ्ठ्या.


##### घ.—शुल्कार्थ मूल्यांकनाविषयी


२०. परकीय चलनात दर्शविलेल्या रकमेचे रूपांतरण.

२१. पुंजरोखा आणि विकाऊ रोखे यांचे मूल्यांकन कसे करावयाचे.

२२. विनिमय-दर किंवा सरासरी किंमत यांबाबतच्या विधानाचा परिणाम.

२३. व्याजरक्षी संलेख.

२३क. विकाऊ रोख्यांच्या गहाणांशी संबंधित असलेले विवक्षित संलेख हे करारनामे म्हणून शुल्क-आकारणीला पात्र असणे.

२४. ऋणाच्या प्रतिफलार्थ किंवा भावी भरणा इत्यादींच्या अधीनतेने केलेल्या हस्तांतरणावर शुल्क कसे आकारावे.

२५. वार्षिकी, वगैरेच्या बाबतीत मूल्यांकन.

२६. विषयवस्तूचे मूल्य अनिश्चित असेल तेव्हा लावावयाचा मुद्रांक.

२७. ज्यांचा शुल्कावर परिणाम होतो अशी तथ्ये संलेखात मांडणे.

२८. विवक्षित अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत शुल्काला अनुलक्षून निदेश.

**ड.—शुल्क कोणी द्यावयाचे**

कलमे

२९. शुल्के कोणी द्यावयाची.

३०. विवक्षित प्रकरणी पावती देण्याचे दायित्व.

### प्रकरण ३ रे

**मुद्रांकांबाबत अभिनिर्णय**

३१. योग्य मुद्रांकाबाबत अभिनिर्णय.

३२. जिल्हाधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र.

### प्रकरण ४ थे

**रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख**

३३. संलेखांची तपासणी करणे व ते अवरुद्ध करून ठेवणे.

३४. अमुद्रांकित पावत्यांना अनुलक्षून विशेष उपबंध.

३५. रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख हे पुराव्यात अस्वीकारार्ह असणे, इत्यादी.

३६. संलेखाचा स्वीकार केव्हा प्रश्नास्पद करावयाचा नाही.

३७. अयोग्य रीत्या मुद्रांकित केलेले संलेख स्वीकृत करणे.

३८. अवरुद्ध करून ठेवलेल्या संलेखाच्या संबंधात काय कार्यवाही करावी.

३९. कलम ३८, पोटकलम (१) खाली दिलेली दंडाची रक्कम परत करण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.

४०. अवरुद्ध करून ठेवलेले संलेख मुद्रांकित करण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.

४१. अभावितपणे संलेख रीतसर मुद्रांकित केले न जाणे.

४२. ज्यांवर कलम ३५, ४० किंवा ४१ खाली शुल्क भरलेले असेल अशा संलेखांवर पृष्ठांकन करणे.

४३. मुद्रांक कायद्याच्या विरोधी अपराधाबद्दल खटला.

४४. शुल्क किंवा दंड भरणाऱ्या व्यक्तींना विवक्षित बाबतीत त्याची वसुली करता येईल.

४५. विवक्षित बाबतीत दंड किंवा जादा शुल्क परत करण्याची महसूल प्राधिकरणाची शक्ती.

४६. कलम ३८ खाली पाठवलेले संलेख गहाळ झाल्याबद्दल दायित्व नाही.

४७. आपणाकडे आलेली अमुद्रांकित विनिमयपत्रे व वचनचिठ्ठ्या मुद्रांकित करण्याची प्रदात्याची शक्ती.

४८. शुल्क व दंड यांची वसुली.

### प्रकरण ५ वे

**विवक्षित प्रकरणांत मुद्रांकांबाबत सवलती देणे**

४९. खराब झालेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे.

५०. कलम ४९ खाली सुटका मिळण्यासाठी अर्ज केव्हा करावयाचा.

५१. निगमांना पुढे जरूर नसलेल्या छापील नमुन्यांच्या बाबतीत सवलत.

५२. चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत.

५३. खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत कशी द्यावयाची.

५४. वापरासाठी न लागणाऱ्या मुद्रांकांबाबत सवलत.

५४क. आण्याच्या मूल्याभिधानांच्या मुद्रांकांबाबत सवलती.

५४ख. शरणार्थी सहायता मुद्रांकांबाबत सवलती.

५५. विवक्षित ऋणपत्रांचे नवीकरण केल्यावर सवलत.

### प्रकरण ६ वे

**निर्देशन आणि पुनरीक्षण**

५६. मुख्य नियंत्रक, महसूल प्राधिकरणाचे नियंत्रण व त्याच्याकडे प्रकरणाचे परिकथन पाठवणे.

५७. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाकडून उच्च न्यायालयाकडे पाठवण्यात येणारे प्रकरणाचे परिकथन.

५८. परिकथित प्रकरणासंबंधी अधिक तपशील मागविण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

५९. परिकथन केलेले प्रकरण निकालात काढण्याची कार्यपद्धती.

६०. अन्य न्यायालयांनी उच्च न्यायालयाकडे प्रकरणाचे परिकथन पाठवणे.

६१. मुद्रांकांच्या पुरेसेपणाच्या संबंधाने न्यायालयाच्या विवक्षित निर्णयांचे पुनरीक्षण.

## प्रकरण ७ वे

### फौजदारी अपराध व कार्यपद्धती

कलमे

६२. रीतसर मुद्रांकित न केलेला संलेख निष्पादित करणे, इत्यादीबद्दल दंड.

६३. चिकट मुद्रांक रद्द न करण्याबद्दल शास्ती.

६४. कलम २७ च्या उपबंधांचे अनुपालन न करण्याबद्दल शास्ती.

६५. पावती देण्याचे नाकारण्याबद्दल व पावत्यांवरील शुल्क चुकवण्यासाठी क्लृप्त्या योजण्याबद्दल शास्ती.

६६. विमापत्र करून न देण्याबद्दल किंवा रीतसर मुद्रांकित न केलेले विमापत्र तयार करण्याबद्दल शास्ती.

६७. जी विनिमयपत्रे किंवा सागरी विमापत्रे संचरूपात काढावयाचे अभिप्रेत आहे ती पूर्ण संख्येत न काढण्याबद्दल शास्ती.

६८. महसुलाची ठकवणूक करण्यासाठी विनिमयपत्र उत्तरदिनांकित करण्याबद्दल आणि अन्य हिकमतीं- बद्दल शास्ती.

६९. मुद्रांकांच्या विक्रीसंबंधीच्या नियमांचा भंग करण्याबद्दल आणि अनधिकृत विक्री करण्याबद्दल शास्ती.

७०. खटला भरणे व चालवणे.

७१. दंडाधिकाऱ्याची अधिकारिता.

७२. संपरीक्षेचे ठिकाण.

## प्रकरण ८ वे

### पूरक उपबंध

७३. तपासणीसाठी पुस्तके, वगैरे खुली असणे.

७४. मुद्रांकांच्या विक्रीसंबंधी नियम करण्याची शक्ती.

७५. सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

७६. नियमांचे प्रकाशन.

७६क. विवक्षित शक्तींचे प्रत्यायोजन.

७७. न्यायालय फीबाबत व्यावृत्ती.

७७क. विवक्षित मुद्रांकांबाबत व्यावृत्ती.

७८. अधिनियमाचा अनुवाद करून त्याची स्वस्त दराने विक्री करणे.

७९. [निरसित.]

अनुसूची १ ली.

अनुसूची २ री. [निरसित.]

शब्दसूची.

इंग्रजी—मराठी.

मराठी—इंग्रजी.

# भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९

(१८९९ चा अधिनियम क्रमांक २)[1]

[दि. २६ डिसेंबर १९९२ रोजी यथाविद्यमान]

[२७ जानेवारी, १८९९]

## प्रकरण १ ले

### प्रारंभिक

**मुद्रांकासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, मुद्रांकासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करणे समयोचित आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :— प्रास्ताविका.

१. (१) या अधिनियमास "भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

[2][(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे :

परंतु, संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील १ ल्या सूचीमधील नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांच्या संबंधातील शुल्काच्या दरांशी या अधिनियमाच्या उपबंधांचा जेथवर संबंध येत असेल तेवढी व्याप्ती वगळता, हा अधिनियम [3][१ नोव्हेंबर, १९५२ च्या लगतपूर्वी भाग ख राज्यांमध्ये समाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रांना] (जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून) लागू होणार नाही.]

(३) १ जुलै, १८९९ रोजी तो अंमलात येईल.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा—भारताचे राजपत्र १८९७, भाग पाच, पृ. १७५; प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा—भारताचे राजपत्र १८९८, भाग पाच, पृ. २३१; आणि कौन्सिलातील कामकाजवृत्ताकरिता पहा— भारताचे राजपत्र १८९८, भाग सहा, पृष्ठे १० आणि २७८ आणि भारताचे राजपत्र १८९९, भाग सहा, पृष्ठ ५.

हा अधिनियम पुढील ठिकाणी लागू करताना पुढीलप्रमाणे विशोधित करण्यात आला आहे :—

(१) मद्रास येथे पुढील मद्रास अधिनियमांद्वारे—१९२२ चा ६, १९२३ चा ६, १९४३ चा १६, १९५० चा २५, १९५८ चा १४ आणि १९६१ चा २१;

(२) मुंबई येथे पुढील मुंबई अधिनियमांद्वारे—१९२२ चा २ (अस्थायी), १९२६ चा १ व २, १९२७ चा २, १९२८ चा १, १९२९ चा १, १९३० चा १, १९३० चा १६, १९३१ चा २, १९३२ चा २ आणि १९४३ चा १४;

(३) पश्चिम बंगाल येथे पुढील बंगाल अधिनियमांद्वारे—१९२२ चा ३ आणि १९३५ चा १२;

(४) उत्तर प्रदेश येथे पुढील उत्तर प्रदेश अधिनियमांद्वारे—१९२२ चा १२, १९३२ चा ४ (अस्थायी), १९३६ चा ३, १९३८ चा १८, १९४१ चा ७, १९४३ चा ९, १९४८ चा १७, आणि १९५८ चा ४३;

(५) पंजाब येथे पुढील पंजाब अधिनियमांद्वारे—१९२२ चा ८, १९२४ चा १, १९३५ चा १, १९४९ चा इ. पी. ॲक्ट २७, १९५८ चा १३, १९५९ चा २६ व १९६० चा २१;

(६) आसाम येथे पुढील आसाम अधिनियमांद्वारे—१९२२ चा ३ (अस्थायी), १९२५ चा २ (अस्थायी), १९३६ चा १५, १९५० चा ७ आणि १९५० चा ८;

(७) बिहार येथे पुढील बिहार अधिनियमांद्वारे—१९३७ चा ६, १९३८ चा ४, १९४३ चा १० (अस्थायी) आणि १९५८ चा २ व ३;

(८) ओरिसा येथे पुढील ओरिसा अधिनियमांद्वारे—१९४१ चा ५, १९४३ चा ६, १९४५ चा २, १९४९ चा ५, १९५६ चा ८ आणि १९५८ चा १९;

(९) मध्य प्रदेश येथे पुढील मध्य प्रांत आणि वऱ्हाड अधिनियमांद्वारे—१९३९ चा ६, १९४३ चा ६, १९४४ चा १ (अस्थायी), १९४५ चा ५, १९४८ चा ५ आणि १९५८ चा १८, १९६० चा १०, आणि १९६८ चा १०;

(१०) म्हैसूर येथे पुढील कूर्ग अधिनियमांद्वारे—१९३५ चा २ आणि १९४५ चा १;

(११) हिमाचल प्रदेश येथे १९६३ चा हिमाचल प्रदेश अधिनियम क्रमांक ४ याद्वारे;

(१२) आंध्र येथे आंध्र अनुकूलन आदेश, १९५४ याद्वारे;

(१३) अंदमान व निकोबार बेटांवर १९६१ चा विनियम १ याद्वारे; आणि

(१४) राजस्थान येथे राजस्थान अधिनियम, १९६१ चा १४ याद्वारे.

हा अधिनियम 'वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) याद्वारे वऱ्हाडवर अंशतः विस्तारित करण्यात आला व संथाळ परगण्यामध्ये 'संथाळ परगणा धाराबंदी विनियम' (१८७२ चा ३), कलम ३ द्वारे आणि अंगुळ जिल्ह्यामध्ये 'अंगुळ विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ५), कलम ३ व अनुसूचीद्वारे आणि 'पंथ पिपलोद विधि विनियम, १९२९' (१९२९ चा १), कलम २ द्वारे पंथ पिपलोद येथे अंमलात आल्याचे जाहीर करण्यात आले.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

बँकव्यवसायी. (१) "बँकव्यवसायी" यात बँक आणि बँकव्यवसायी म्हणून काम करणारी कोणतीही व्यक्ती यांचा समावेश आहे;

विनिमयपत्र. (२) "विनिमयपत्र" याचा अर्थ, 'परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१' (१८८१ चा २६) यात व्याख्या केल्याप्रमाणे विनिमयपत्र, असा आहे आणि त्यामध्ये, हुंडी आणि जो दस्तऐवज एखाद्या व्यक्तीला—मग तिचा त्यात नामनिर्देश असो वा नसो—अन्य कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही पैशाची रक्कम प्रदान होण्यास किंवा त्यासाठी तिच्याकडे मागणी करण्यास हक्कदार करीत असेल किंवा हक्कदार करणारा असल्याचे दिसत असेल असा अन्य कोणताही दस्तऐवज यांचाही समावेश आहे;

मागणीप्रदेय विनिमयपत्र. (३) "मागणीप्रदेय विनिमयपत्र" यात पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(क) विनिमयपत्राद्वारे किंवा वचनचिठ्ठीद्वारे कोणतीही रक्कम प्रदान करण्याबाबतचा अथवा कोणत्याही रकमेच्या फेडीदाखल करण्यात आलेले कोणतेही विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी सुपूर्द करण्याबाबतचा, अथवा उपलब्ध असेल किंवा नसेल अशा कोणत्याही विशिष्ट निधी-मधून अगर जी कोणतीही शर्त पाळली जाईल किंवा पाळली जाणारही नाही किंवा जी संभावी घटना घडेल किंवा घडणारही नाही तिच्यावर अवलंबून कोणतीही रक्कम प्रदान करण्याबाबतचा आदेश;

(ख) कोणतीही रक्कम प्रत्येक आठवड्यात, दरमहा किंवा अन्य कोणत्याही ठराविक मुदतीने प्रदान करण्याबाबतचा आदेश; आणि

(ग) पतपत्र म्हणजे, ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एक व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ तो काढण्यात आला आहे त्या व्यक्तीला पतउधार देण्यास दुसऱ्या व्यक्तीला प्राधिकृत करते असा संलेख;

भरणपत्र. (४) "भरणपत्र" यामध्ये "थेट भरणपत्र" याचा समावेश आहे, पण त्यामध्ये उपतांडेलाच्या पावतीचा समावेश होत नाही;

बंधपत्र. (५) "बंधपत्र" यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(क) ज्या संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला पैसे देण्याचे आबंधन स्वतःवर लादून घेते व त्याचबरोबर, विनिर्दिष्ट कृती करण्यात आली किंवा प्रकरणपरत्वे, करण्यात आली नाही तर, ते आबंधन शून्य होईल अशी शर्त घालते असा कोणताही संलेख;

(ख) साक्षीदाराने साक्षांकित केलेल्या आणि आदिष्टप्रदेय किंवा वाहकप्रदेय नसलेल्या ज्या संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला पैसे देण्यास स्वतःला आबद्ध करून घेते असा कोणताही संलेख; आणि

(ग) याप्रमाणे साक्षांकित केलेल्या ज्या संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडे धान्य किंवा अन्य शेतमाल सुपूर्द करण्यास स्वतःला आबद्ध करून घेते असा कोणताही संलेख;

---

हा अधिनियम 'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४), कलम ३(क) खाली गंजाम, विजगापट्टणम आणि पूर्व गोदावरी या अनुसूचित जिल्ह्यांमध्ये अंमलात आल्याचे जाहीर करण्यात आले. पहा—अधिसूचना क्रमांक १२१, दिनांक २५ एप्रिल, १९२७, फोर्ट सेंट जॉर्ज राजपत्र, १९२७, भाग एक, पृ. ६८४; हा अधिनियम त्याच अधिनियमाची कलमे ५ व ५ क यांखाली विशिष्ट फेरबदलां-सह खासी आणि जैन्तीया टेकड्या, गारो टेकड्या, लुशाई टेकड्या आणि नागा टेकड्या, काचर जिल्ह्याचा उत्तर काचर उप विभाग, शिवसागर व नवगाग जिल्ह्यांमधील मिकिर टेकड्यांचा पट्टा आणि लखिमपूर सरहद्द पट्टा यांमध्येही विस्तारित करण्यात आला. पहा—अधिसूचना क्र. १५४१-एफ (ए), दिनांक १० एप्रिल १९३०, आसाम राजपत्र, १९३०, भाग दोन, पृष्ठ ७००; अंदमान व निकोबार बेटांमध्ये १९५७ चा विनियम ३ याद्वारे विशोधित; उत्तर प्रदेशमध्ये १९५८ चा उत्तर प्रदेश अधिनियम ४३ (अधिसूचित) याद्वारे विशोधित; आणि पंजाबमध्ये १९५९ चा पंजाब अधिनियम २६ याद्वारे विशोधित.

हा अधिनियम, १९६३ चा विनियम ६, कलम २ व पहिली अनुसूची याद्वारे (१ जुलै १९६५ रोजी व तेव्हापासून) काही फेरबदलांसह दादरा व नगरहवेली आणि १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूचीद्वारे काही फेरबदलांसह गोवा, दमण व दीव यांवर विस्तारित करण्यात आला.

हा अधिनियम, १९६८ चा अधिनियम २६, कलम ३(१) व अनुसूचीद्वारे पाँडीचेरी येथे विस्तारित करण्यात आला.

२. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ३ द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी दाखल केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

३. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे "भाग ख राज्ये" याऐवजी दाखल केले.

(६) "आकारणीपात्र" हा शब्द या अधिनियमाच्या प्रारंभानंतर निष्पादित केलेल्या किंवा त्यानंतर प्रथम निष्पादित केलेल्या संलेखाला लागू करताना त्याचा अर्थ या अधिनियमाखाली आकारणीपात्र, असा आहे आणि अन्य कोणत्याही संलेखाला लागू करताना त्याचा अर्थ, असा संलेख निष्पादित केला गेला त्यावेळी अथवा जेथे, अनेक व्यक्तींनी तो संलेख वेगवेगळ्या वेळी निष्पादित केला असेल तेथे तो प्रथम जेव्हा निष्पादित केला गेला त्यावेळी [1][भारतात] अंमलात असलेल्या कायद्याखाली आकारणीपात्र, असा आहे; आकारणीपात्र.

(७) "धनादेश" याचा अर्थ, विनिर्दिष्ट बँकव्यवसायीवर काढण्यात आलेले जे विनिमयपत्र मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असल्याचे व्यक्त केलेले नाही ते विनिमयपत्र, असा आहे; धनादेश.

[2][ (८) * * * * *]

(९) "जिल्हाधिकारी"— जिल्हाधिकारी.

(क) याचा अर्थ, कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांच्या सीमांमध्ये अनुक्रमे, कलकत्त्याचा, मद्रासचा व मुंबईचा जिल्हाधिकारी आणि या सीमांच्या बाहेरील क्षेत्रात जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, असा आहे; आणि

(ख) त्यामध्ये, उप आयुक्त आणि [3][ते [4][राज्य शासन] ] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत ज्याला नियुक्त करील असा अन्य कोणताही अधिकारी यांचा समावेश आहे;

(१०) "अभिहस्तांतरणपत्र" यामध्ये, विक्रीबाबतचे अभिहस्तांतरणपत्र आणि ज्या कोणत्याही संलेखाद्वारे जंगम किंवा स्थावर मालमत्ता जीवित व्यक्तींच्या दरम्यान हस्तांतरित करण्यात येते आणि ज्याबाबत पहिल्या अनुसूचीद्वारे अन्यथा विनिर्देशपूर्वक उपबंध करण्यात आलेले नाहीत अशा प्रत्येक संलेखाचा समावेश आहे; अभिहस्तांतरणपत्र.

(११) "रीतसर मुद्रांकित" हा शब्द संलेखाला लागू केला असता त्याचा अर्थ, ज्या संलेखावर चिकट मुद्रांक किंवा छापील मुद्रांक आहे आणि असा मुद्रांक [1][भारतात] त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार लावण्यात अथवा वापरण्यात आला असेल तो संलेख आहे; रीतसर मुद्रांकित.

(१२) "निष्पादित" आणि "निष्पादन" याचा संलेखाच्या संदर्भातील अर्थ, "स्वाक्षरित" आणि "स्वाक्षरी" असा आहे; निष्पादित आणि निष्पादन.

[5]* * * * *

(१३) "छापील मुद्रांक" यामध्ये,— छापील मुद्रांक.

(क) समुचित अधिकाऱ्याने लावलेली किंवा छाप मारलेली लेबले; आणि

(ख) मुद्रांकित कागदावर उठावरेखित केलेला किंवा कोरलेला मुद्रांक,

यांचा समावेश आहे;

[6][ (१३क) "भारत" याचा अर्थ, जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून भारताचे राज्यक्षेत्र असा आहे;] भारत.

(१४) "संलेख" यामध्ये, ज्या ज्या दस्तऐवजाद्वारे कोणताही अधिकार किंवा दायित्व निर्माण करण्यात, हस्तांतरित करण्यात, मर्यादित करण्यात, वाढवण्यात, नष्ट करण्यात किंवा अभिलिखित करण्यात आले असेल किंवा तसे केल्याचे दिसत असेल, अशा प्रत्येक दस्तऐवजाचा समावेश आहे; संलेख.

(१५) "वाटणी संलेख" याचा अर्थ, ज्या कोणत्याही संलेखाद्वारे, कोणत्याही मालमत्तेचे सहमालक अशा मालमत्तांच्या पृथकपृथक हिश्श्यांमध्ये वाटण्या करतात किंवा वाटण्या करण्याचा करार करतात तो संलेख, असा आहे, आणि त्यामध्ये, कोणत्याही महसूल प्राधिकरणाने किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाने वाटण्या करण्यासाठी दिलेला अंतिम आदेश व वाटण्या करण्याचे निदेशित करणारा लवादाचा निवाडा यांचाही समावेश होतो; वाटणी संलेख.

---

१. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्ये" यांच्या उल्लेखाऐवजी दाखल केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे खंड (८) गाळला.

३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासन" याऐवजी दाखल केले.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "उगराणी करणारे शासन" याऐवजी दाखल केले.

५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे खंड (१२क) घालण्यात आला व अनुकूलन आदेश, १९५० द्वारे वगळला.

६. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

भाडेपट्टा. (१६) "भाडेपट्टा" याचा अर्थ, स्थावर मालमत्तेचा भाडेपट्टा असा आहे, आणि त्यामध्ये—

(क) पट्टा;

(ख) स्थावर मालमत्तेमध्ये लागवड करण्यासाठी, तिचा भोगवटा करण्यासाठी किंवा तिचे भाडे भरण्यासाठी अथवा सुपूर्द करण्यासाठी केलेली, पट्टयाचा प्रतिलेख नसलेली अशी कबुलायत किंवा असे अन्य लेखी अभिवचनपत्र;

(ग) ज्या कोणत्याही संलेखाद्वारे कोणत्याही वर्णनाचे टोलहक्क भाड्याने देण्यात असा येतात संलेख;

(घ) भाडेपट्टयासाठी केलेल्या एखाद्या अर्जावर, त्या अर्जाला मंजुरी देण्यात आली असल्याचे दर्शवण्याच्या उद्देशाने केलेले कोणतेही लिखाण,

यांचा समावेश आहे;

विकाऊ रोखा. [1][ (१६क) "विकाऊ रोखा" याचा अर्थ, [2][भारतातील] किंवा युनायटेड किंगडममधील कोणत्याही रोखे बाजारात विक्री करण्याजोगा असेल अशा वर्णनाचा रोखा, असा आहे;]

गहाणखत. (१७) "गहाणखत" यामध्ये कर्जाच्या रूपाने दिलेला किंवा द्यावयाचा पैसा अथवा एखादे विद्यमान किंवा भावी ऋण अथवा एखाद्या वचनबंधनाचे पालन यांची हमी देण्यासाठी ज्या ज्या संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या प्रीत्यर्थ विनिर्दिष्ट मालमत्तेवरील किंवा तिच्या संबंधातील अधिकार हस्तांतरित करते किंवा निर्माण करते अशा प्रत्येक संलेखाचा समावेश होतो;

कागद. (१८) "कागद" यामध्ये, ज्यावर एखादा संलेख लिहिता येईल असे चर्मपत्र किंवा चर्मपट किंवा अन्य कोणताही पदार्थ यांचा समावेश आहे;

विमापत्र. (१९) "विमापत्र" यामध्ये,—

(क) ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एक व्यक्ती अनपेक्षित किंवा आकस्मिक घटनेमधून उद्भवणारी हानी, नुकसान किंवा दायित्व यांपासून दुसऱ्या व्यक्तीचे हानिरक्षण करण्यास अधिमूल्याच्या प्रतिफलार्थ स्वतःस बांधून घेते असा कोणताही संलेख;

(ख) आयुर्विमापत्र, आणि एखाद्या व्यक्तीचा अपघात किंवा आजार याबाबतीतील विमा उतरवला असल्याचे दर्शवणारे कोणतेही विमापत्र आणि अन्य कोणताही व्यक्तिगत विमा,

यांचा समावेश आहे; [3]* * *

[3]* * * * *

सामूहिक विमापत्र. [4][ (१९क) "सामूहिक विमापत्र" याचा अर्थ, पन्नासहून किंवा केंद्र शासन सर्वसाधारणपणे अथवा एखाद्या विशिष्ट प्रकरणाला अनुलक्षून मान्यता देईल त्याप्रमाणे त्या संख्येहून कमी नाही इतक्या व्यक्तींना विमारक्षित करणाऱ्या ज्या संलेखाद्वारे विमाकार, नियोक्त्याने किंवा नियोक्ता व कर्मचारी यांनी संयुक्तरीत्या भरलेल्या अधिमूल्याच्या प्रतिफलार्थ वैद्यकीय तपासणी करवून किंवा न करवता सर्वस्वी नियोक्ता सोडून अन्य अशा व्यक्तींच्या लाभासाठी सर्वच्या सर्व कर्मचाऱ्यांचे किंवा कामधंद्यासंबंधीच्या परिस्थितीनुसार ठरणाऱ्या त्यांच्या कोणत्याही वर्गातील कर्मचाऱ्यांचे जीवित विमारक्षित करण्यासाठी स्वतःला बांधून घेतो असा, व्यक्तिनिहाय निवडीला मनाई करणाऱ्या योजनेवर आधारलेल्या विमा रकमांचा संलेख, असा आहे;]

सागरी विम्याचे पत्र किंवा सागरी विमापत्र. (२०) "सागरी विम्याचे पत्र" किंवा "सागरी विमापत्र"—

(क) याचा अर्थ, कोणत्याही जहाजावर किंवा जलयानावर (मग ते सागरी नौकानयनासाठी असो वा देशांतर्गत नौकानयनासाठी असो) अथवा कोणत्याही जहाजाची किंवा जलयानाची यंत्रसामग्री, दोरखंड किंवा सरंजाम यावर अथवा कोणत्याही जहाजावरील किंवा जलयानावरील कोणताही माल, व्यापारी माल किंवा कोणत्याही वर्णनाची मालमत्ता यावर, अथवा कोणत्याही जहाजाची किंवा जलयानाची वाहणावळ किंवा विधितः ज्याची विमा उतरवता येईल असा कोणत्याही जहाजातील किंवा जलयानातील अथवा त्याच्यासंबंधीचा अन्य कोणताही हितसंबंध यावर काढलेला कोणताही विमा असा आहे; आणि

(ख) यामध्ये, कोणत्याही मार्गक्रमणासाठी पाठवला जाणारा माल, व्यापारी माल किंवा मालमत्ता यांच्या विम्याचा समावेश आहे आणि त्यात, खंड (क) च्या अर्थानुसार सागरी जोखीमच नव्हे तर, विमा उतरवलेल्या मार्गक्रमाच्या प्रारंभापासून ते विम्याच्या व्याप्तीत येणाऱ्या अंतिम नियतस्थळापर्यंत त्या मार्गक्रमाच्या अनुषंगाने येणारी अन्य कोणतीही जोखीमदेखील समाविष्ट आहे.

---

१. १९०४ चा अधिनियम १५, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

२. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्ये" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

३. १९०६ चा अधिनियम ५, कलम २ द्वारे उप खंड (ग) आणि त्याच्या पूर्वीचा "आणि" हा शब्द निरसित केला.

४. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

जेव्हा जादा वाहणावळ म्हणून दिलेल्या किंवा द्यावयाच्या कोणत्याही रकमेच्या किंवा अन्य त-हेच्या प्रतिफलार्थ कोणतीही व्यक्ती, कोणत्याही वर्णनाचा माल, व्यापारी माल किंवा मालमत्ता कोणत्याही जहाजावर किंवा जलयानावर असताना त्या बाबतची कोणतीही जोखीम आपल्या अंगावर घेण्याचा करार करील असा कोणताही माल, व्यापारी माल किंवा मालमत्ता यांच्या मालकांचे, कोणतीही जोखीम, हानी किंवा नुकसान यापासून हानिरक्षण करण्यास स्वतःला बांधून घेईल तेव्हा, असा करार किंवा असे वचनबंधन ही सागरी विम्याची संविदा असल्याचे मानले जाईल;

(२१) "मुखत्यारनामा" यामध्ये, संलेख निष्पादित करणाऱ्या व्यक्तीकरिता व तिच्या नावाने काम चालवण्यासाठी विनिर्दिष्ट अशा व्यक्तीला मुखत्यारी प्रदान करणाऱ्या (त्या त्या काळी अंमलात असलेल्या न्यायालय फीच्या संबंधातील कायद्याखाली फी आकारली जाण्यास पात्र नसलेल्या) कोणत्याही संलेखाचा समावेश आहे; मुखत्यारनामा.

(२२) "वचनचिठ्ठी" याचा अर्थ, 'परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१' (१८८१ चा २६) याद्वारे व्याख्या केल्याप्रमाणे वचनचिठ्ठी, असा आहे; वचनचिठ्ठी.

यामध्ये, जो निधी उपलब्ध होईल किंवा होणारही नाही अशा कोणत्याही विशिष्ट निधीतून किंवा जी कोणतीही शर्त पुरी करण्यात येईल किंवा येणारही नाही किंवा जी कोणतीही आकस्मिक घटना घडेल किंवा घडणारही नाही तिला अनुलक्षून कोणतीही रक्कम देण्याचे वचन अंतर्भूत असलेल्या चिठ्ठीचाही समावेश आहे;

(२३) "पावती" यामध्ये—

(क) ज्याद्वारे कोणताही पैसा किंवा कोणतेही विनिमयपत्र, धनादेश किंवा वचनचिठ्ठी मिळाल्याची पोच देण्यात येते, किंवा पावती.

(ख) ज्याद्वारे ऋणाची फेड म्हणून अन्य कोणतीही जंगम मालमत्ता मिळाल्याची पोच देण्यात येते, किंवा

(ग) ज्याद्वारे कोणतेही ऋण किंवा येणे रक्कम अथवा ऋणाचा किंवा येणे रकमेचा कोणताही भाग यांची फेड करण्यात आली असल्याची किंवा ती चुकती करण्यात आली असल्याची पोच देण्यात येते, किंवा

(घ) ज्यावरून अशी कोणतीही पोच देण्यात आली असल्याचे दिसून येते किंवा त्यातून तसा अर्थ निघतो,

अशी कोणतीही अधिटिप्पणी, ज्ञापन किंवा लिखाण यांचा समावेश आहे—

मग ते कोणत्याही व्यक्तीच्या नावाने स्वाक्षरित करण्यात आलेले असो वा नसो; [१]* * *

(२४) "संव्यवस्था" याचा अर्थ,— संव्यवस्था.

(क) विवाहाच्या प्रतिफलार्थ,

(ख) संव्यवस्थाकर्त्याची मालमत्ता त्याच्या कुटुंबामध्ये किंवा ज्यांच्याकरिता तरतूद करण्याची त्याची इच्छा असेल त्यांच्यामध्ये विभागून देण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा त्याच्यावर अवलंबून असलेल्या एखाद्या व्यक्तीकरिता तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा

(ग) कोणत्याही धार्मिक किंवा धर्मादायी प्रयोजनार्थ,

केलेली स्थावर किंवा जंगम मालमत्तेची कोणतीही अमूल्यप्रतीय विल्हेवाट, असा आहे, आणि त्यामध्ये अशी विल्हेवाट करण्यासाठी केलेला लेखी करार [२][आणि, जेव्हा अशी कोणतीही विल्हेवाट लेखबद्ध करण्यात आली नसेल तेव्हा, न्यास जाहीर करून त्याद्वारे किंवा अन्यथा, अशा कोणत्याही विल्हेवाटीच्या अटी नमूद करणारा कोणताही संलेख] समाविष्ट आहे; [३]* * *

[४][(२५) "सैनिक" यामध्ये 'भारतीय भूसेना अधिनियम, १९११ [५][१९११ चा ८] याखाली जिच्या नावाची नोंद झाली आहे अशी, अराजादिष्ट अधिकाऱ्याच्या दर्जाहून खालच्या दर्जाची कोणतीही व्यक्ती समाविष्ट आहे.]

[६][* * * * * *]

---

१. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ आणि पहिली अनुसूची याद्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.
२. १९०४ चा अधिनियम १५, कलम २ याद्वारे समाविष्ट केले.
३. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ आणि पहिली अनुसूची याद्वारे घालण्यात आलेला "आणि" हा शब्द अनुकूलन आदेश, १९५० द्वारे वगळण्यात आला.
४. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ व पहिली अनुसूची याद्वारे समाविष्ट केले.
५. आता 'सेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४६) पहा.
६. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे खंड (२६) जादा दाखल केला व १९५५ चा अधिनियम ४३, कलम ४ द्वारे तो वगळण्यात आला (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण २ रे

### मुद्रांक शुल्के

### क.—संलेखांची शुल्कपात्रता

शुल्क आकारण्यास पात्र असलेले संलेख.

३. या अधिनियमाचे उपबंध व अनुसूची १ ली यांमध्ये जी जी सूट दिलेली असेल तिच्या अधीनतेने, त्या अनुसूचीत त्या त्या संलेखांसाठी यथोचित असलेले शुल्क म्हणून दर्शवण्यात आलेल्या रकमेइतके शुल्क आकारले जाण्यास पुढील संलेख पात्र असतील, ते असे :—

(क) त्या अनुसूचीत नमूद केलेला जो कोणताही संलेख कोणत्याही व्यक्तीने अगोदर निष्पादित केलेला नसून १ जुलै १८९९ रोजी किंवा त्यानंतर [1][भारतात] निष्पादित करण्यात आला असेल असा प्रत्येक संलेख;

(ख) त्या दिवशी किंवा त्यानंतर [1][भारताबाहेर] विकर्षिलेले किंवा तयार केलेले असून [1][भारतात] जे स्वीकृत केलेले किंवा ज्याचे पैसे दिलेले आहेत अथवा जे स्वीकारण्यासाठी अथवा पैसे मिळण्यासाठी सादर केलेले किंवा पृष्ठांकित केलेले, हस्तांतरित केलेले किंवा अन्यथा परक्रामित केलेले आहे असे [2][मागणी-वरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असलेले] प्रत्येक विनिमयपत्र [3]* * * किंवा वचनचिठ्ठी; आणि

(ग) त्या अनुसूचीत नमूद केलेला (विनिमयपत्र [3]* * *, किंवा वचनचिठ्ठी यांहून अन्य असा) जो संलेख कोणत्याही व्यक्तीने अगोदर निष्पादित केलेला नसून त्या दिवशी किंवा त्यानंतर भारताबाहेर निष्पादित केलेला असेल, [1][भारतात] असलेल्या कोणत्याही मालमत्तेशी अथवा केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही व्यवहाराशी किंवा गोष्टीशी संबंधित असेल व [1][भारतात] स्वीकृत केलेला असेल असा प्रत्येक संलेख :

परंतु, पुढील संलेखांच्या संबंधात कोणतेही शुल्क आकारणीयोग्य असणार नाही :—

(१) शासनाने किंवा त्याच्या वतीने किंवा त्याच्या प्रीत्यर्थ निष्पादित केलेल्या कोणत्याही संलेखाच्या संबंधात आकारणीयोग्य असे शुल्क भरण्यास शासन, ही सूट नसती तर ज्या बाबतीत पात्र झाले असते त्या बाबतीत असा संलेख;

(२) 'व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १८९४' (व्हिक्टो. ५७ व ५८, प्र. ६०) याखाली अथवा १८३८ चा अधिनियम १९ किंवा नंतरच्या अधिनियमान्वये विशोधित केलेला 'भारतीय जहाज नोंदणी अधिनियम, १८४१' (१८४१ चा १०) याखाली नोंदणी केलेल्या कोणत्याही जहाजाच्या किंवा जलयानाच्या किंवा त्यातील एखादा भाग, हितसंबंध, हिस्सा किंवा मालमत्ता यांच्या कायमच्या किंवा गहाणाच्या रूपाने किंवा अन्यथा करण्यात येणाऱ्या विक्रीबद्दलचा, हस्तांतरणाबद्दलचा किंवा अन्य विल्हेवाटी-बद्दलचा कोणताही संलेख.

[5][ [4][ ३क. * * *]]

विक्री, गहाण किंवा संव्यवस्था अशा एकाच संव्यवहारात उपयोगात आणलेले अनेक संलेख.

४. (१) जेव्हा कोणतीही विक्री, गहाण किंवा संव्यवस्था यांच्या बाबतीत, संव्यवहार पूर्ण करण्यासाठी अनेक संलेखांची योजना करण्यात आली असेल तेव्हा, अभिहस्तांतरण, गहाण किंवा संव्यवस्था यांसाठी १ ल्या अनुसूचीमध्ये विहित केलेले शुल्क प्रमुख संलेखावरच फक्त आकारण्यात येईल, आणि इतर संलेखां-पैकी प्रत्येक संलेखावर त्या अनुसूचीत त्यासाठी जे शुल्क (कोणतेही असल्यास) विहित केले असेल त्याऐवजी एक रुपया एवढे शुल्क आकारण्यात येईल.

(२) याप्रमाणे ज्या संलेखांची योजना करण्यात आली असेल त्यांपैकी कोणता संलेख पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ प्रमुख संलेख मानावयाचा ते पक्षांना स्वतःलाच ठरवता येईल :

परंतु, याप्रमाणे ठरविलेल्या संलेखावर आकारावयाचे शुल्क हे, ज्यांची योजना केली त्या उक्त संलेखांपैकी कोणत्याही संलेखावर आकारल्या जाणाऱ्या सर्वाधिक शुल्काइतके असेल.

अनेक वेगवेगळ्या बाबींच्या संबंधातील संलेख.

५. अनेक वेगवेगळ्या बाबी समाविष्ट असलेल्या किंवा अशा बाबींसंबंधीच्या कोणत्याही संलेखावर, अशांपैकी एकेक बाब समाविष्ट असलेल्या किंवा अशा एकेका बाबीसंबंधीच्या वेगवेगळ्या संलेखावर या अधि-नियमाखाली जे जे शुल्क आकारता येईल त्यांच्या एकूण रकमेइतके शुल्क आकारले जाईल.

---

१. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्ये" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे समाविष्ट केले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "धनादेश" हा शब्द वगळला.

४. १९७१ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

५. १९७३ चा अधिनियम १३, कलम २ द्वारे वगळले.

६. निकटपूर्व कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, १ ल्या अनुसूचीमधील दोन किंवा अधिक वर्णनांमध्ये मोडेल अशा तऱ्हेने तयार केलेल्या संलेखावर त्या अनुसूचीखाली आकारणीयोग्य असलेली शुल्के निरनिराळी असल्यास, त्यांपैकी जे सर्वाधिक असेल तेच तेवढे शुल्क आकारण्यात येईल : १ ल्या अनुसूचीमधील अनेक वर्णनांमध्ये मोडणारे संलेख.

परंतु शुल्क आकारणीला पात्र असून ज्याबाबत योग्य ते शुल्क देण्यात आले आहे अशा कोणत्याही संलेखाचा प्रतिलेख किंवा त्याची प्रतिलिपी या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे एक रुपयाहून अधिक शुल्क आकारले जाण्यास पात्र होणार नाही.

७. [1][ * * * * ] सागरी विमापत्रे.

(४) जेव्हा कोणताही सागरी विमा हा जलप्रवासासंबंधी किंवा तदर्थ म्हणून तसेच मुदतबंद असेल अथवा ते जहाज ज्या दिवशी आपल्या नियत स्थळी पोहोचून तेथे नांगरून ठेवण्यात येणार त्या दिवसानंतरच्या तीस दिवसांपलिकडच्या कोणत्याही काळाइतक्या व्याप्तीचा किंवा तेथपर्यंत विमारक्षण देणारा असेल तेव्हा, त्या विमापत्रावर जलप्रवासासंबंधी किंवा तदर्थ विमापत्र म्हणून तसेच मुदती विमापत्र म्हणूनही शुल्क आकारले जाईल.

८. (१) या अधिनियमात काहीही असले तरी, 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १८७९' (१८७९ चा ११) याच्या किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या उपबंधाखाली बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे विक्रीस काढून त्याद्वारे कर्ज उभारणाऱ्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणावर अशा कर्जाच्या बाबतीत, त्याने विक्रीस काढलेल्या बंधपत्रांच्या, ऋणपत्रांच्या किंवा अन्य रोख्यांच्या एकूण रकमेवर [2][एक टक्का] दराने शुल्क आकारण्यात येईल, आणि अशी बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे मुद्रांकित करावे लागणार नाहीत, आणि त्यांचे नवीकरण, एकत्रीकरण, पोटविभागणी केली असता अथवा अन्यथा, त्यांवर आणखी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. १८७९ चा अधिनियम क्रमांक ११ याखाली कर्जासाठी काढलेली बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे.

(२) विवक्षित बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे मुद्रांकित करण्यापासून व आणखी विवक्षित शुल्क आकारण्यापासून सूट देणारे पोटकलम (१) चे उपबंध हे, त्यात नमूद केलेल्या प्रकारच्या सर्व थकलेल्या कर्जासंबंधीची बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे यांना लागू होतील, आणि अशी सर्व बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे विधिग्राह्य असतील—मग ते मुद्रांकित केलेले असोत वा नसोत :

परंतु, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, ज्या स्थानिक प्राधिकरणाने अशी बंधपत्रे, ऋणपत्रे किंवा अन्य रोखे विक्रीस काढले असतील त्याला त्यासंबंधात, सव्वीस मार्च, १८९७ या दिवसापूर्वी आकारणीयोग्य असलेल्या शुल्काबाबत, असे शुल्क अगोदरच भरलेले नसेल किंवा केंद्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार माफ करण्यात आले नसेल तर, सूट मिळणार नाही.

(३) या कलमान्वये आवश्यक असलेले शुल्क भरण्याबाबत बुद्धिपुरस्सर उपेक्षा करण्यात आली असेल त्या बाबतीत, स्थानिक प्राधिकरण प्रदेय शुल्काच्या रकमेवर शेकडा दहा टक्क्यांइतकी रक्कम समपहृत होऊन शासनाकडे जमा होण्यास व पहिल्या महिन्यानंतर जितके महिनेपर्यंत अशी उपेक्षा चालू राहील त्या प्रत्येक महिन्यागणिक तशाच दंडास पात्र होईल.

९. [3][(१)] [4][ [5] * * * शासन] शासकीय राजपत्रात प्रकाशित केलेल्या नियमाद्वारे किंवा आदेशाद्वारे,— शुल्के कमी किंवा माफ करण्याची किंवा त्यांबाबत तडजोड करण्याची शक्ती.

(क) [6][त्याच्या प्रशासनाखालील] संपूर्ण क्षेत्रात किंवा त्या क्षेत्राच्या कोणत्याही भागात कोणतेही संलेख किंवा कोणताही विशिष्ट संलेखवर्ग किंवा अशा वर्गात मोडणाऱ्या संलेखांपैकी कोणताही संलेख किंवा जे संलेख कोणत्याही विशिष्ट वर्गाने किंवा त्याच्या प्रीत्यर्थ अथवा अशा वर्गाच्या कोणत्याही सदस्यांनी किंवा त्यांच्या प्रीत्यर्थ निष्पादित केलेले असतात असे कोणतेही संलेख यांवर आकारण्याजोगी शुल्के, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने कमी करता येतील किंवा माफ करता येतील, आणि

(ख) कोणत्याही निगमित कंपनीने किंवा अन्य निगम-निकायाने ऋणपत्रे, बंधपत्रे, किंवा अन्य विकाऊ रोखे विक्रीस काढले असतील त्या बाबतीत शुल्कांबाबत तडजोड किंवा त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत उपबंध करता येतील.

---

१. १९६३ चा अधिनियम ११, कलम ९२ द्वारे पोटकलमे (१), (२) आणि (३) निरसित केली.
२. १९९० चा अधिनियम ६, कलम २ द्वारे "आठ आणे प्रतिशत" याऐवजी दाखल केले.
३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे कलम ९ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.
४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल" याऐवजी दाखल केले.
५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "उगराणी करणारे" हे शब्द वगळण्यात आले.
६. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "ब्रिटिश इंडियाच्या" याऐवजी दाखल केले.

[1][(२) या कलमात "शासन" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(क) विनिमयपत्रे, धनादेश, वचनपत्रे, भरणपत्रे, पतपत्रे, विमापत्रे, भागांचे हस्तांतरण, ऋणपत्रे, प्रतिपत्रे व पावत्या यांच्या बाबतीतील मुद्रांक शुल्काच्या संबंधात आणि या अधिनियमाखाली आकारण्याजोग्या व संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील पहिल्या सूचीमधील नोंद ९६ खाली येणाऱ्या अन्य कोणत्याही मुद्रांक शुल्काच्या संबंधात, केंद्र शासन;

(ख) उपरोक्त खेरीजकरून, राज्य शासन

असा आहे.]

**ख.—मुद्रांक व त्यांचा वापर करण्याची पद्धती यांविषयी.**

शुल्कांचा भरणा कसा करावयाचा. १०. (१) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून, इतर बाबतीत, कोणत्याही संलेखावर आकारण्याजोगी असतील अशी सर्व शुल्के,—

(क) यामध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार; किंवा

(ख) त्यास असा कोणताही उपबंध लागू नसेल तेव्हा— [2][राज्य शासन] नियमाद्वारे निदेशित करील त्याप्रमाणे

मुद्रांकांच्या रूपाने भरण्यात येतील आणि ती तशी भरण्यात आल्याचे त्या रूपात अशा संलेखांवर दर्शवण्यात येईल.

(२) पोटकलम (१) खाली केलेल्या नियमांद्वारे इतर बाबींबरोबरच खालील बाबींचे विनियमन करता येईल :—

(क) प्रत्येक प्रकारच्या संलेखाच्या बाबतीत—वापरता येतील अशा मुद्रांकांचे वर्णन;

(ख) छापील मुद्रांक लावलेल्या संलेखांच्या बाबतीत—वापरता येतील अशा मुद्रांकाची संख्या;

(ग) [3][ * * *] विनिमयपत्रे किंवा वचनचिठ्ठ्या यांच्या बाबतीत—ज्यावर ती लिहिली जातात त्या कागदाचे आकारमान.

चिकट मुद्रांकांचा वापर. ११. पुढील संलेखांवर चिकट मुद्रांक लावता येतील, ते असे,—

(क) मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असलेल्या व संचरूपात विकर्षिलेल्या विनिमयपत्रांचे भाग खेरीजकरून, [4][दहा नवे पैसे याहून अधिक नसेल इतके शुल्क] आकारण्यास पात्र असलेले संलेख;

(ख) [5][भारताबाहेर] विकर्षिलेली किंवा केलेली विनिमयपत्रे, [6][* * *] व वचनचिठ्ठ्या;

(ग) उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ता, वकील किंवा मुखत्यार म्हणून केलेली नोंद;

(घ) लेखप्रमाणकाचे लेख; आणि

(ङ) कोणत्याही निगमित कंपनीतील किंवा अन्य निगम-निकायातील भागपत्रांच्या पृष्ठांकनाद्वारे केलेली हस्तांतरणे.

चिकट मुद्रांक रद्द करणे. १२. (१) (क) शुल्क आकारण्यास पात्र असा जो कोणताही संलेख कोणत्याही व्यक्तीने निष्पादित केला असेल त्या संलेखावर जी कोणी व्यक्ती चिकट मुद्रांक लावील ती असा मुद्रांक लावताना, तो पुन्हा वापरता येऊ नये यासाठी रद्द करील; आणि

(ख) चिकट मुद्रांक लावलेल्या कोणत्याही कागदावर जी कोणी व्यक्ती कोणताही संलेख निष्पादित करील ती, जर असा मुद्रांक उपरोक्त रीतीने आधीच रद्द केलेला नसेल तर तो पुन्हा वापरता येऊ नये अशा रीतीने निष्पादनाच्या वेळी तो रद्द करील.

(२) जो चिकट मुद्रांक त्याचा पुन्हा वापर करता येऊ नये अशा प्रकारे रद्द केलेला नसेल असा कोणताही चिकट मुद्रांक लावलेला संलेख हा, अशा मुद्रांकाच्या पुरता अमुद्रांकित असल्याचे मानले जाईल.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे समाविष्ट केले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "उगराणी करणारे शासन" याऐवजी दाखल केले.

३. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ५ द्वारे "कोणत्याही प्राच्य भाषेत लिहिलेली" हे शब्द वगळले. (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १९५८ चा अधिनियम १९, कलम २ द्वारे "एक आणा किंवा अर्धा आणा इतके शुल्क" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्ये" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला. (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

६. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे "धनादेश" हा शब्द वगळला.

(३) चिकट मुद्रांक रद्द करण्यास ज्या व्यक्तीला पोटकलम (१) अन्वये भाग पाडण्यात आले असेल, त्या व्यक्तीला, त्या मुद्रांकावर किंवा त्याच्या एका कडेपासून दुसऱ्या कडेपर्यंत आपले नाव किंवा आद्याक्षरी किंवा आपल्या पेढीचे नाव किंवा तिची आद्याक्षरी लिहून व आपण तसे लिहिल्याचा खरा दिनांक घालून किंवा अन्य कोणत्याही परिणामकारक रीतीने तो मुद्रांक रद्द करता येईल.

१३. छापील मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहिलेला प्रत्येक संलेख हा, जेणेकरून मुद्रांक त्या संलेखाच्या दर्शनी भागावर येईल आणि तो अन्य कोणत्याही संलेखासाठी वापरता किंवा त्यावर लावता येणार नाही अशा रीतीने लिहिण्यात येईल. छापील मुद्रांकांनी मुद्रांकित केलेले संलेख कसे लिहावेत.

१४. शुल्कआकारणीला पात्र असा संलेख ज्या मुद्रांकित कागदावर आधीच लिहिलेला असेल त्या कागदावर, शुल्कआकारणीला पात्र असा दुसरा संलेख लिहिता येणार नाही : त्याच मुद्रांकानिशी तो एकच तेवढा संलेख करावयाचा.

परंतु, कोणत्याही संलेखाद्वारे निर्माण केलेला किंवा त्यावरून दिसून येणारा कोणताही अधिकार हस्तांतरित करण्याच्या अथवा त्या संलेखाद्वारे ज्या कोणत्याही पैशाचा भरणा किंवा मालाची सुपूर्दगी सुनिश्चित करण्यात आली असेल, त्याची पोच देण्याच्या प्रयोजनार्थ त्या संलेखावर, रीतसर मुद्रांकित असे किंवा शुल्कआकारणीला पात्र नसलेले असे कोणतेही पृष्ठांकन करण्यास या कलमातील कशाचाही प्रतिबंध असणार नाही.

१५. कलम १३ किंवा कलम १४ चे व्यतिक्रमण करून लिहिलेला प्रत्येक संलेख अमुद्रांकित असल्याचे मानण्यात येईल. कलम १३ किंवा १४ याविरुद्ध लिहिलेला संलेख अमुद्रांकित मानावयाचा.

१६. जेव्हा एखाद्या संलेखावरील आकारणीयोग्य शुल्क किंवा शुल्कापासून त्यास मिळणारी सूट ही, कोणत्याही रीतीने दुसऱ्या एखादया संलेखाच्या संबंधात प्रत्यक्ष भरण्यात आलेल्या शुल्कावर अवलंबून असेल तेव्हा, लगतपूर्वी उल्लेखिलेले शुल्क भरले आहे ही गोष्ट, त्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून ते दोन्ही संलेख हजर केल्यास, प्रथम उल्लेखिलेल्या संलेखावर जिल्हाधिकाऱ्याच्या सहीच्या पृष्ठांकनाद्वारे किंवा [१][राज्य शासनाने] नियमाद्वारे विहित केलेली असल्यास तशा अन्य रीतीने दर्शवण्यात येईल. शुल्क दर्शविणे.

### ग.—संलेखांवर मुद्रांक लावण्याच्या वेळेविषयी

१७. शुल्क आकारण्यास पात्र अशा व [२][भारतात] कोणत्याही व्यक्तीने निष्पादित केलेल्या सर्व संलेखांवर निष्पादनापूर्वी किंवा निष्पादनाच्या वेळी मुद्रांक लावण्यात येतील. भारतात निष्पादित केलेले संलेख.

१८. (१) शुल्क आकारण्यास पात्र असा सर्वस्वी [२][भारताबाहेर] निष्पादित केलेला आणि विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी नसलेला प्रत्येक संलेख [२][भारतात] प्रथम हाती आल्यानंतर तीन महिन्यांच्या आत मुद्रांकित करता येईल. भारताबाहेर निष्पादित केलेली विनिमयपत्रे व वचनचिठ्ठ्या सोडून अन्य संलेख.

(२) असा कोणताही संलेख, त्यासाठी विहित केलेल्या मुद्रांक वर्णनाच्या संदर्भात, एखाद्या खाजगी व्यक्तीला रीतसर मुद्रांकित करता येत नसेल तर, तो संलेख उक्त तीन महिन्यांच्या अवधीत जिल्हाधिकाऱ्याकडे नेता येईल आणि जिल्हाधिकारी, याप्रमाणे असा संलेख घेऊन येणाऱ्या व्यक्तीला जेवढ्या मूल्याचा मुद्रांक पाहिजे असेल व ती व्यक्ती जेवढे पैसे भरील तेवढ्या मूल्याचा मुद्रांक लावून, तो संलेख [१][राज्य शासन] नियमाद्वारे विहित करील अशा रीतीने मुद्रांकित करील.

१९. [२][भारताबाहेर] केलेल्या, [३][मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असलेल्या] कोणत्याही विनिमयपत्राचा [४] * * * किंवा वचनचिठ्ठीचा प्रथम धारक, ते [२][भारतात] स्वीकाराकरिता किंवा पैसे मिळण्याकरिता सादर करण्यापूर्वी, किंवा ते पृष्ठांकित, हस्तांतरित किंवा अन्यथा परक्रामित करण्यापूर्वी, त्यावर योग्य मुद्रांक लावून रद्द करील : भारताबाहेर विकर्षिलेली विनिमयपत्रे आणि वचनचिठ्ठ्या.

परंतु—

(क) जर असे कोणतेही विनिमयपत्र [४] * * * किंवा वचनचिठ्ठी [२][भारतातील] त्याच्या कोणत्याही धारकाच्या हाती येईल त्यावेळी कलम १२ मध्ये विहित केल्याप्रमाणे त्यावर योग्य मुद्रांक लावलेला असून तो रद्द केलेला असेल आणि अशा धारकास, असा मुद्रांक हा या अधिनियमानुसार आवश्यक असेल त्याहून अन्य व्यक्तीने व त्याहून अन्य वेळी लावला गेला किंवा रद्द केला गेला असे समजण्यास कारण नसेल तर, असा मुद्रांक अशा धारकाशी संबंधित असेल तेथवर, तो रीतसर लावून रद्द करण्यात आला असल्याचे मानले जाईल;

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "उगराणी करणारे शासन" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला.
२. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्ये," याच्या उल्लेखाऐवजी हे उल्लेख दाखल केले. (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).
३. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे समाविष्ट केले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "धनादेश" हा शब्द वगळला.

(ख) या परंतुकातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही व्यक्तीला, तिने मुद्रांक न लावल्याबद्दल किंवा तो रद्द न केल्याबद्दल द्याव्या लागणाऱ्या कोणत्याही दंडाबाबत सुटका मिळणार नाही.

## ड.—शुल्कार्थ मूल्यांकनाविषयी

परकीय चलनात दर्शविलेल्या रकमेचे रूपांतरण. २०. (१) जेव्हा एखादा संलेख [1][भारतीय] चलनाहून अन्य कोणत्याही चलनात दर्शविलेल्या कोणत्याही पैशाच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल तेव्हा, असे शुल्क त्या संलेखाच्या दिनांकी चालू विनिमय-दराप्रमाणे [1][भारतीय] चलनात अशा पैशाचे जे मूल्य असेल त्यावरून परिगणित केले जाईल.

(२) मुद्रांक शुल्काची परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, केंद्र शासन वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ब्रिटिश किंवा अन्य कोणत्याही परकीय चलनाचे [1][भारतीय] चलनात रूपांतर करण्यासाठी विनिमय-दर विहित करील आणि असा दर पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी चालू दर असल्याचे मानण्यात येईल.

पुंजरोखा आणि विकाऊ रोखे यांचे मूल्यांकन कसे करावयाचे. २१. कोणत्याही पुंजरोख्याच्या किंवा कोणत्याही विकाऊ अथवा अन्य रोख्याच्या संबंधात एखादा संलेख यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल तेव्हा, असे शुल्क त्या संलेखाच्या दिनांकी अशा पुंजरोख्याची किंवा रोख्यांची जी सरासरी किंमत असेल किंवा मूल्य असेल त्यानुसार होणाऱ्या त्याच्या मूल्यावरून परिगणित केले जाईल.

विनिमय-दर किंवा सरासरी किंमत यांबाबतच्या विधानाचा परिणाम. २२. जेव्हा एखादया संलेखात, त्या बाबतीत आवश्यक असेल त्याप्रमाणे विनिमयाचा चालू दर किंवा सरासरी किंमत यासंबंधीचे विधान अंतर्भूत असून अशा विधानानुसार तो मुद्रांकित करण्यात आला असेल तेव्हा, अशा विधानाच्या विषयवस्तूचा संबंध असेल तेथवर तो संलेख जोपर्यंत विरुद्ध असे काहीही शाबीत झाले नाही तोपर्यंत रीतसर मुद्रांकित केला असल्याचे गृहीत धरले जाईल.

व्याजरक्षी संलेख. २३. एखादया संलेखाच्या अटींवरून व्याज प्रदेय होत असल्याचे व्यक्त होत असेल त्या बाबतीत, जर अशा संलेखात व्याजाचा उल्लेख नसता तर जेवढे शुल्क आकारणीयोग्य झाले असते त्याहून अधिक शुल्क त्यावर आकारले जाणार नाही.

[2][विकाऊ रोख्यांच्या गहाणांशी संबंधित असलेले विवक्षित संलेख हे करारनामे म्हणून शुल्क आकारणीला पात्र असणे.] [2][२३ क. (१) जेव्हा (वचनचिठ्ठी किंवा विनिमयपत्र नसलेला) एखादा संलेख—

(क) कर्जरूपाने उधार दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाबद्दल अगर एखाद्या विद्यमान किंवा भावी ऋणाबद्दल प्रतिभूती म्हणून कोणताही विकाऊ रोखा निक्षिप्त करण्याच्या वेळी दिलेला असेल, किंवा

(ख) कोणत्याही विकाऊ रोख्याचे प्रतिभूती म्हणून रीतसर मुद्रांकित केलेले हस्तांतरण हे विमोचनयोग्य किंवा सोपाधिक करीत असेल,

तेव्हा तो संलेख जणू काही १ ल्या अनुसूचीच्या [3][अनुच्छेद क्रमांक ५(ग)] खाली शुल्कआकारणीला पात्र असा करारनामा किंवा कराराचे संक्षेपपत्र असावे त्याप्रमाणे आकारणीपात्र होईल.

(२) अशा कोणत्याही संलेखाबाबत हक्कसोड किंवा दायित्वमुक्ती झाल्यास त्या बाबतीत केवळ वर उल्लेखिल्याइतकेच शुल्क आकारले जाईल.]

ऋणाच्या प्रतिफलार्थ किंवा भावी भरणा इत्यादींच्या अधीनतेने केलेल्या हस्तांतरणावर शुल्क कसे आकारावे. २४. जेव्हा एखादी मालमत्ता एखाद्या व्यक्तीकडे, त्या व्यक्तीला देणे असलेल्या कोणत्याही ऋणाच्या पूर्णतः किंवा अंशतः प्रतिफलार्थ अथवा कोणताही पैसा किंवा पुंजरोखा, तो त्या मालमत्तेवरील प्रभाराच्या किंवा बोजाच्या रूपात किंवा त्यास घटकभूत असला वा नसला तरी त्यांचा निश्चितपणे किंवा समाश्रितपणे भरणा अथवा हस्तांतरण करण्याच्या अधीनतेने हस्तांतरित करण्यात येईल तेव्हा, असे ऋण, पैसा किंवा पुंजरोखे हे, अशा हस्तांतरणावर ज्या प्रतिफलाबाबत यथामूल्य शुल्क आकारणीयोग्य आहे ते संपूर्ण प्रतिफल किंवा, प्रकरणपरत्वे, त्याचा एक भाग असल्याचे मानले जाईल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट १ ल्या अनुसूचीचा अनुच्छेद १६ यात उल्लेखिलेल्या अशा कोणत्याही विक्री प्रमाणपत्रास लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—गहाण किंवा अन्य बोजा यांच्या अधीन असलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत परतफेड न केलेले गहाण धन किंवा प्रभारित धन व त्याबरोबरच त्यावरील देय असलेले व्याज (काही असल्यास) हे सर्व, विक्रीच्या प्रतिफलाचा भाग असल्याचे मानण्यात येईल :

---

१. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्ये" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला. (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९०४ चा अधिनियम १५, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

३. १९१२ चा अधिनियम १, कलम ३ द्वारे "अनुच्छेद क्रमांक ५ (ख)" याऐवजी दाखल केले.

परंतु, गहाणाच्या अधीन असलेली मालमत्ता गहाणधारकाकडे हस्तांतरित केली असेल त्या बाबतीत त्या गहाणाच्या संबंधात अगोदरच भरलेल्या कोणत्याही शुल्काची रक्कम, अशा हस्तांतरणानंतर प्रदेय होणाऱ्या शुल्काच्या रक्कमेतून वजा करण्यास हक्कदार असेल.

उदाहरणे

(१) 'क' हा 'ख' चे १,००० रुपये देणे लागतो. ५०० रुपये आणि १,००० रु. च्या मागील ऋणाबाबत हक्कसोड अशा प्रतिफलार्थ 'क' हा 'ख' ला मालमत्ता विकतो. येथे मुद्रांक शुल्क १,५०० रुपयांवर प्रदेय होईल.

(२) 'क' हा 'ग' कडे १,००० रुपयांबद्दलचे गहाण व न भरलेले २०० रुपये व्याज यांस अधीन असलेली मालमत्ता 'ख' ला ५०० रुपयाला विकतो. मुद्रांक शुल्क, १,१७० रुपयांवर प्रदेय होईल.

(३) 'क' हा १०,००० रुपये किंमतीचे एक घर 'ख' कडे ५,००० रुपयांस गहाण ठेवतो व नंतर 'ख' ते घर 'क' कडून विकत घेतो. १०,००० रुपये वजा त्या गहाणाबद्दल अगोदर भरलेले मुद्रांक शुल्क इतक्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क प्रदेय आहे.

२५. जेव्हा वार्षिकी किंवा नियतकालागणिक प्रदेय असलेली रक्कम यांचे प्रमाण सुनिश्चित करण्या-साठी कोणताही संलेख निष्पादित करण्यात आला असेल किंवा जेव्हा अभिहस्तांतरणाचे प्रतिफल म्हणजे वार्षिकी किंवा नियतकालागणिक द्यावयाची अन्य रक्कम असेल तेव्हा, अशा संलेखाद्वारे सुनिश्चित झालेली रक्कम किंवा, प्रकरणपरत्वे, अभिहस्तांतरणाचे प्रतिफल हे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ,— वार्षिकी, वगैरेच्या बाबतीत मूल्यांकन.

(क) जर निश्चित कालावधीकरिता रक्कम प्रदेय असेल आणि त्यामुळे देण्यात यावयाची एकूण रक्कम अगोदरच विनिश्चित करता येत असेल तर, अशी एकूण रक्कम;

(ख) जर रक्कम शाश्वत कालाकरिता किंवा अशा संलेखाच्या किंवा अभिहस्तांतरणाच्या दिनांकास हयात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या हयातीबरोबरच समाप्त न होणाऱ्या अनिश्चित कालाकरिता प्रदेय असेल तर ज्या दिनांकास पहिला भरणा प्रदेय होणार त्या दिनांकापासून परिगणना केलेल्या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये जी रक्कम प्रदेय होईल अथवा अशा संलेखाच्या किंवा अभिहस्तांतरणाच्या अटीनुसार प्रदेय होऊ शकेल ती एकूण रक्कम; आणि,

(ग) जर ती रक्कम अशा संलेखाच्या किंवा अभिहस्तांतरणाच्या दिनांकास हयात असणाऱ्या व्यक्तीच्या हयातीबरोबरच समाप्त होणाऱ्या अनिश्चित कालाकरिता प्रदेय असेल तर, ज्या दिनांकास पहिला भरणा प्रदेय होणार त्या दिनांकापासून परिगणना केलेल्या बारा वर्षांच्या कालावधीमध्ये, पूर्वोक्ताप्रमाणे जी प्रदेय होईल किंवा होऊ शकेल अशी कमाल रक्कम,

असल्याचे मानण्यात येईल.

२६. जर यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र अशा कोणत्याही संलेखाच्या विषयवस्तुची रक्कम किंवा तिचे मूल्य हे, तो संलेख निष्पादित करण्यात आला त्या किंवा तो प्रथम निष्पादित करण्यात आला त्या दिनांकास विनिश्चित करता येत नसेल किंवा (या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निष्पादित केलेल्या संलेखाच्या बाबतीत) विनिश्चित करता आले नसते असे असेल तर, ज्या सर्वाधिक रकमेबद्दल किंवा मूल्याबद्दल, तशाच वर्णनाच्या एखाद्या संलेखात नमूद केले असल्यास, प्रत्यक्षात वापरलेला मुद्रांक तो संलेख निष्पादित करण्यात आल्याच्या दिनांकास पुरेसा ठरला असता त्याहून अधिक कशाचीही मागणी अशा संलेखाखाली करता येणार नाही : विषयवस्तुचे मूल्य अनिश्चित असेल तेव्हा लावावयाचा मुद्रांक.

[१][परंतु, एखाद्या खाणीच्या भाडेपट्टयाच्या बाबतीत स्वामित्वधन किंवा त्या खाणीच्या उत्पन्नाचा काही हिस्सा भाड्यादाखल किंवा भाड्याचा भाग म्हणून प्राप्त होत असेल तेव्हा, असे स्वामित्वधन किंवा अशा हिश्श्याचे मूल्य मुद्रांक-शुल्काच्या प्रयोजनार्थ,—

(क) जेव्हा भाडेपट्टा [२][शासनाकडून] किंवा त्याच्या वतीने देण्यात आला असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने प्रकरणाची सर्व परिस्थिती लक्षात घेऊन, जितकी रक्कम किंवा मूल्य भाडेपट्टयाखाली [३][शासनाला] स्वामित्वधनाच्या किंवा हिश्श्याच्या रूपाने द्यावे लागण्याचा संभव आहे असे अंदाजाने ठरवले असेल तितक्या रकमेइतके किंवा मूल्याइतके, किंवा

(ख) जेव्हा अन्य कोणत्याही व्यक्तीने भाडेपट्टा दिला असेल तेव्हा, वर्षाकाठी वीस हजार रुपये इतके

ठरवले तरी पुरेसे होईल आणि अशा स्वामित्वधनाची किंवा हिश्श्याची जी काही पूर्ण रक्कम असेल ती अशा भाडेपट्टयाखाली मागणीयोग्य असेल :]

परंतु आणखी असे की, एखाद्या संलेखाच्या संबंधात कलम ३१ किंवा कलम ४० याखाली कार्यवाही करण्यात आली असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केलेली रक्कम म्हणजे तो संलेख निष्पादित केल्याच्या दिनांकास प्रत्यक्ष वापरण्यात आलेला मुद्रांक होय असे मानले जाईल.

---

१. १९०४ चा अधिनियम १५, कलम ४ द्वारे मूळ परंतुकाऐवजी दाखल केले.
२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौंसिल" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला.
३. वरील अधिनियमाद्वारे, "उक्त सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौंसिलला" याऐवजी दाखल केले.

ज्यांचा शुल्कावर परिणाम होतो अशी तथ्ये संलेखात मांडणे.

२७. प्रतिफल (कोणतेही असल्यास) आणि कोणत्याही संलेखाची शुल्क-आकारणीपात्रता किंवा त्यावर जितके शुल्क आकारणीयोग्य आहे त्या शुल्काची रक्कम यावर परिणाम करणारी इतर सर्व तथ्ये व परिस्थिती त्या संलेखामध्ये संपूर्णपणे व खरेपणाने मांडावी लागतील.

विवक्षित अभिहस्तांतरणपत्रांच्या बाबतीत शुल्काला अनुलक्षून निदेश.

२८. (१) जर कोणत्याही मालमत्तेबाबत त्या संपूर्ण मालमत्तेची एका प्रतिफलार्थ विक्री करण्याची संविदा करण्यात आली असेल व ती मालमत्ता खरेदीदाराकडे वेगवेगळ्या संलेखांद्वारे अलग अलग भागांमध्ये अभिहस्तांतरित करण्यात आली असेल तर संविदा करणाऱ्या पक्षांना योग्य वाटेल अशा रीतीने प्रतिफलाचे संविभाजन करण्यात येईल, मात्र त्याबाबतच्या अभिहस्तांतरणपत्रात प्रत्येक स्वतंत्र भागाकरिता अलग प्रतिफल असल्याचे नमूद केले पाहिजे आणि अशा अभिहस्तांतरणपत्रावर अशा अलग प्रतिफलाच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारण्यात येईल.

(२) जी मालमत्ता दोन किंवा अधिक व्यक्तींनी संयुक्तरीत्या किंवा कोणत्याही व्यक्तीने स्वतःकरिता व अन्य व्यक्तींकरिता किंवा पूर्णतः अन्य व्यक्तींकरिता एका प्रतिफलार्थ खरेदी करावयाची संविदा केली असेल अशी कोणतीही मालमत्ता आणि ती ज्या व्यक्तींनी किंवा ज्या व्यक्तींसाठी खरेदी केली होती त्या व्यक्तींकडे प्रतिफलाच्या अलग अलग भागांकरिता स्वतंत्र संलेखांद्वारे भागशः अभिहस्तांतरित करण्यात आली असेल तेथे, प्रत्येक स्वतंत्र भागाच्या अभिहस्तांतरणपत्रावर त्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रतिफलाच्या स्वतंत्र भागाकरिता यथामूल्य शुल्क आकारले जाईल.

(३) एखाद्या व्यक्तीने कोणतीही मालमत्ता खरेदी करण्याची संविदा केलेली असताना, पण तिच्याकडे ती अभिहस्तांतरित झालेली नसताना, तिने ती अन्य कोणत्याही व्यक्तीला विकण्याची संविदा केली असेल आणि परिणामतः ती थेट पोटखरेदीदाराकडे अभिहस्तांतरित झाली असेल तर, अभिहस्तांतरणपत्र मूळ खरेदीदाराने पोटखरेदीदाराला केलेल्या विक्रीच्या प्रतिफलाबाबत यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल.

(४) एखाद्या व्यक्तीने कोणतीही मालमत्ता खरेदी करण्याची संविदा केलेली असताना, पण तिच्याकडे ती अभिहस्तांतरित झालेली नसताना, तिने ती संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग अन्य कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना विकण्याची संविदा केली असेल आणि परिणामतः ती मालमत्ता मूळ विक्रेत्याकडून निरनिराळ्या व्यक्तींकडे भागशः अभिहस्तांतरित झाली असेल तर, पोटखरेदीदारास विकलेल्या प्रत्येक भागाच्या अभिहस्तांतरणावर मूळ प्रतिफलाची रक्कम किंवा मूल्य लक्षात न घेता, अशा पोटखरेदीदाराने दिलेल्या प्रतिफलाच्या बाबतीतच केवळ यथामूल्य शुल्क आकारण्यात येईल; आणि अशा संपत्तीचा अवशिष्ट असा (काही असल्यास) जो भाग असेल त्याचे मूळ खरेदीदाराकडे अभिहस्तांतरण होताना पोटखरेदीदारांनी भरलेल्या एकूण प्रतिफलापेक्षा मूळ प्रतिफल जितक्या रकमेने अधिक असेल तेवढ्याच रकमेवर केवळ यथामूल्य शुल्क आकारले जाईल :

परंतु, लगतपूर्वी नमूद केलेल्या अशा अभिहस्तांतरणावरील शुल्क, कोणत्याही बाबतीत एक रुपयाहून कमी असणार नाही.

(५) जेथे एखाद्या पोटखरेदीदाराने त्याला ज्याने थेट विक्री केली त्या विक्रेत्याच्या हितसंबंधाच्या ज्या अभिहस्तांतरणावर त्याने भरलेल्या प्रतिफलाच्या बाबतीत यथामूल्य शुल्क आकारणीयोग्य असून तदनुसार जे मुद्रांकित केलेले आहे अशा अभिहस्तांतरणाचा प्रत्यक्षात स्वीकार केला असेल तर, मूळ विक्रेत्याने त्याच मालमत्तेचे त्या पोटखरेदीदाराला तदनंतर कोणतेही अभिहस्तांतरण केले असता त्यावर, अशा मूळ विक्रेत्याला मिळालेल्या प्रतिफलार्थ करण्यात आलेल्या अभिहस्तांतरणावर जेवढे शुल्क आकारणीयोग्य असेल तेवढे शुल्क किंवा जेथे असे शुल्क पाच रुपयांपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे तेथे, पाच रुपये इतके शुल्क आकारले जाईल.

### ड.—शुल्क कोणी द्यावयाचे

शुल्के कोणी द्यावयाची.

२९. विरुद्ध असा कोणताही करार झालेला नसल्यास, योग्य मुद्रांकाची तरतूद करण्यासाठी होणारा खर्च पुढे दर्शविल्याप्रमाणे त्या त्या व्यक्तीला सोसावा लागेल :—

(क) १ ल्या अनुसूचीच्या पुढीलपैकी कोणत्याही अनुच्छेदात वर्णन केलेल्या कोणत्याही संलेखाच्या बाबतीत—ते अनुच्छेद असे :—

क्रमांक २ (प्रशासन बंधपत्र),
[1][ क्रमांक ६ (हक्कलेखनिक्षेप, तारणनिक्षेप किंवा तारण यासंबंधीचा करारनामा),]
क्रमांक १३ (विनिमयपत्र),
क्रमांक १५ (बंधपत्र),
क्रमांक १६ (नौतारण बंधपत्र),
क्रमांक २६ (सीमाशुल्क बंधपत्र),
क्रमांक २७ (ऋणपत्र),
क्रमांक ३२ (अधिक प्रभार),
क्रमांक ३४ (हानिरक्षण बंधपत्र),
क्रमांक ४० (गहाणखत),

---

१. १९०४ चा अधिनियम १५, कलम ५ द्वारे "क्रमांक ६ (गहाणासंबंधीचा करारनामा)" याऐवजी दाखल केले.

क्रमांक ४९ (वचनचिठ्ठी),
क्रमांक ५५ (हक्कसोडपत्र),
क्रमांक ५६ (नौभार बंधपत्र),
क्रमांक ५७ (प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत),
क्रमांक ५८ (संव्यवस्थापत्र),
क्रमांक ६२ (क) (एखाद्या निगमित कंपनीतील किंवा अन्य निगम-निकायातील भागांचे हस्तांतरण),
क्रमांक ६२ (ख) (कलम ८ द्वारे ज्याबद्दल उपबंध केला आहे ती ऋणपत्रे खेरीजकरून जी ऋणपत्रे ही विकाऊ रोखे असतील त्यांचे हस्तांतरण—मग ते ऋणपत्र शुल्कयोग्य असो वा नसो—),
क्रमांक ६२ (ग) (बंधपत्र, गहाणखत किंवा विमापत्र या अन्वये सुरक्षित केलेल्या कोणत्याही हितसंबंधाचे हस्तांतरण)—

असा संलेख विकर्षिणारी, करून देणारी किंवा निष्पादित करणारी व्यक्ती ;

[1][(ख) आगविम्याहून अन्य विमापत्राच्या बाबतीत—विमा उतरणारी व्यक्ती ;

(खख) आगविमापत्राच्या बाबतीत—विमापत्र देणारी व्यक्ती ; ]

(ग) अभिहस्तांतरणाच्या बाबतीत (गहाण मालमत्तेचे प्रत्यंतरण धरून)—प्रदानग्राही, भाडेपट्ट्याच्या किंवा भाडेपट्ट्याच्या कराराच्या बाबतीत—पट्टेदार किंवा उद्देशित पट्टेदार ;

(घ) भाडेपट्ट्याच्या प्रतिलेखाच्या बाबतीत—पट्टाकार ;

(ङ) विनिमयसंलेखाच्या बाबतीत—पक्षकार समान हिश्श्यांत ;

(च) विक्री प्रमाणपत्राच्या बाबतीत—असे प्रमाणपत्र ज्या मालमत्तेशी संबंधित असेल त्या मालमत्तेचा खरेदीदार ; आणि,

(छ) वाटणीपत्राच्या बाबतीत—ते करून देणारे पक्षकार, वाटणी केलेल्या त्यांच्या संपूर्ण मालमत्तेमधील आपापल्या हिश्श्यांच्या प्रमाणात, किंवा ती वाटणी महसूल प्राधिकरणाने किंवा दिवाणी न्यायालयाने किंवा लवादाने दिलेले आदेश अंमलात आणण्यासाठी म्हणून केलेली असेल तेव्हा, असे प्राधिकरण, न्यायालय किंवा लवाद निदेशित करील त्या प्रमाणात.

**विवक्षित प्रकरणी पावती देण्याचे दायित्व.**

३०. ज्या व्यक्तीला वीस रुपयांहून अधिक असलेली अशी कोणतीही रक्कम किंवा वीस रुपये एवढ्या रकमेहून अधिक रकमेचे कोणतेही विनिमयपत्र, धनादेश अथवा वचनचिठ्ठी किंवा एखाद्या ऋणाच्या संपूर्ण अथवा अंशतः फेडीदाखल वीस रुपयांहून अधिक मूल्य असलेली कोणतीही जंगम मालमत्ता मिळेल अशी कोणतीही व्यक्ती, अशी रक्कम, विनिमयपत्र, धनादेश, वचनचिठ्ठी किंवा मालमत्ता देणाऱ्या किंवा सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीने मागणी केली असता त्याबद्दल रीतसर मुद्रांकित केलेली पावती देईल.

[2][आगविम्याच्या कोणत्याही संविदेचे कोणतेही नवीकरण करण्यासाठी कोणतेही अधिमूल्य किंवा प्रतिफल स्वीकारणारी किंवा ते आपल्या जमेस घेणारी कोणतीही व्यक्ती असे अधिमूल्य किंवा प्रतिफल स्वीकारल्यानंतर किंवा आपल्या जमेस घेतल्यानंतर एक महिन्याच्या आत, त्याबद्दल रीतसर मुद्रांकित केलेली पावती देईल.]

## प्रकरण ३ रे

### मुद्रांकाबाबत अभिनिर्णय

**पूर्वीच योग्य मुद्रांकाबाबत अभिनिर्णय.**

३१. (१) जेव्हा कोणताही संलेख—मग तो निष्पादित केलेला असो किंवा नसो आणि पूर्वीच मुद्रांकित केलेला असो किंवा नसो—जिल्हाधिकाऱ्याकडे आणला जाईल आणि तो आणणारी व्यक्ती, त्या संलेखावर काही शुल्क आकारणीयोग्य असल्यास ते किती याबाबत त्या अधिकाऱ्याचे मत घेण्यासाठी अर्ज करील आणि जिल्हाधिकारी प्रत्येक बाबतीत निदेशित करील अशी (पाच रुपयांहून अधिक नाही व [3][पन्नास नये पैसे] यांहून कमी नाही इतकी) फीची रक्कम देईल तेव्हा, जिल्हाधिकारी आपल्या मतानुसार, त्या संलेखावर काही शुल्क आकारणीयोग्य असल्यास ते किती, हे ठरवून देईल.

(२) या प्रयोजनासाठी, जिल्हाधिकारी त्या संलेखाचा गोषवारा आणि त्या संलेखाच्या शुल्कपात्रतेवर किंवा त्यावर जे शुल्क आकारणीयोग्य असेल त्या शुल्काच्या रकमेवर परिणाम करणारी सर्व तथ्ये व परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने त्यात नमूद केली आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल असे शपथपत्र किंवा अन्य पुरावा दाखल करण्याची आज्ञा करू शकेल आणि त्याप्रमाणे असा गोषवारा व पुरावा दाखल करण्यात येईपर्यंत अशा कोणत्याही अर्जावर कार्यवाही सुरू करण्यास तो नकार देऊ शकेल :

---

१. १९०६ चा अधिनियम ५, कलम ४ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी दाखल केले.

२. १९०६ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे जादा दाखल केले.

३. १९५८ चा अधिनियम १९, कलम ३ द्वारे "आठ आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

परंतु,—

(क) या कलमाला अनुलक्षून दाखल केलेला कोणताही पुरावा, ते शुल्क ज्या संलेखाशी संबंधित असेल त्यावर किती शुल्क आकारणीयोग्य आहे याबाबतची चौकशी खेरीजकरून एरव्ही, दिवाणी कार्यवाहीमध्ये कोणत्याही व्यक्तीविरुद्ध वापरला जाणार नाही; आणि

(ख) ज्या ज्या व्यक्तीने असा कोणताही पुरावा दाखल केला असेल त्या प्रत्येक व्यक्तीने, शुल्क ज्या संलेखाशी संबंधित असेल त्यावर जेवढे शुल्क आकारणीयोग्य असेल तेवढे संपूर्ण शुल्क भरले तर, संलेखामध्ये पूर्वोक्त अशी कोणतीही तथ्ये किंवा परिस्थिती खरेपणाने नमूद करण्यास ती चुकली या कारणावरून या अधिनियमाखाली तिला जो दंड झाला असता त्यापासून तिला सुटका देण्यात येईल.

जिल्हाधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र.

३२. (१) जेव्हा कलम ३१ खाली जिल्हाधिकाऱ्याकडे आणलेला एखादा संलेख त्याच्या मते शुल्क-आकारणीला पात्र अशा एखाद्या वर्णनाचा असेल, आणि—

(क) तो आधीच पूर्ण मुद्रांकित आहे असे जिल्हाधिकारी ठरवील तेव्हा, किंवा

(ख) जिल्हाधिकाऱ्याने कलम ३१ खाली ठरविलेले शुल्क, किंवा त्या संलेखाच्या संबंधात आधीच भरण्यात आलेल्या शुल्कासह जी रक्कम याप्रमाणे ठरवलेल्या शुल्काइतकी होईल ती रक्कम भरण्यात आली असेल तेव्हा

जिल्हाधिकारी, अशा संलेखावर जेवढे शुल्क आकारणीयोग्य होते तेवढे संपूर्ण शुल्क (रक्कम नमूद करून) भरण्यात आले आहे असे पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील.

(२) जेव्हा असा संलेख जिल्हाधिकाऱ्याच्या मते शुल्क आकारण्यास पात्र नसेल तेव्हा, जिल्हाधिकारी असा संलेख याप्रमाणे शुल्क आकारण्यास पात्र नाही असे पूर्वोक्त रीतीने प्रमाणित करील.

(३) या कलमाखाली ज्यावर पृष्ठांकन करण्यात आले आहे असा कोणताही संलेख हा रीतसर मुद्रांकित करण्यात आला आहे किंवा, प्रकरणपरत्वे, शुल्क आकारणीला पात्र नसलेला असा आहे असे मानण्यात येईल, आणि जर तो शुल्क आकारण्याला पात्र असेल तर, तो पुरावा म्हणून किंवा अन्यथा ग्राह्य होईल, आणि जणू काही तो मुळातच रीतसर मुद्रांकित करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही करता येईल व त्याची नोंदणी करता येईल :

परंतु, जिल्हाधिकारी—

(क) [1][भारतात] निष्पादित केलेल्या किंवा प्रथम तेथे निष्पादित केलेल्या आणि निष्पादित केल्याच्या किंवा, प्रकरणपरत्वे, प्रथम निष्पादित केल्याच्या दिनांकापासून एक महिना संपल्यानंतर त्याच्याकडे आणलेल्या कोणत्याही संलेखावर;

(ख) [1][भारताबाहेर] निष्पादित केलेल्या किंवा प्रथम तेथे निष्पादित केलेल्या व [1][भारतात] प्रथम स्वीकृत झाल्यापासून तीन महिने संपल्यानंतर त्याच्याकडे आणलेल्या कोणत्याही संलेखावर; किंवा

(ग) रीतसर मुद्रांकित न केलेल्या कागदावर विकर्षित किंवा निष्पादित केल्यानंतर त्याच्याकडे आणलेल्या [2][दहा नवे पैसे याहून अधिक नाही इतके शुल्क] आकारण्यास पात्र अशा कोणत्याही संलेखावर किंवा कोणत्याही विनिमयपत्रावर किंवा वचनचिठ्ठीवर

पृष्ठांकन करण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्राधिकृत होणार नाही.

## प्रकरण ४ थे

### रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख

संलेखांची तपासणी करणे व ते अवरुद्ध करून ठेवणे.

३३. (१) विधितः किंवा पक्षकारांच्या संमतीने पुरावा घेण्यास प्राधिकृत असलेल्या ज्या ज्या व्यक्तीपुढे आणि पोलीस अधिकारी खेरीजकरून लोक कार्यपदाचा प्रभारी असलेल्या ज्या ज्या व्यक्तीपुढे, तिच्या मते शुल्क आकारणीला पात्र असा संलेख हजर करण्यात येतो किंवा ती आपली कर्तव्ये पार पाडीत असताना तिच्यासमोर येतो अशा प्रत्येक व्यक्तीला, असा संलेख रीतसर मुद्रांकित झाला नसल्याचे तिला दिसून आले तर, तो संलेख अवरुद्ध करून ठेवता येईल.

(२) त्या प्रयोजनासाठी अशी प्रत्येक व्यक्ती, याप्रमाणे आकारणीपात्र असलेला आणि याप्रमाणे हजर केलेला किंवा तिच्यासमोर येणारा असा संलेख निष्पादित करण्यात आला किंवा प्रथम निष्पादित करण्यात आला तेव्हा [1][भारतात] अंमलात असलेल्या कायद्यानुसार आवश्यक असलेल्या मूल्याचा व त्या वर्णनाचा मुद्रांक त्यावर लावण्यात आलेला आहे किंवा कसे याची खातरजमा करण्यासाठी अशा प्रत्येक संलेखाची तपासणी करील :

---

१. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्ये" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५८ चा अधिनियम १९, कलम ४ द्वारे "एक आणा किंवा अर्धा आणा इतके शुल्क" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

परंतु,—

(क) कोणत्याही दंडाधिकाऱ्याला किंवा फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाला 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) प्रकरण १२, किंवा प्रकरण ३६ खालील कार्यवाहीखेरीज अन्य कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात त्याच्यापुढे येणाऱ्या कोणत्याही संलेखाची तपासणी करणे किंवा तो अवरुद्ध करून ठेवणे योग्य वाटत नसेल तर, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ते आवश्यक आहे असे मानले जाणार नाही;

(ख) एखाद्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या बाबतीत, या कलमाखाली कोणत्याही संलेखाची तपासणी करण्याचे व तो अवरुद्ध करून ठेवण्याचे काम ते न्यायालय या बाबतीत नियुक्त करील अशा अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करण्यात येईल.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, शंकास्पद बाबतीत,—

(क) कोणती कार्यपदे ही लोक कार्यपदे मानावीत हे [1][ [2][राज्य शासनाला] ] ठरवता येईल; आणि

(ख) कोणत्या व्यक्ती, लोक कार्यपदांच्या प्रभारी व्यक्ती मानाव्यात हे [1][ [2][राज्य शासनाला]] ठरवता येईल.

**अमुद्रांकित पावत्यांना विशेष उपबंध.**

३४. जेव्हा [3][दहा नवे पैसे याहून अधिक नाही इतके शुल्क] आकारण्यास पात्र अशी कोणतीही पावती, कोणत्याही लोकलेख्याच्या लेखापरीक्षेच्या ओघात कोणत्याही अधिकाऱ्यापुढे अमुद्रांकित स्वरूपात देण्यात अनुलक्षून किंवा सादर करण्यात येईल तेव्हा, असा अधिकारी स्वविवेकानुसार संलेख अवरुद्ध करून ठेवण्याऐवजी, त्या अमुद्रांकित पावतीच्या बदली रीतसर मुद्रांकित पावती देण्यात यावी अशी आज्ञा करू शकेल.

**रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख हे पुराव्यात अस्वीकारार्ह असणे, इत्यादी.**

३५. शुल्कआकारणीला पात्र असा कोणताही संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नसेल तर, विधितः किंवा पक्षकारांच्या संमतीने पुरावा घेण्यास प्राधिकृत असलेली कोणतीही व्यक्ती, कोणत्याही प्रयोजनाकरिता तो संलेख हे पुरावा म्हणून स्वीकारणार नाही, किंवा अशी कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही लोक कार्यपदाधिकारी त्याच्या आधारावर कोणतीही कार्यवाही करणार नाही किंवा त्याची नोंदणी करणार नाही किंवा तो अधिप्रमाणित करणार नाही.

परंतु,—

(क) फक्त [4][दहा नवे पैसे याहून अधिक नाही इतके शुल्क] आकारण्यास पात्र अशा संलेखाहून अन्य कोणताही संलेख, किंवा विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी हे, सर्व योग्य अपवाद सोडून, त्यावर जेवढे शुल्क आकारणीयोग्य असेल तेवढे शुल्क किंवा अपुऱ्या शुल्काचा मुद्रांक लावलेल्या संलेखाच्या बाबतीत, अशा शुल्काची रक्कम पुरी करण्यास आवश्यक तितकी रक्कम व सोबत पाच रुपये इतका अथवा योग्य शुल्क रकमेच्या किंवा तिच्यात कमी पडणाऱ्या भागाच्या दहा पटीइतकी रक्कम पाच रुपयांहून अधिक असेल तेव्हा अशा शुल्काच्या किंवा अशा दहा पट रकमेइतका दंड भरण्यात आल्यावर पुराव्यात स्वीकृत केले जातील;

(ख) ज्या व्यक्तीकडे मुद्रांकित पावतीची मागणी करता आली असती त्या व्यक्तीने अमुद्रांकित पावती दिली असेल आणि अशी पावती जर मुद्रांकित करण्यात आली तर ती त्या व्यक्तीच्या विरोधी पुराव्यात स्वीकार्य झाली असती असे असेल तेव्हा, अशी पावती, ती देणाऱ्या व्यक्तीने एक रुपया दंड भरल्यावर तिच्या विरोधी पुराव्यात स्वीकृत करण्यात येईल;

(ग) जेव्हा कोणत्याही प्रकारची संविदा किंवा करार दोन किंवा अधिक पत्रांचा समावेश असलेल्या पत्रव्यवहाराद्वारे करण्यात आला असेल, आणि त्या पत्रांपैकी कोणत्याही एका पत्रावर योग्य मुद्रांक लावलेला असेल तेव्हा, ती संविदा किंवा तो करार रीतसर मुद्रांकित असल्याचे मानले जाईल;

(घ) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) चे प्रकरण १२ किंवा प्रकरण ३६ याखालील कार्यवाहीहून अन्य अशा फौजदारी न्यायालयातील कोणत्याही कार्यवाहीत कोणताही संलेख पुराव्यात स्वीकारण्यास यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही;

(ङ) जेव्हा कोणताही संलेख [5][ [6][शासनाने किंवा शासनाच्या]] वतीने निष्पादित करण्यात आला असेल तेव्हा किंवा अशा संलेखाला या अधिनियमाच्या कलम ३२ खाली किंवा अन्य उपबंधाखाली तरतूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र लावलेले असेल तेव्हा, असा संलेख कोणत्याही न्यायालयात स्वीकारला जाण्यास यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" याच्या उल्लेखाऐवजी दाखल केला.
२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "उगराणी करणारे शासन" याच्या उल्लेखाऐवजी दाखल केला.
३. १९५८ चा अधिनियम १९, कलम ५ द्वारे "एक आणा शुल्कासहित" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
४. १९५८ चा अधिनियम १९, कलम ६ द्वारे "एक आणा किंवा अर्धा आणा इतक्या शुल्कासहित" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून)
५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "शासन" याच्या उल्लेखाऐवजी दाखल केले.
६. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "क्राऊन" याच्या उल्लेखाऐवजी दाखल केले.

**संलेखाचा स्वीकार केव्हा प्रश्नास्पद करावयाचा नाही.** ३६. एखादा संलेख पुराव्यात स्वीकारण्यात आला असेल तेव्हा, कलम ६१ मध्ये उपबंधित केले असेल तेवढे सोडून इतर बाबतीत अशी स्वीकृती, तो संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नाही या कारणावरून त्याच दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर प्रश्नास्पद केली जाणार नाही.

**अयोग्य रीत्या मुद्रांकित केलेले संलेख स्वीकृत करणे.** ३७. जेव्हा एखाद्या संलेखावर पुरेशा रकमेचा पण अयोग्य वर्णनाचा मुद्रांक लावलेला असेल तेव्हा, त्या संलेखावर आकारणीयोग्य असेल तेवढे शुल्क भरल्यावर तो रीतसर मुद्रांकित असल्याचे प्रमाणित करण्यात येईल आणि याप्रमाणे प्रमाणित केलेला कोणताही संलेख त्यानंतर, निष्पादनाच्या दिनांकापासून रीतसर मुद्रांकित झाला असल्याचे मानले जाईल, असे उपबंधित करणारे नियम [1][[2][राज्य शासनास]] करता येतील.

**अवरुद्ध करून ठेवलेल्या संलेखाच्या संबंधात काय कार्यवाही करावी.** ३८. (१) जेव्हा कलम ३३ खाली संलेख अवरुद्ध करून ठेवणारी व्यक्ती, विधितः किंवा पक्षकारांच्या संमतीने पुरावा घेण्यास प्राधिकृत असेल आणि त्या व्यक्तीने कलम ३५ द्वारे उपबंधित केल्याप्रमाणे दंड किंवा कलम ३७ द्वारे उपबंधित केल्याप्रमाणे शुल्क भरण्यात आल्यावर असा संलेख पुराव्यात स्वीकारला असेल तेव्हा, ती व्यक्ती, अशा संलेखाची अधिप्रमाणित प्रत व त्याबरोबर त्या संलेखाबाबत बसवलेल्या शुल्काची व दंडाची रक्कम नमूद करणारे एक लेखी प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि अशी रक्कम जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा तो या बाबतीत नियुक्त करील अशा व्यक्तीकडे पाठवील.

(२) अन्य प्रत्येक बाबतीत, संलेख याप्रमाणे अवरुद्ध करून ठेवणारी व्यक्ती, तो मूळ संलेख जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील.

**कलम ३८, पोटकलम (१) खाली दिलेली दंडाची रक्कम परत करण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.** ३९. (१) एखाद्या संलेखाची प्रत, कलम ३८, पोटकलम (१) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवली असेल तेव्हा, तो स्वतःला योग्य वाटल्यास, [3]* * * अशा संलेखाच्या संबंधात पाच रुपयांहून अधिक दिलेला दंड तेवढा परत करू शकेल.

(२) जेव्हा असा संलेख कलम १३ किंवा कलम १४ याचे व्यतिक्रमण करून लिहिण्यात आलेला आहे एवढ्याच कारणावरून तो अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल तेव्हा, जिल्हाधिकारी याप्रमाणे दिलेली दंडाची संपूर्ण रक्कम परत करू शकेल.

**अवरुद्ध करून ठेवलेले संलेख मुद्रांकित करण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.** ४०. (१) फक्त [4][दहा नवे पैसे याहून अधिक नाही इतके शुल्क] आकारण्यास पात्र असलेला संलेख सोडून अन्य कोणताही संलेख किंवा विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी जेव्हा जिल्हाधिकारी, कलम ३३ खाली अवरुद्ध करून ठेवील किंवा तो कलम ३८, पोटकलम (२) खाली त्याच्याकडे येईल तेव्हा, तो खालील कार्यपद्धती अनुसरील :—

(क) असा संलेख रीतसर मुद्रांकित केलेला आहे किंवा तो शुल्कआकारणीला पात्र नाही असे त्याचे मत असेल तर, तो संलेख रीतसर मुद्रांकित आहे किंवा तो शुल्कआकारणीला पात्र नाही असे तो त्यावर पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील;

(ख) असा संलेख शुल्कआकारणीला पात्र असून तो रीतसर मुद्रांकित केलेला नाही असे त्याचे मत असेल तर, तो योग्य शुल्क किंवा ती रक्कम पुरी करण्यासाठी लागणारी रक्कम व त्याबरोबर पाच रुपये इतका दंड भरण्यास, किंवा त्यास योग्य वाटल्यास, योग्य शुल्क रकमेच्या किंवा तिच्यात कमी पडणाऱ्या भागाच्या दहापटी [5][हून अधिक नसेल] इतकी रक्कम भरण्याची आज्ञा करील—मग ती रक्कम पाच रुपयांहून अधिक असो वा कमी असो :

परंतु, जेव्हा असा संलेख, केवळ तो कलम १३ किंवा कलम १४ चे व्यतिक्रमण करून लिहिण्यात आलेला आहे एवढ्याच कारणावरून अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल तेव्हा, जिल्हाधिकारी स्वतःला योग्य वाटल्यास या कलमाद्वारे विहित केलेला संपूर्ण दंड माफ करू शकेल.

(२) पोटकलम (१), खंड (क) खालील प्रत्येक प्रमाणपत्र हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यात नमूद केलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा असेल.

(३) एखादा संलेख कलम ३८, पोटकलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात आला असेल तेव्हा, त्यावर या कलमाद्वारे उपबंधित केल्याप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर जिल्हाधिकारी संलेख अवरुद्ध करून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला तो परत करील.

**अजाणतेपणे संलेख रीतसर मुद्रांकित केले न जाणे.** ४१. फक्त [4][दहा नवे पैसे याहून अधिक नाही इतके शुल्क] आकारण्यास पात्र असा संलेख सोडून अन्य असा जो कोणताही संलेख, शुल्कआकारणीला पात्र असून रीतसर मुद्रांकित केलेला नाही तो किंवा एखादे विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी कोणत्याही व्यक्तीने स्वतः होऊन तिच्या निष्पादनाच्या किंवा प्रथम निष्पादनाच्या

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " गव्हर्नर जनरल इन कौंसिल " याच्या उल्लेखाऐवजी दाखल केला.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " उगराणी करणारे शासन " याच्या उल्लेखाऐवजी दाखल केला.

३. १९१४ चा अधिनियम ४, कलम २ आणि अनुसूची भाग १ला याद्वारे " या बाबतीत त्याच्याकडे अर्ज केल्यानंतर किंवा असा अर्ज केला नसेल तर मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाच्या संमतीने " हे शब्द वगळले.

४. १९५८ चा अधिनियम १९, कलम ६ द्वारे " एक आणा किंवा अर्धा आणा इतके शुल्क " याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. १९०४ चा अधिनियम १५, कलम ६ द्वारे समाविष्ट केले.

दिनांकापासून एक वर्षांच्या आत जिल्हाधिकाऱ्यापुढे हजर केली आणि तो संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नाही ही वस्तुस्थिती अशा व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य शुल्क किंवा त्याची रक्कम पुरी होण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम भरण्याची तयारी दाखवली, आणि तो संलेख रीतसर मुद्रांकित करण्याची कसूर ही अभावितपणे, चुकीमुळे किंवा अत्यंत निकडीच्या परिस्थितीमुळे घडली अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री पटली तर, त्यास कलम ३३ आणि ४० खालील कार्यवाही करण्याऐवजी अशी रक्कम स्वीकारून यात लगतनंतर विहित केल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

४२. (१) एखाद्या संलेखाच्या बाबतीत, काही शुल्क व दंड बसत असल्यास कलम ३५, कलम ४० किंवा कलम ४१ खाली ते भरण्यात आल्यास तो संलेख पुराव्यात स्वीकारणारी व्यक्ती, किंवा, प्रकरणपरत्वे, जिल्हाधिकारी त्या संलेखाबाबत योग्य शुल्क किंवा, प्रकरणपरत्वे, योग्य शुल्क व दंड (प्रत्येकाची रक्कम नमूद करून) वसूल झाले आहेत असे, ते भरणाऱ्या व्यक्तीचे नाव व राहण्याचे ठिकाण लिहून पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील. *ज्यांवर कलम ३५, ४० किंवा ४१ खाली शुल्क भरलेले असेल अशा संलेखांवर पृष्ठांकन करणे.*

(२) याप्रमाणे पृष्ठांकित केलेला प्रत्येक संलेख पुराव्यात स्वीकार्य असेल आणि तो जणू काही रीतसर मुद्रांकित करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे त्याची नोंद करता येईल व त्याच्या आधारे कार्यवाही करता येईल, तसेच तो अधिप्रमाणित करता येईल आणि तो अवरुद्ध करून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याच्या हाती तो ज्या व्यक्तीच्या ताब्यातून आला असेल त्या व्यक्तीने त्याबाबत अर्ज केल्यावर तिच्याकडे किंवा ती सांगेल त्याप्रमाणे सुपूर्द करण्यात येईल :

परंतु,—

(क) कलम ३५ खाली शुल्क आणि दंड भरल्यावर जो पुराव्यात स्वीकारण्यात आला आहे असा कोणताही संलेख, तो अशा प्रकारे अवरुद्ध केल्याच्या दिनांकापासून एक महिना संपण्यापूर्वी किंवा जर तो आणखी काळ अवरुद्ध करून ठेवणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केले असून ते प्रमाणपत्र त्याने रद्द केले नसेल तर, याप्रमाणे सुपूर्द केला जाणार नाही;

(ख) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे [1]"दिवाणी प्रक्रिया संहिता" (१८८२ चा १४), कलम १४४, खंड ३ वर परिणाम होणार नाही.

४३. ज्या व्यक्तीने एखाद्या संलेखाच्या संबंधात, मुद्रांक कायद्याच्या विरुद्ध एखादा अपराध केल्याचे दिसते अशा कोणत्याही व्यक्तीवर खटला भरण्यास अशा संलेखाच्या बाबतीत या प्रकरणाखाली कारवाई करण्यामुळे किंवा दंड भरावा लागल्यामुळे, आडकाठी होणार नाही : *मुद्रांक कायद्याच्या विरोधी अपराधाबद्दल खटला.*

परंतु, ज्या संलेखाच्या संबंधात दंड भरण्यात आला आहे अशा कोणत्याही संलेखाच्या बाबतीत, तो अपराध योग्य शुल्क भरण्याची टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने केला गेला आहे असे जिल्हाधिकाऱ्याला दिसून आल्यावाचून अशा प्रकारचा खटला दाखल करण्यात येणार नाही.

४४. (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने एखाद्या संलेखाच्या संबंधात, कलम ३५, कलम ३७, कलम ४० किंवा कलम ४१ खाली कोणतेही शुल्क किंवा दंड भरलेला असून, करारा अन्वये किंवा कलम २९ च्या उपबंधांखाली किंवा असा संलेख निष्पादित करण्यात आला त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही अधिनियमितीखाली अन्य एखादी व्यक्ती, अशा संलेखासाठी योग्य मुद्रांक पुरवण्याचा खर्च सोसण्यास बांधलेली असेल तेव्हा, प्रथम उल्लेखिलेली व्यक्ती, याप्रमाणे भरलेल्या शुल्काची किंवा दंडाची रक्कम अशा अन्य व्यक्तीकडून वसूल करण्यास हक्कदार असेल. *शुल्क किंवा दंड भरणाऱ्या व्यक्तींना विवक्षित बाबतीत त्याची वसुली करता येईल.*

(२) अशा वसुलीच्या प्रयोजनार्थ, अशा संलेखाच्या संबंधात या अधिनियमान्वये देण्यात आलेले कोणतेही प्रमाणपत्र, हे त्यात प्रमाणित केलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा असेल.

(३) न्यायालयाला योग्य वाटल्यास, ज्या कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत अशा व्यक्ती पक्षकार असतील आणि असा संलेख पुराव्यात दिला असेल त्यासाठी लागलेल्या खर्चाबाबतच्या कोणत्याही आदेशात अशी रक्कम समाविष्ट करता येईल. जर न्यायालयाने ती रक्कम अशा आदेशात समाविष्ट केली नाही तर, ती रक्कम वसूल करण्यासाठी आणखी कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

४५. (१) जेव्हा कलम ३५ किंवा कलम ४० खाली कोणताही दंड भरलेला असेल तेव्हा, तो भरल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत लेखी अर्ज करण्यात आल्यास, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण, असा दंड संपूर्णतः किंवा अंशतः परत करू शकेल. *विवक्षित बाबतीत दंड किंवा जादा शुल्क परत करण्याची महसूल प्राधिकरणाची शक्ती.*

(२) जेव्हा विधितः आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक-शुल्कापेक्षा अधिक शुल्क कलम ३५ किंवा ४० खाली आकारण्यात आलेले असून, ते भरण्यात आले आहे असे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाचे मत असेल तेव्हा, संबंधित पक्षाने ते शुल्क आकारण्याबाबतचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत लेखी अर्ज केल्यास असे प्राधिकरण, जास्तीचे शुल्क परत करू शकेल.

४६. (१) जर कलम ३८, पोट-कलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवलेला कोणताही संलेख वाटेतच गहाळ झाला, नष्ट झाला किंवा खराब झाला तर, तो संलेख गहाळ, नष्ट किंवा खराब झाल्याबद्दल असा संलेख पाठविणारी व्यक्ती दायी असणार नाही. *कलम ३८ खाली पाठवलेले संलेख गहाळ झाल्याबद्दल दायित्व नाही.*

---

[1] आता 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५), अनुसूची १ ली, आदेश तेरा, नियम ९ पहा.

(२) जेव्हा कोणताही संलेख याप्रमाणे पाठवला जाण्याच्या बेतात असेल तेव्हा, तो अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीच्या हाती तो ज्या व्यक्तीच्या ताब्यातून आला असेल त्या व्यक्तीला, आपल्या खर्चाने अशा संलेखाची नक्कल तयार करण्यात यावी व तो अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीने ती अधिप्रमाणित करावी अशी मागणी करता येईल.

आपणाकडे आलेली अमुद्रांकित विनिमयपत्रे व वचनचिठ्ठ्या मुद्रांकित करण्याची प्रदात्याची शक्ती.

४७. जेव्हा, [१][दहा नवे पैसे याहून अधिक नाही इतके शुल्क] आकारण्यास पात्र असे कोणतेही विनिमयपत्र [२][किंवा वचनचिठ्ठी] त्याची रक्कम मिळण्यासाठी अमुद्रांकित स्वरूपात सादर करण्यात आली असेल तेव्हा, जिला ती याप्रमाणे सादर करण्यात आली असेल ती व्यक्ती त्यावर आवश्यक तो चिकट मुद्रांक लावू शकेल आणि यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीने तो रद्द केल्यावर अशा विनिमयपत्रावरून [२][किंवा वचनचिठ्ठीवरून] प्रदेय असलेली रक्कम देऊ शकेल, आणि ती जिने द्यावयाला पाहिजे होती त्या व्यक्तीवर शुल्क आकारू शकेल, किंवा पूर्वोक्तप्रमाणे प्रदेय असलेल्या रकमेमधून ती वजा करू शकेल, आणि असे विनिमयपत्र [२][किंवा वचनचिठ्ठी] शुल्काच्या प्रयोजनापुरती सुयोग्य व विधिग्राह्य असल्याचे मानले जाईल :

परंतु अशा विपत्राच्या [२][किंवा वचनचिठ्ठीच्या] संबंधात एखादी व्यक्ती, ज्या कोणत्याही दंडास किंवा कार्यवाहीस पात्र असेल त्यापासून तिला यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे सुटका मिळणार नाही.

शुल्क व दंड यांची वसुली.

४८. या प्रकरणाखाली भरावी लागणारी सर्व शुल्के, दंड व अन्य रकमा ज्या व्यक्तीकडून येणे असतील त्या व्यक्तीच्या जंगम मालमत्तेवर अटकावणी लावून व ती विकून, किंवा जमीन-महसुलाची थकबाकी वसूल करण्यासाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही प्रक्रियेनुसार जिल्हाधिकाऱ्यास त्यांची वसुली करता येईल.

## प्रकरण ५ वे

### विवक्षित प्रकरणांत मुद्रांकांबाबत सवलती देणे

खराब झालेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे.

४९. कोणता पुरावा मागवावयाचा व कोणती चौकशी करावयाची त्यासंबंधी [३][ [४][राज्य शासन]] करील अशा नियमांच्या अधीनतेने, जिल्हाधिकारी, कलम ५० मध्ये विहित केलेल्या कालावधीच्या आत त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यास व वस्तुस्थितीबद्दल त्याची खात्री झाल्यास, यात यापुढे नमूद केलेल्या प्रकरणी खराब झालेल्या छापील मुद्रांकांच्या बाबतीत सवलत देऊ शकेल, ते असे :—

(क) एखाद्या कागदावर लिहिलेला कोणताही संलेख कोणत्याही व्यक्तीकडून निष्पादित केला जाण्यापूर्वी अनवधानामुळे व अहेतुकपणे खराब झालेला, दिसेनासा झालेला किंवा लेखनप्रमादामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणाने नियोजित प्रयोजनासाठी अयोग्य ठरलेला असेल त्यावरील मुद्रांक;

(ख) जो पूर्णतः किंवा अंशतः लिहिलेला आहे, पण त्यातील कोणत्याही पक्षाने स्वाक्षरित केलेला किंवा निष्पादित करून दिलेला नाही अशा कोणत्याही दस्तऐवजावरील मुद्रांक ;

(ग) [५][मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असलेल्या] विनिमयपत्रांच्या बाबतीत [६]* * * किंवा वचनचिठ्ठ्यांच्या बाबतीत—

(१) विकर्षकाने किंवा त्याच्या वतीने स्वाक्षरित केलेले [७][असे कोणतेही विनिमयपत्र] स्वीकारण्यात आलेले नसेल किंवा ते कोणत्याही रीतीने वापरण्यात आलेले नसेल किंवा स्वीकारार्थ निविदान करण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनाकरिता त्याच्या हातून सुपूर्द झालेले नसेल तेव्हा त्यावरील मुद्रांक :

परंतु, ज्या कागदावर असा कोणताही मुद्रांक छापलेला असेल त्या कागदावर नंतर लिहावयाच्या कोणत्याही विनिमयपत्राचा [८]* * * स्वीकार म्हणून किंवा त्यासाठी उद्देशित असलेली अशी कोणतीही स्वाक्षरी त्यावर असता कामा नये.

(२) कर्त्याने किंवा त्याच्या वतीने स्वाक्षरित केलेली जी कोणतीही वचनचिठ्ठी कोणत्याही रीतीने वापरलेली नाही किंवा त्याच्या हातून सुपूर्द झालेली नाही तीवरील मुद्रांक;

---

१. १९५८ चा अधिनियम १९, कलम ७ द्वारे "एक आणा शुल्क" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९८५ रोजी व तेव्हापासून).
२. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे "वचनचिठ्ठी किंवा धनादेश" यांच्या उल्लेखाऐवजी दाखल केला.
३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासन" याऐवजी दाखल केले.
४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "उगराणी करणारे शासन" याऐवजी दाखल केले.
५. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे समाविष्ट केले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "धनादेशांच्या" हा शब्द वगळला.
७. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "कोणतेही विनिमयपत्र" याऐवजी दाखल केले.
८. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "किंवा धनादेशाचा" हे शब्द वगळले.

(३) [1][असे कोणतेही विनिमयपत्र,] [2]* * * किंवा वचनचिठ्ठी तिच्या विकर्ताने किंवा त्याच्या वतीने स्वाक्षरित केलेली असली तरी कोणत्याही चूकभुलीमुळे खराब किंवा निरुपयोगी झालेली असेल तेव्हा, त्यासाठी वापरलेला किंवा वापरण्याचे उद्देशित असलेला मुद्रांक—मग ते विनिमयपत्र [2]* * * असल्यास स्वीकारार्थ सादर केलेले किंवा स्वीकारलेले किंवा पृष्ठांकित केलेले असले अथवा ती वचनचिठ्ठी असल्यास प्रदेयीला सुपूर्द केलेली असली तरी हरकत नाही :

परंतु, खराब झालेले विनिमयपत्र [3]* * * किंवा वचनचिठ्ठी याच्याशी, पूर्वोक्त अशा चूकभुलीची दुरुस्ती खेरीजकरता, प्रत्येक तपशिलाबाबत तंतोतंत जुळणारे दुसरे पूर्ण केलेले व रीतसर मुद्रांकित केलेले विनिमयपत्र [3]* * * किंवा अशी वचनचिठ्ठी हजर केली असली पाहिजे;

(घ) जो संलेख त्यातील कोणत्याही पक्षाने निष्पादित करून दिलेला असून,—

(१) तो सुरुवातीपासून विधितः सर्वथा शून्य असल्याचे नंतर आढळून आले असेल;

(२) त्यामधील कोणत्याही त्रुटीमुळे किंवा चुकीमुळे मूळ उद्देशित प्रयोजनासाठी तो अपात्र असल्याचे नंतर आढळून आले असेल;

(३) तो ज्या कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करणे आवश्यक आहे ती व्यक्ती, तो निष्पादित न करताच मृत्यू पावल्यामुळे किंवा अशा कोणत्याही व्यक्तीने तो निष्पादित करण्यास नकार दिल्यामुळे उद्देशित संव्यवहार संकल्पित स्वरूपात घडवून आणण्याच्या दृष्टीने पूर्ण करता येत नसेल;

(४) एखाद्या महत्त्वाच्या पक्षाकडून तो निष्पादित केला गेलेला नाही व त्यावर स्वाक्षरी करण्यास तो पक्ष असमर्थ आहे किंवा त्याने नकार दिला आहे म्हणून उद्देशित प्रयोजनासाठी तो वस्तुतः अपूर्ण व अपर्याप्त असेल;

(५) कोणत्याही व्यक्तीने त्याखाली कृती करण्यास किंवा त्याद्वारे प्रतिभूत करावयाचे योजिलेला कोणताही पैसा देण्यास नकार दिल्यामुळे किंवा त्याद्वारे देण्यात आलेले कोणतेही पद नाकारल्यामुळे किंवा न स्वीकारल्यामुळे उद्देशित प्रयोजन सर्वथा फसले असेल;

(६) त्याद्वारे जो संव्यवहार घडवून आणण्याचे योजिले असेल तो संव्यवहार त्याच पक्षांच्या दरम्यान झालेल्या व त्यापेक्षा कमी मूल्य नसलेला एखादा मुद्रांक लावलेल्या अन्य कोणत्याही संलेखाद्वारे घडवून आणल्यामुळे निरुपयोगी झाला असेल;

(७) तो अपुऱ्या मूल्याचा असेल आणि त्याद्वारे जो संव्यवहार घडवून आणण्याचे योजले असेल तो संव्यवहार त्याच पक्षांच्या दरम्यान व त्यापेक्षा कमी मूल्य नसलेला एखादा मुद्रांक लावलेल्या अन्य कोणत्याही संलेखाद्वारे घडवून आणला असेल;

(८) तो अनवधानामुळे आणि अहेतुकपणे खराब झाला असेल आणि ज्याच्याऐवजी त्याच पक्षांच्या दरम्यान व त्याच प्रयोजनासाठी रीतसर मुद्रांकित असा दुसरा संलेख निष्पादित करून दिलेला असेल;

अशा कोणत्याही संलेखासाठी वापरलेला मुद्रांक :

परंतु, निष्पादित संलेखाच्या बाबतीत, ज्या कार्यवाहीमध्ये तो संलेख पुराव्यात देता किंवा देऊ करता आला असता अथवा, दिला किंवा देऊ केला गेला असता अशी कोणतीही वैध कार्यवाही आरंभलेली असता कामा नये आणि तो संलेख रद्द करण्यासाठी परत केलेला असता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—संलेखावर जेवढे शुल्क आकारणीयोग्य असेल ते पूर्ण शुल्क भरण्यात आल्याबद्दलचे कलम ३२ खालील जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र म्हणजे या कलमाच्या अर्थानुसार उमट मुद्रांक होय.

**कलम ४९ खाली सुटका मिळण्यासाठी अर्ज केव्हा करावयाचा.**

**५०.** कलम ४९ खाली सुटका मिळण्यासाठी खाली दिलेल्या कालावधींच्या आत अर्ज करावा लागेल, ते असे,—

(१) खंड (घ), (५) मध्ये उल्लेखिलेल्या बाबतीत, संलेखाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत;

(२) ज्यावर कोणताही संलेख, त्यातील कोणत्याही पक्षाने निष्पादित केलेला नसेल अशा कोणत्याही मुद्रांकित कागदाच्या बाबतीत, तो मुद्रांक खराब झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत;

(३) ज्यावर कोणताही संलेख, त्यातील कोणत्याही पक्षाने निष्पादित केलेला असेल अशा एखाद्या मुद्रांकित कागदाच्या बाबतीत, संलेखाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा त्यावर दिनांक घातलेला नसेल तर, ज्या व्यक्तीने तो प्रथम किंवा एकटीनेच निष्पादित केला त्या व्यक्तीने निष्पादित केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत :

---

१. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे "कोणतेही विनिमयपत्र" याऐवजी दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "धनादेश" हा शब्द वगळला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "किंवा धनादेश" हा शब्द वगळला.

परंतु,—

(क) जेव्हा खराब झालेला संलेख, पुरेशा कारणासाठी [1][भारताबाहेर] पाठवण्यात आला असेल तेव्हा, तो [1][भारतात] परत हाती आल्यानंतर, सहा महिन्यांच्या आत असा अर्ज करता येईल;

(ख) ज्या संलेखाच्या बदली दुसरा संलेख निष्पादित केलेला असेल असा कोणताही संलेख अपरिहार्य परिस्थितीमुळे उपरोक्त कालावधीत रद्द करण्यासाठी म्हणून सोडून देता येत असेल तेव्हा, असा बदली संलेख निष्पादित केल्याच्या दिनांकानंतर सहा महिन्यांच्या आत असा अर्ज करता येईल.

निगमांना पुढे जरूर नसलेल्या छापील नमुन्यांच्या बाबतीत सवलत.

५१. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण [2][किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाने याबाबत शक्ती प्रदान केली असेल तर जिल्हाधिकारी] [2][कोणत्याही बँकव्यवसायीने किंवा] कोणत्याही निगमित कंपनीने किंवा अन्य निगम-निकायाने संलेखाच्या मुद्रित नमुन्यासाठी वापरलेल्या मुद्रांकित कागदांच्या बाबतीत, जर उक्त [2][बँकव्यवसायीला], कंपनीला किंवा निगम-निकायाला भासणारी अशा नमुन्यांची गरज पुरेशा कारणामुळे संपली असेल तर, सवलत देऊ शकेल, याला कालमर्यादा नाही :

परंतु, अशा मुद्रांकित कागदांच्या बाबतीत रीतसर शुल्क भरले असल्याबद्दल अशा प्राधिकाऱ्याची खात्री पटली पाहिजे.

चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत

५२. (क) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने, शुल्क आकारण्यास पात्र अशा संलेखाकरता, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांमध्ये अशा संलेखाकरिता विहित केले असेल त्या वर्णनाहून अन्य वर्णनाचा एखादा मुद्रांक किंवा आवश्यक असेल त्याहून अधिक मूल्याचा एखादा मुद्रांक अनवधानाने वापरला असेल किंवा कोणतेही शुल्क आकारण्यास पात्र नसलेल्या एखाद्या संलेखासाठी एखादा मुद्रांक अनवधानाने वापरला असेल तेव्हा, किंवा

(ख) जेव्हा एखाद्या संलेखासाठी वापरलेला मुद्रांक हा, अशा प्रकारचा संलेख कलम १३ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून लिहिण्यात आल्यामुळे, कलम १५ खाली अनवधानाने निरुपयोगी बनला असेल तेव्हा,

जिल्हाधिकाऱ्यास, त्या संलेखाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा त्यावर दिनांक नसेल तर, ज्या व्यक्तीने तो प्रथमत: किंवा एकटीनेच निष्पादित केला असेल तिने तो निष्पादित केल्याच्या दिनांकानंतर सहा महिन्यांच्या आत अर्ज केला असल्यास आणि तो संलेख शुल्क आकारण्याला पात्र असल्यास, त्यावर योग्य शुल्काचे मुद्रांक पुन्हा लावल्यावर याप्रमाणे चुकीचा वापर झालेला किंवा निरुपयोगी बनलेला मुद्रांक खराब झालेला मुद्रांक म्हणून रद्द करता येईल व त्याची किंमत परत देता येईल.

खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत कशी द्यावयाची.

५३. ज्या बाबतीत खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांची किंमत परत करावयाची असेल अशा कोणत्याही बाबतीत, जिल्हाधिकारी त्यांऐवजी—

(क) त्याच वर्णनाचे व त्याच मूल्याचे अन्य मुद्रांक; किंवा

(ख) आवश्यक असल्यास व त्याला योग्य वाटल्यास, अन्य कोणत्याही वर्णनाचे तेवढ्या मूल्यांचे मुद्रांक; किंवा

(ग) स्वविवेकानुसार दर रुपयामागे किंवा त्याच्या कोणत्याही भागामागे [4][दहा नवे पैसे] वजा करून पैशाच्या रूपात तितकेच मूल्य

देऊ शकेल.

वापरासाठी न लागणाऱ्या मुद्रांकांबाबत सवलत.

५४. जो खराब झालेला नाही किंवा उद्देशित प्रयोजनाच्या दृष्टीने अपात्र किंवा निरुपयोगी बनलेला नाही असा किंवा असे मुद्रांक जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात असतील, पण त्यांचा त्या व्यक्तीला लगेच उपयोग नसेल तेव्हा, जर ते रद्द करण्याकरिता अशा व्यक्तीने ते परत केले आणि—

(क) असा मुद्रांक किंवा असे मुद्रांक हे अशा व्यक्तीने त्यांचा वापर करण्याच्या प्रामाणिक उद्देशाने खरेदी केले होते; आणि

(ख) तिने त्याची किंवा त्यांची पूर्ण किंमत चुकती केली आहे; आणि

(ग) ते ज्या दिनांकास याप्रमाणे परत करण्यात आले त्या दिनांकाच्या लगतपूर्व सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत ते याप्रमाणे खरेदी करण्यात आलेले होते

असे जिल्हाधिकाऱ्याची खात्री पटेल अशाप्रकारे शाबीत केले तर, जिल्हाधिकारी, अशा व्यक्तीस रुपयामागे अथवा त्याच्या भागामागे [4][दहा नवे पैसे] वजा करून अशा मुद्रांकाचे अथवा मुद्रांकांचे मूल्य पैशाच्या रूपात परत करील :

---

१. १९५५ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "राज्य" याच्या उल्लेखाऐवजी दाखल केला (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९१४ चा अधिनियम ४, कलम २ व अनुसूची-भाग १ लां, याद्वारे समाविष्ट केले.

३. १९६० चा अधिनियम ५, कलम ६ द्वारे समाविष्ट केले.

४. १९५८ चा अधिनियम ९, कलम ८ द्वारे "एक आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

परंतु, जर ती व्यक्ती लायसनधारक मुद्रांक-विक्रेता असेल तर, जिल्हाधिकारी स्वत:ला योग्य वाटल्यास, मुद्रांक-विक्रेत्या व्यक्तीने प्रत्यक्षात भरलेली रक्कम, पूर्वोक्तप्रमाणे त्यामध्ये कोणतीही कपात न करता परत करू शकेल.

[1][५४क. कलम ५४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या व्यक्तीजवळ चार आण्याच्या किंवा त्याच्या पटीच्या मूल्याभिधानाचा नव्हे तर अन्य कोणत्याही मूल्याभिधानाचा मुद्रांक असेल किंवा असतील आणि जर असा किंवा असे मुद्रांक खराब झालेले नसतील तर, अशा व्यक्तीने 'भारतीय मुद्रांक (विशोधन) अधिनियम, १९५८' (१९५८ चा १९) याच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या आत असा किंवा असे मुद्रांक परत जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन केल्यानंतर, जिल्हाधिकारी 'भारतीय नाणी अधिनियम, १९०६' (१९०६ चा ३) याचे कलम १४, पोट-कलम (२) याच्या उपबंधांनुसार परिगणना करून ठरवलेली अशा मुद्रांकाच्या किंवा मुद्रांकांच्या मूल्यांची रक्कम अशा व्यक्तीस परत करील.] आण्याच्या मूल्याभिधानांच्या मुद्रांकांबाबत सवलती.

[2][५४ख. कलम ५४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या व्यक्तीजवळ "शरणार्थी सहायता" असे अक्षरांकित केलेले मुद्रांक (कलम ३क वगळले जाण्यापूर्वी त्या कलमाला अनुसरून काढलेले मुद्रांक) असतील आणि असे मुद्रांक खराब झालेले नसतील तेव्हा, अशा व्यक्तीने असे मुद्रांक 'शरणार्थी सहायता कर (निरास) अधिनियम, १९७३' याच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या आत जिल्हाधिकाऱ्याकडे परत केले असता जिल्हाधिकारी अशा व्यक्तीला अशा मुद्रांकांच्या पैशांच्या स्वरूपात परतावा देईल किंवा त्याऐवजी त्याच मूल्याचे अन्य मुद्रांक देईल : शरणार्थी सहायता मुद्रांकांबाबत सवलती.

परंतु, अशा परताव्यांसाठी होणाऱ्या मागण्यांचा त्वरेने निकाल करणे सुकर होण्याच्या दृष्टीने, राज्य शासन स्वत:ला योग्य वाटेल अशा रीतीने अन्य एखादी कार्यपद्धती विहित करू शकेल आणि अशा परताव्यांची मागणी करण्यासाठीसुद्धा ती अनुसरता येईल.]

५५. जेव्हा रीतसर मुद्रांकित केलेल्या कोणत्याही ऋणपत्राचे तीच शब्दयोजना असलेले ऋणपत्र काढून त्याद्वारे नवीकरण करण्यात आले असेल तेव्हा, एक महिन्याच्या आत अर्ज केला तर, जिल्हाधिकारी, मूळ ऋणपत्रावरील मुद्रांकाचे मूल्य किंवा नवीन ऋणपत्रावरील मुद्रांकाचे मूल्य यांपैकी जी कमी असेल तेवढी रक्कम असे ऋणपत्र काढणाऱ्या व्यक्तीला परत करील : विवक्षित ऋणपत्रांचे नवीकरण केल्यावर सवलत.

परंतु, मूळ ऋणपत्र जिल्हाधिकाऱ्यापुढे हजर केले असले पाहिजे आणि राज्य शासन निदेशित करील अशा रीतीने ते रद्द करून घेतलेले असले पाहिजे.

**स्पष्टीकरण.**—अशा ऋणपत्राचे, त्यात पुढील बदल असले तरी, या कलमाच्या अर्थानुसार मूळचीच शब्दयोजना करून नवीकरण करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

(क) प्रतिभूत केलेली एकूण रक्कम तेवढीच ठेवून, एका मूळच्या ऋणपत्राऐवजी दोन किंवा त्याहून अधिक ऋणपत्रे काढणे;

(ख) प्रतिभूत केलेली एकूण रक्कम तेवढीच ठेवून, दोन किंवा त्याहून अधिक मूळच्या ऋणपत्रां-ऐवजी एक ऋणपत्र काढणे;

(ग) नवीकरणाच्या वेळी मूळ धारकाच्या नावाच्या बदली दुसऱ्या धारकाचे नाव घालणे; आणि

(घ) त्याच्या व्याजदरात किंवा रकमेच्या प्रदानाच्या दिनांकात फेरबदल करणे.

## प्रकरण ६ वे

### निर्देशन आणि पुनरीक्षण

५६. (१) प्रकरण ४ थे व प्रकरण ५ वे याखाली [3][व कलम २६ च्या पहिल्या परंतुकाच्या खंड (क) खाली] जिल्हाधिकाऱ्याला वापरता येणाऱ्या शक्ती, या सर्व बाबतीत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाच्या नियंत्रणास अधीन असतील. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाचे नियंत्रण व त्याच्याकडे प्रकरणाचे परिकथन पाठवणे.

(२) जर कलम ३१, कलम ४०, किंवा कलम ४१ खाली कार्यवाही करणाऱ्या कोणत्याही जिल्हा-धिकाऱ्यास, एखाद्या संलेखावर शुल्क म्हणून किती रक्कम आकारणीयोग्य आहे याबाबत शंका असली तर, त्यास त्या प्रकरणाचे परिकथन तयार करून त्यावरील स्वत:च्या अभिप्रायासह ते मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाकडे निर्णयाकरता निर्देशित करता येईल.

(३) असे प्राधिकरण त्या प्रकरणावर विचार करून आपल्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि जिल्हाधिकारी अशा निर्णयानुरूप शुल्क (काही असल्यास) निर्धारित करण्याची व ते आकारण्याची कार्यवाही करील.

---

१. १९५८ चा अधिनियम १९, कलम ९ द्वारे समाविष्ट केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. १९७३ चा अधिनियम १३, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

३. १९०४ चा अधिनियम ५, कलम ७ द्वारे समाविष्ट केले.

मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाकडून उच्च न्यायालयाकडे पाठवण्यात येणारे प्रकरणाचे परिकथन.

५७. (१) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणास, कलम ५६, पोट-कलम (२) खाली त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या किंवा अन्यथा त्याच्या निदर्शनास येणाऱ्या कोणत्याही प्रकरणाचे परिकथन तयार करून असे प्रकरण त्यावरील आपल्या अभिप्रायासह पुढीलप्रमाणे निर्देशित करता येईल :—

[१][ (क्) जर ते एखाद्या राज्यात उद्भवले असेल तर, त्या राज्याच्या उच्च न्यायालयाकडे;

[२][ (ख्) जर ते दिल्ली या संघ राज्यक्षेत्रात उद्भवले असेल तर, दिल्ली उच्च न्यायालयाकडे; ]

[३][ (ग्) जर ते अरुणाचल प्रदेश किंवा मिझोराम या संघ राज्यक्षेत्रात उद्भवले असेल तर, गोहत्ती उच्च न्यायालयाकडे (आसाम, नागालँड, मेघालय, मणिपूर आणि त्रिपुरा उच्च न्यायालय) ; ]

(घ्) जर ते अंदमान व निकोबार बेटे या संघ राज्यक्षेत्रात उद्भवले असेल तर, कलकत्ता येथील उच्च न्यायालयाकडे; आणि [४]* *

(ङ) जर ते [५][लक्षद्वीप] बेटावर उद्भवले असेल तर, केरळ उच्च न्यायालयाकडे;

[६][ (ङङ) जर ते चंदीगढ या संघ राज्यक्षेत्रामध्ये उद्भवले असेल तर, पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाकडे; ]

[७][ (च्) जर ते दादरा व नगरहवेली या संघ राज्यक्षेत्रामध्ये उद्भवले असेल तर, मुंबई उच्च न्यायालयाकडे.] ]

(२) असे प्रकरण ज्याच्याकडे निर्देशित करण्यात आले असेल ते उच्च न्यायालय [८]* * * याचे तीनपेक्षा कमी नाहीत इतके न्यायाधीश अशा प्रत्येक प्रकरणाचा निर्णय करतील आणि त्यांच्यात मतभेद झाल्यास, बहुमताप्रमाणे निर्णय होईल.

परिकथित प्रकरणासंबंधी अधिक तपशील मागवण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

५८. अशा प्रकरणात अंतर्भूत असलेली परिकथने ही त्या प्रकरणामुळे उपस्थित झालेल्या प्रश्नांचा आपणास निर्णय करता येईल इतपत पुरेशी आहेत याबद्दल उच्च न्यायालयाची [९]* * * खात्री झाली नाही तर, त्या न्यायालयास, त्याबाबत ते निर्देशित करील अशी त्यात भर घालण्यासाठी किंवा तसा फेरबदल करण्यासाठी ते प्रकरण, ज्या महसूल प्राधिकरणाने त्या प्रकरणाचे परिकथन पाठवले होते त्याच्याकडे परत निर्देशित करता येईल.

परिकथन केलेले प्रकरण निकालात काढण्याची कार्यपद्धती.

५९. (१) [९]* * * उच्च न्यायालय, अशा कोणत्याही प्रकरणाची सुनावणी झाल्यावर, त्यामुळे उपस्थित झालेल्या प्रश्नांचा निर्णय करील आणि असा निर्णय ज्या मुद्यांवर आधारलेला असेल ते मुद्दे अंतर्भूत करून त्यावर आपला न्यायनिर्णय देईल.

(२) ते न्यायालय ज्या महसूल प्राधिकरणाने त्या प्रकरणाचे परिकथन पाठवले असेल त्याच्याकडे अशा निर्णयाची नक्कल न्यायालयाच्या मोहरेनिशी व प्रबंधकाच्या सहीनिशी पाठवील; आणि महसूल प्राधिकरण, अशी नक्कल मिळाल्यावर अशा न्यायनिर्णयानुरूप ते प्रकरण निकालात काढील.

अन्य न्यायालयांनी उच्च न्यायालयाकडे प्रकरणाचे परिकथन पाठवणे.

६०. (१) कलम ५७ मध्ये उल्लेखिलेल्या न्यायालयाहून अन्य कोणत्याही न्यायालयास, कलम ३५ च्या परंतुक (क) खाली कोणत्याही संलेखाच्या बाबतीत, भरावयाच्या शुल्काच्या रकमेबावत शंका असेल तर न्यायाधीशास, त्या प्रकरणाचे परिकथन तयार करून ते त्यावरील स्वतःच्या अभिप्रायासह, जर तो न्यायाधीश म्हणजे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण असते तर त्याने कलम ५७ खाली ते ज्याच्याकडे निर्देशित केले असते त्या उच्च न्यायालयाकडे [९]* * * निर्णयासाठी पाठवता येईल.

---

१. विधि अनुकूलन आदेश (क्र. २), १९५६ द्वारे मूळ खंड (क्) ते (छ्) ऐवजी दाखल केले.

२. जी. एस. आर. १९४४, राजपत्र असाधारण, भाग २ रा, विभाग ३ (दोन), पृष्ठ ५७८, दिनांक ३० ऑक्टोबर १९६८ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

३. जी. एस्. आर्. ७ (ई), भाग २ रा, विभाग ३ (एक), दिनांक २ जानेवारी १९७४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

४. १९६३ चा विनियम ६, कलम २ आणि अनुसूचीद्वारे वगळले.

५. जी. एस्. आर्. ४३२, राजपत्र असाधारण, भाग २ रा, विभाग ३१, दिनांक २१ ऑक्टोबर १९७४ द्वारे, "लखदीव, मिनिकॉय आणि अमिनदिवी बेटे" याऐवजी दाखल केले.

६. जी. एस. आर. १९४४, राजपत्र असाधारण, भाग २ रा, विभाग ३ (दोन), पृष्ठ ५४८, दिनांक ३० ऑक्टोबर १९६८ द्वारे समाविष्ट केले.

७. १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूचीद्वारे समाविष्ट केले.

८. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, "मुख्य न्यायालय किंवा न्यायिक आयुक्ताचे न्यायालय" हे शब्द वगळले.

९. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "मुख्य न्यायालय किंवा न्यायिक आयुक्ताचे न्यायालय" हे शब्द वगळले.

(२) ते न्यायालय त्या प्रकरणावर जणू काही ते कलम ५७ खाली निर्देशित केलेले असावे त्याप्रमाणे कार्यवाही करील आणि आपल्या न्यायनिर्णयाची एक नक्कल त्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी व प्रबंधकाच्या सहीनिशी मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाकडे पाठवील व तशीच दुसरी नक्कल निर्देशन करणाऱ्या न्यायाधीशाकडे पाठवील व तो न्यायाधीश ती प्रत मिळाल्यावर अशा न्यायनिर्णयाबरहुकूम ते प्रकरण निकालात काढील.

(३) पोटकलम (१) खाली करावयाची निर्देशने जेव्हा जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाने करावयाची असतात तेव्हा, ती जिल्हा न्यायालयामार्फत केली जातील आणि जेव्हा ती कोणत्याही दुय्यम महसूल न्यायालयाने करावयाची असतात तेव्हा ती निकटच्या वरिष्ठ न्यायालयामार्फत केली जातील.

मुद्रांकांच्या पुरेसेपणाच्या संबंधाने न्यायालयाच्या विवक्षित निर्णयांचे पुनरीक्षण.

६१. (१) जेव्हा आपल्या दिवाणी किंवा महसूल अधिकारितेचा वापर करणारे कोणतेही न्यायालय किंवा कोणतेही फौजदारी न्यायालय, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५)-प्रकरण १२ वे किंवा प्रकरण ३६ वे याखालील कोणत्याही कार्यवाहीत, एखादा संलेख रीतसर मुद्रांकित केलेला म्हणून किंवा मुद्रांकाची जरूरी नसलेला म्हणून किंवा कलम ३५ खाली शुल्क व दंड भरल्यावर तो पुराव्यात स्वीकारण्याबद्दल आदेश देईल तेव्हा, ज्या न्यायालयात अशा प्रथम उल्लेखिलेल्या न्यायालयाविरुद्ध अपीले दाखल होऊ शकतात किंवा त्याच्याकडून प्रकरणे निर्देशित केली जातात त्या न्यायालयास, स्वतः होऊन किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या अर्जावरून असा आदेश विचारात घेता येईल.

(२) अशा रीतीने विचार केल्यानंतर कलम ३५ खाली शुल्क व दंड भरण्यात आल्याशिवाय किंवा भरलेल्या शुल्कापेक्षा व दंडापेक्षा अधिक शुल्क व दंड भरण्यात आल्याशिवाय तो संलेख पुरावा म्हणून स्वीकारला जावयास नको होता असे न्यायालयाचे मत पडले तर, ते तशा अर्थाचा निर्णय नमूद करू शकेल आणि त्या संलेखावर जे शुल्क आकारणीयोग्य असेल त्याची रक्कम ठरवू शकेल आणि असा संलेख त्यावेळी ज्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणात असेल तिला तो हजर करण्यास फर्मावू शकेल व तो हजर केल्यावर अवरुद्ध करून ठेवू शकेल.

(३) पोटकलम (२) खाली कोणताही निर्णय नमूद करण्यात आला असेल तेव्हा, तो नमूद करणारे न्यायालय, त्या निर्णयाची नक्कल जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि तो ज्या संलेखाशी संबंधित आहे तो संलेख जेथे अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल किंवा अन्यथा अशा न्यायालयाच्या कब्जात असेल तेथे त्याच्याकडेही असा संलेख पाठवील.

(४) त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, असा संलेख पुराव्यात स्वीकारण्यासंबंधीच्या आदेशात किंवा कलम ४२ खाली दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रात किंवा कलम ४३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही व्यक्तीने, अशा संलेखाच्या संबंधात मुद्रांक कायद्याच्या विरुद्ध कोणताही अपराध केला आहे असे त्याला वाटत असेल तर, त्याबद्दल त्या व्यक्तीविरुद्ध खटला भरता येईल :

परंतु,—

(क) अशा न्यायालयाच्या निर्णयानुसार कलम ३५ खालील संलेखाच्या संबंधात प्रदेय असलेली रक्कम (दंड व शुल्क धरून) जिल्हाधिकाऱ्याकडे चुकती करण्यात आली असेल त्याबाबतीत, योग्य शुल्क भरण्याचे चुकवण्याच्या उद्देशाने तो अपराध करण्यात आला होता असे त्याला वाटत नसेल तर, असा कोणताही खटला सुरू केला जाणार नाही;

(ख) अशा खटल्याची प्रयोजने खेरीजकरून एरव्ही, या कलमाखाली केलेल्या कोणत्याही निर्णयामुळे कोणताही संलेख पुराव्यात स्वीकारण्याबद्दलच्या कोणत्याही आदेशाच्या किंवा कलम ४२ खाली दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्राच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

## प्रकरण ७ वे

### फौजदारी अपराध व कार्यपद्धती

रीतसर मुद्रांकित न केलेला संलेख निष्पादित करणे, इत्यादीबद्दल दंड.

६२. (१) (क) [1][मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय] असलेले कोणतेही विनिमयपत्र, [2]* * * किंवा वचनचिठ्ठी रीतसर मुद्रांकित नसताना ते विकर्षणारी, करून देणारी, पुरःसृत करणारी, पृष्ठांकित किंवा हस्तांतरित करणारी अथवा साक्षीदार म्हणून नव्हे तर अन्यथा स्वाक्षरित करणारी अथवा स्वीकारासाठी किंवा पैसे मिळण्यासाठी सादर करणारी अथवा ते स्वीकारणारी, त्यावरून पैसे देणारी किंवा पैसे स्वीकारणारी अथवा ती कोणत्याही रीतीने परक्रामित करणारी; किंवा

(ख) शुल्क आकारण्यास पात्र असा अन्य कोणताही संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नसताना तो निष्पादित करणारी किंवा साक्षीदार म्हणून नव्हे तर अन्यथा स्वाक्षरित करणारी; किंवा

---

१. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "धनादेश" हा शब्द वगळला.

(ग) रीतसर मुद्रांकित नसलेल्या कोणत्याही प्रतिपत्राखाली मतदान करणारी किंवा मतदान करण्याचा प्रयत्न करणारी,

कोणतीही व्यक्ती अशा प्रत्येक अपराधाबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल :

परंतु, जेव्हा कलम ३५, कलम ४० किंवा कलम ६१ खाली कोणत्याही संलेखाच्या संबंधात कोणताही दंड भरण्यात आला असेल तेव्हा, अशी दंडाची रक्कम भरणाऱ्या व्यक्तीवर त्याच संलेखाबाबत या कलमाखाली मागाहून जो द्रव्यदंड (काही असल्यास) बसवला जाईल त्यामध्ये या दंडाच्या रकमेइतकी घट देण्यात येईल.

(२) जर एखादे शेअर-अधिपत्र रीतसर मुद्रांकित न करता देण्यात आले असेल तर, ते देणारी कंपनी तसेच, ते देण्याच्या वेळी जी व्यक्ती कंपनीचा कार्यकारी संचालक किंवा सचिव किंवा अन्य प्रमुख अधिकारी म्हणून असेल ती प्रत्येक व्यक्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

चिकट मुद्रांक रद्द न करण्याबद्दल शास्ती.

६३. ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम १२ खाली चिकट मुद्रांक रद्द करण्यास भाग पाडण्यात आले असून जी त्या कलमाद्वारे विहित केलेल्या रीतीने असा मुद्रांक रद्द करण्यास चुकली असेल ती व्यक्ती, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

कलम २७ च्या उपबंधांचे अनुपालन न करण्याबद्दल शास्ती.

६४. शासनाला ठकवण्याच्या उद्देशाने जी कोणतीही व्यक्ती,—

(क) ज्या संलेखात कलम २७ खाली आवश्यक असलेली सर्व वस्तुस्थिती व परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने मांडलेली नाही असा कोणताही संलेख निष्पादित करील; किंवा

(ख) कोणताही संलेख तयार करण्याच्या कामी किंवा त्या संबंधात नेमलेली किंवा निबद्ध असून अशी सर्व वस्तुस्थिती व परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने त्यात मांडण्याबाबत उपेक्षा करील किंवा मांडण्यास चुकेल; किंवा

(ग) या अधिनियमाखालील कोणतेही शुल्क किंवा दंड मिळण्यापासून शासनाला वंचित करण्याच्या दृष्टीने अन्य कोणतेही कृत्य करील,

ती पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

पावती देण्याचे नाकारण्याबद्दल व पावत्यांवरील शुल्क चुकवण्यासाठी कल्पलेल्या योजण्याबद्दल शास्ती.

६५. जी कोणतीही व्यक्ती,—

(क) कलम ३० खाली पावती देणे आवश्यक असता ती देण्याचे नाकारील किंवा त्याबाबत उपेक्षा करील; किंवा

(ख) शासनाला कोणतेही शुल्क देण्याच्या बाबतीत ठकवण्याच्या उद्देशाने, वीस रुपये एवढ्या रकमेपेक्षा किंवा मूल्यापेक्षा अधिक रकमेचे प्रदान किंवा तितक्या रकमेच्या मालाची सुपूर्दगी झालेली असताना, वीस रुपयांहून अधिक नसेल एवढ्या रकमेची किंवा मूल्याची पावती देईल, किंवा प्रदान झालेला पैसा वेगवेगळा दर्शवील किंवा सुपूर्द केलेला माल विभागून दर्शवील,

ती व्यक्ती शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

विमापत्र करून न देण्याबद्दल किंवा रीतसर मुद्रांकित न केलेले विमापत्र तयार करण्याबद्दल शास्ती.

६६. जी कोणतीही व्यक्ती,—

(क) कोणत्याही विमा-संविदेचे अधिमूल्य किंवा प्रतिफल स्वीकारून किंवा ते आपल्या जमेस घेऊन असे अधिमूल्य किंवा प्रतिफल स्वीकारल्यानंतर अथवा ते आपल्या जमेस घेतल्यानंतर एक महिन्याच्या आत अशा विम्याचे रीतसर मुद्रांकित केलेले विमापत्र तयार करणार नाही किंवा निष्पादित करणार नाही; किंवा

(ख) रीतसर मुद्रांकित न केलेले असे कोणतेही विमापत्र निष्पादित करील किंवा सुपूर्द करील अथवा अशा कोणत्याही विमापत्रावरील किंवा त्याच्या संबंधातील कोणत्याही पैशाचा भरणा करील किंवा तो हिशेबात धरील अथवा भरणा करण्याचे किंवा हिशेबात धरण्याचे कबूल करील,

ती दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

जी विनिमयपत्रे किंवा सागरी विमापत्रे संचरूपात काढावयाचे अभिप्रेत आहे ती पूर्ण संख्येत न काढण्याबद्दल शास्ती.

६७. एखादे [1][मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असे] विनिमयपत्र किंवा एखादे सागरी विमापत्र, अशा दोहोंचा किंवा अधिकांचा संच म्हणून विकर्षित किंवा निष्पादित करण्याचे अभिप्रेत असताना ते विकर्षित करणारी किंवा निष्पादित करणारी जी कोणतीही व्यक्ती त्याच वेळी संचामध्ये समाविष्ट असल्याचे अभिप्रेत असलेली सर्वच्या सर्व विपत्रे किंवा विमापत्रे रीतसर मुद्रांकित केलेल्या कागदावर विकर्षित किंवा निष्पादित करणार नाही ती एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

---

१. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे समाविष्ट केले.

६८. जी कोणतीही व्यक्ती,—

महसुलाची ठकवणूक करण्यासाठी विनिमयपत्र उत्तर० दिनांकित करण्या० बद्दल आणि अन्य हिकमतींबद्दल शास्ती.

(क) शासनाला शुल्काच्या बाबतीत ठकविण्याच्या उद्देशाने, कोणतेही विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी ज्या दिनांकास ती प्रत्यक्षात विकर्षिली किंवा केली होती त्या दिनांकानंतरचा दिनांक घालून विकर्षित करील किंवा देईल ; किंवा

(ख) असे विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी याप्रमाणे उत्तरदिनांकित असल्याचे माहीत असताना ती पृष्ठांकित करील, हस्तांतरित करील, पैसे भरून स्वीकारार्थ उपस्थापित करील किंवा असे विपत्र अथवा वचनचिठ्ठी स्वीकारील किंवा त्यावरून पैसे देईल किंवा पैसे स्वीकारील अगर कोणत्याही रीतीने ती परक्रामित करील; किंवा

(ग) तशाच उद्देशाने, या अधिनियमाद्वारे किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे ज्याविरुद्ध उपबंध करण्यात आलेला नाही अशी कोणतीही कृती करील, क्लृप्ती अथवा हिकमत लढवील किंवा त्यामध्ये निबद्ध असेल,

ती एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

६९. (क) मुद्रांकांची विक्री करण्यासाठी नियुक्त केलेली जी कोणतीही व्यक्ती, कलम ७४ खाली केलेल्या कोणत्याही नियमाची अवज्ञा करील, आणि

मुद्रांकांच्या विक्री-संबंधीच्या नियमांचा भंग करण्याबद्दल आणि अनधिकृत विक्री करण्याबद्दल शास्ती.

(ख) याप्रमाणे नियुक्त न केलेली जी कोणतीही व्यक्ती ([1][ दहा नवे पैसे किंवा पाच नवे पैसे] एवढ्या किंमतीच्या चिकट मुद्रांकाहून अन्य) कोणत्याही मुद्रांकाची विक्री करील किंवा तो विक्रीसाठी मांडील,

ती सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल तक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

७०. (१) या अधिनियमाखाली किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाखाली शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाबाबत जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा याबाबत [2][ [3][ राज्य शासन]] साधारणपणे किंवा जिल्हाधिकारी विशेषेकरून ज्या अन्य अधिकाऱ्यास प्राधिकृत करील त्या अधिकाऱ्याच्या मंजुरीवाचून कोणताही खटला भरला जाणार नाही.

खटला भरणे व चालवणे.

(२) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणास किंवा त्याने याबाबत सर्वसाधारणपणे किंवा विशेषेकरून प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असा कोणताही खटला स्थगित करता येईल किंवा असा कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(३) अशा कोणत्याही आपसमेळाची रक्कम, कलम ४८ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने वसूल करण्याजोगी असेल.

७१. इलाखाशहर दंडाधिकारी किंवा द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याहून ज्याच्या शक्ती कमी नसतील असा दंडाधिकारी याहून अन्य कोणताही दंडाधिकारी या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

दंडाधिकाऱ्याची अधिकारिता.

७२. कोणत्याही संलेखासंबंधी केलेल्या अशा कोणत्याही अपराधाची संपरीक्षा ज्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा इलाखाशहरात असा संलेख सापडेल तेथे, त्याचप्रमाणे ज्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा शहरात त्या त्या काळी अंमलात असलेल्या फौजदारी प्रक्रिया संहितेखाली अशा अपराधाची संपरीक्षा करता आली असती अशा कोणत्याही जिल्ह्यात किंवा शहरात करता येईल.

संपरीक्षेचे ठिकाण.

## प्रकरण ८ वे

### पूरक उपबंध

७३. ज्यांचे निरीक्षण केल्यामुळे काही शुल्क मिळण्याचे किंवा कोणत्याही शुल्कासंबंधात कपट किंवा कसूर झाल्याचे शाबीत होण्याची शक्यता आहे अथवा तसे उघडकीस येऊ शकेल अशा कोणत्याही नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, नोंदी, कागदपत्रे, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते ही ज्याच्या अभिरक्षेत असतील असा प्रत्येक लोक कार्यपदाधिकारी, जिल्हाधिकाऱ्याने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा प्रयोजनासाठी फी किंवा आकार न घेता, नोंदवह्या, पुस्तके, कागदपत्रे, दस्तऐवज व कार्यवृत्ते यांचे कोणत्याही योग्य वेळी निरीक्षण करण्याची आणि त्यातून तिला आवश्यक वाटतील अशा टिपा व उतारे घेण्याची परवानगी देईल.

तपासणीसाठी पुस्तके, वगैरे खुली असणे.

---

१. १९५८ चा अधिनियम १९, कलम १० द्वारे "एक आणा किंवा अर्धा आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासन" याऐवजी दाखल केले.
३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "उगराणी करणारे शासन" याऐवजी दाखल केले.

मुद्रांकांच्या विक्रीसंबंधी नियम करण्याची शक्ती.

७४. [१][राज्य शासनास,] [२]* * * पुढील गोष्टींचे विनियमन करण्यासाठी नियम करता येतील :—

(क) मुद्रांक व मुद्रांकित कागदपत्रे यांचा पुरवठा व विक्री,

(ख) अनन्येकरून ज्या व्यक्तींनी विक्री करावयाची असते अशा व्यक्ती, आणि

(ग) अशा व्यक्तींची कर्तव्ये व त्यांचे पारिश्रमिक :

परंतु, अशा नियमांमुळे [३][दहा नये पैसे किंवा पाच नये पैसे एवढ्या किंमतीच्या] चिकट मुद्रांकांच्या विक्रीवर निर्बंध येणार नाही.

सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

७५. [१][राज्य शासनास] सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील व त्यांचा भंग केल्याबद्दल कोणत्याही बाबतीत पाचशे रुपयांहून अधिक होणार नाही असा द्रव्यदंड अशा नियमांद्वारे विहित करता येईल.

नियमांचे प्रकाशन.

७६. [४][(१) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील.]

(२) या कलमाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे प्रकाशित केलेले सर्व नियम, याप्रमाणे प्रकाशित झाल्यावर ते जणू काही या अधिनियमाखाली अधिनियमित केलेले असावेत त्याचप्रमाणे अंमलात येतील.

विवक्षित शक्तींचे प्रत्यायोजन.

[५][७६क. [६][ [७]* * * * राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे],—

(क) कलमे २(९), ३३(३) (ख), ७०(१), ७४ व ७८ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आपल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाकडे, आणि

(ख) कलमे ४५(१), (२), ५६(१) व ७०(२) यांद्वारे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणास प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दुय्यम महसूल प्राधिकरणाकडे

प्रत्यायोजित करता येतील.]

न्यायालय फीबाबत व्यावृत्ती.

७७. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालय फीसंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली आकारणीयोग्य अशा शुल्कांना बाध येतो असे मानले जाणार नाही.

[८][विवक्षित मुद्रांकांबाबत व्यावृत्ती.]

[८][७७क. चार आणे किंवा त्याच्या पटीइतक्या मूल्याभिधानाचे सर्व मुद्रांक पंचवीस नये पैसे एवढ्या किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या पटीतील रकमेइतक्या मूल्याचे असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांपुरते ते विधिग्राह्य असतील.]

अधिनियमाचा अनुवाद करून त्याची स्वस्त दराने विक्री करणे.

७८. प्रत्येक राज्य शासन, आपल्या प्रशासनाखालील क्षेत्रांमध्ये या अधिनियमाचा प्रमुख देशी भाषांतील अनुवाद, प्रत्येक प्रतीस [९][पंचवीस नये पैसे] याहून अधिक नाही अशा किंमतीला विकण्याची व्यवस्था करील.

७९. [निरसन.] निरसन व विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०)—कलम ३ व २ री अनुसूची यांद्वारे निरसित.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "उगराणी करणारे शासन" याऐवजी दाखल केले.

२. अनुकूलन आदेश, १९३७ याद्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांच्या नियंत्रणाच्या अधीनतेने" हे शब्द गाळले.

३. १९५८ चा अधिनियम १९, कलम १० द्वारे "एक आणा किंवा अर्धा आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी दाखल केले.

५. १९१४ चा अधिनियम ४, कलम २ व अनुसूची, भाग १ ला याद्वारे समाविष्ट केले.

६. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासन स्थानिक अधिकृत राजपत्रातील अधिसूचनेद्वारे .... करील" याऐवजी दाखल केले.

७. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्र शासन" भारत शासन अधिनियम, १९३५ च्या कलम १२४ (एक) च्या उपबंधांच्या अधीनतेने" हे शब्द, कंस व आकडे वगळले.

८. १९५८ चा अधिनियम १९, कलम ११ द्वारे समाविष्ट केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

९. १९५८ चा अधिनियम १९, कलम १२ द्वारे "चार आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

## अनुसूची १ ली

### संलेखांवरील मुद्रांक शुल्क

(कलम ३ पहा)

| संलेखाचे वर्णन (१) | योग्य मुद्रांक शुल्क (२) |
| --- | --- |
| १. **अभिस्वीकृति.**—वीस रुपयांहून अधिक रकमेच्या किंवा मूल्याच्या कोणत्याही ऋणाचा पुरावा म्हणून कोणत्याही पुस्तकात (बँकरच्या पासबुकाखेरीज अन्य) किंवा एखाद्या स्वतंत्र कागदावर ऋणकोने किंवा ऋणकोच्या वतीने लिहून किंवा सही करून अभिस्वीकृति दिलेली असून असे पुस्तक किंवा कागद धनकोच्या कब्जात ठेवलेला असेल तेव्हा, ती अभिस्वीकृति :<br>परंतु, अशी अभिस्वीकृति देताना तीत ऋण फेडण्याबाबतचे कोणतेही वचन किंवा व्याज देण्याबाबतची किंवा कोणताही माल किंवा अन्य मालमत्ता स्वाधीन करण्याबाबतची कोणतीही अट अंतर्भूत असता कामा नये. | एक आणा. |
| २. **प्रशासन बंधपत्र.**—यामध्ये 'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १८८५' (१८८५ चा १०) याचे कलम २५६, 'सरकारी बचत बँक अधिनियम, १८७३' (१८७३ चा ५) याचे कलम ६, 'संप्रमाण व प्रशासन अधिनियम, १८८१' (१८८१ चा ५) याचे कलम ७८ किंवा 'उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९' (१८८९ चा ७) याचे कलम ९ किंवा १० याखाली देण्यात आलेले बंधपत्र समाविष्ट आहे— | |
| (क) जेथे रक्कम १,००० रुपयांहून अधिक नसेल तेथे .. | तेवढयाच रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क. |
| (ख) अन्य कोणत्याही बाबतीत .. .. | पाच रुपये. |
| ३. **दत्तकपत्र.**—म्हणजे दत्तकग्रहणाची नोंद करणारा किंवा दत्तक घेण्याचा प्राधिकार प्रदान करणारा किंवा ज्याद्वारे असा प्राधिकार प्रदान झाला असे दिसते असा (मृत्युपत्राहून अन्य) कोणताही संलेख. | दहा रुपये. |
| **अधिवक्ता.**—अधिवक्ता म्हणून नोंद (क्रमांक ३०) पहा. | |
| ४. **शपथपत्रे.**—यामध्ये शपथग्रहणाच्या ऐवजी दृढकथन किंवा अधिकथन करण्यास ज्या व्यक्तींना कायद्याद्वारे मुभा दिली गेली आहे अशा व्यक्तींच्या बाबतीतील दृढकथन किंवा अधिकथन समाविष्ट आहे.<br>**सूट**<br>दृढकथन किंवा अधिकथन हे जेव्हा,—<br>[1][(क) [2]'भारतीय भूसेना अधिनियम, १९११' (१९११ चा ८) [3][किंवा [4]'भारतीय वायुसेना अधिनियम, १९३२' (१९३२ चा १४)] याखाली नावनोंदणीची शर्त म्हणून; ]<br>(ख) कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या अधिकाऱ्यापुढे दाखल करण्याच्या किंवा उपयोगात आणावयाच्या तात्कालिक प्रयोजनासाठी; किंवा<br>(ग) कोणत्याही व्यक्तीला कोणतेही निवृत्तिवेतन किंवा धर्मादाय भत्ता मिळणे शक्य व्हावे एवढयाच प्रयोजनासाठी;<br>लेखी केलेले असेल तेव्हा. | एक रुपया. |

१. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे मूळ खंडाऐवजी दाखल केले.
२. आता 'सेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४६) पहा.
३. १९३२ चा अधिनियम १४, कलम १३० व अनुसूचीद्वारे समाविष्ट केले.
४. आता 'वायुसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४५) पहा.

| (१) | (२) |
|---|---|
| [1][५. करारनामा किंवा करारयादी,— | |
| (क्) विनिमयपत्राच्या विक्रीसंबंधी असेल तर; .. | दोन आणे. |
| (ख्) सरकारी रोखे अथवा एखाद्या निगमित कंपनीतील किंवा अन्य निगम-निकायातील शेअर यांच्या विक्रीसंबंधी असेल तर; | दहा रुपये एवढ्या कमाल मर्यादेपर्यंत रोख्याच्या किंवा शेअरच्या मूल्याच्या १०,००० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे एक आणा. |
| (ग्) जर अन्यथा उपबंधित करण्यात आले नसेल तर .. | आठ आणे. |
| **सूट** | |
| **करारनामा किंवा करारयादी,—** | |
| (क्) केवळ मालाच्या किंवा व्यापारी मालाच्या विक्रीसाठी केलेला असेल व नोंद क्रमांक ४३ खाली शुल्क आकारण्यास पात्र अशी अधिटिप्पणी किंवा ज्ञापन नसेल तेव्हा; | |
| (ख्) कोणत्याही कर्जासाठी किंवा कर्जाच्या संबंधात केंद्र शासनाकडे निविदांच्या स्वरूपात दिलेला असेल तेव्हा; | |
| [2]* * *] | |
| **भाडेपट्टयाने देण्याचा करारनामा.**—कृपया भाडेपट्टा (क्रमांक ३५) पहा. | |
| [3][६. **हक्कलेखनिक्षेप, तारणनिक्षेप किंवा तारण यासंबंधीचा करारनामा म्हणजे,—** | |
| (१) हक्कलेख किंवा (विकाऊ रोख्याहून अन्य) कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेवर हक्क प्रस्थापित करणारे किंवा अशा हक्काचा पुरावा असणारे संलेख यांचा निक्षेप; किंवा | |
| (२) जंगम मालमत्तेचा तारणनिक्षेप किंवा तारण,— | |
| कर्जाच्या रूपाने दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या परतफेडीबद्दलची अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाबद्दलची प्रतिभूती म्हणून असा निक्षेप, तारणनिक्षेप किंवा तारण करण्यात आले असेल अशा बाबतीत— | |
| (क्) जर असे कर्ज किंवा ऋण मागणीवरून किंवा त्या कराराचा पुरावा असणाऱ्या संलेखाच्या दिनांकापासून तीन महिन्यांनंतर फेडावयाचे असेल तर; | प्रतिभूत केलेल्या रकमेच्या विनिमयापत्रावरील [क्रमांक १३ (ख्)] शुल्काएवढे शुल्क. |
| (ख्) जर असे कर्ज किंवा ऋण अशा संलेखाच्या दिनांकापासून तीन महिन्यांहून जास्त नाही इतक्या मुदतीने फेडावयाचे असेल तर. | प्रतिभूत केलेल्या रकमेच्या विनिमयपत्रावर [क्रमांक १३ (ख्)] प्रदेय असलेल्या शुल्काच्या निम्मे शुल्क. |
| **सूट** | |
| मालाचा तारणनिक्षेप किंवा तारण यासंबंधीचा संलेख साक्षांकित केलेला नसेल तर. ] | |
| ७. **मुखत्यारीची अंमलबजावणी म्हणून नियुक्ती.**—मृत्युपत्राहून अन्य कोणत्याही संलेखाद्वारे केलेली नियुक्ती—मग ती विश्वस्ताची असो किंवा स्थावर वा जंगम मालमत्तेची असो. | पंधरा रुपये. |
| ८. **मूल्यन किंवा मूल्यांकन.**—दाव्याच्या ओघात न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नव्हे तर अन्यथा केलेले,— | |
| (क्) ती रक्कम १,००० रुपयांहून अधिक नसेल त्या बाबतीत; | अशा रकमेच्या बंधपत्रावरील (क्रमांक १५) शुल्काएवढे शुल्क. |
| (ख्) अन्य कोणत्याही बाबतीत .. | पाच रुपये. |

१. १९९० चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे मूळ अनुच्छेदाऐवजी दाखल केले.
२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे खंड (ग्) वगळला.
३. १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे मूळ अनुच्छेदाऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| **सूट** | |
| (क्) केवळ एकाच पक्षकाराच्या माहितीसाठी केलेले आणि पक्षकारांमध्ये करारामुळे किंवा कायद्याच्या प्रवर्तनामुळे कोणत्याही रीतीने बंधनकारक नसणारे मूल्यन किंवा मूल्यांकन; | |
| (ख्) एखाद्या जमीनमालकाला खंड म्हणून द्यावयाची रक्कम विनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी केलेले पिकाचे मूल्यन. | |
| ९. **शिकाऊ उमेदवारी विलेख.**—यामध्ये कोणताही पेशा, उदीम किंवा कामधंदा शिकवण्याकरिता कोणत्याही मालकाकडे ठेवलेल्या शिकाऊ उमेदवारांच्या, लिपिकांच्या किंवा नोकराच्या नोकरीसंबंधीचा किंवा शिकवणीसंबंधीचा, व्यवसाय उमेदवारी कराराहून (क्रमांक ११) अन्य असा प्रत्येक लेख समाविष्ट आहे. | पाच रुपये. |
| **सूट** | |
| दंडाधिकाऱ्याने [१]"शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १८५०' खाली करून दिलेले किंवा ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीस सार्वजनिक धर्मादाय संस्थेकडून किंवा तिच्या खर्चाने शिकाऊ उमेदवारीसाठी पाठविण्यात आलेले असेल असे कोणत्याही शिकाऊ उमेदवारीसंबंधीचे संलेख. | |
| १०. **एखाद्या कंपनीची संस्थापन नियमावली.** | पचवीस रुपये. |
| **सूट** | |
| नफ्याकरता स्थापन झालेल्या व [२]"भारतीय कंपनी अधिनियम, १८८२' (१८८२ चा ६) याच्या कलम २६ खाली नोंदणी केलेल्या कोणत्याही अधिसंघाची नियमावली. | |
| कंपनीचा संस्थापन समयलेख (क्रमांक ३९) देखील पहा. | |
| ११. **व्यवसाय उमेदवारी करार.**—ज्याद्वारे एखादी व्यक्ती कोणत्याही उच्च न्यायालयात न्यायवादी म्हणून प्रवेश मिळविण्याकरिता प्रथमतः लिपिक म्हणून नोकरी करण्यासाठी बांधली जाते असा व्यवसाय उमेदवारी करार किंवा संविदा. | दोनशे पन्नास रुपये. |
| **अभिहस्तांकन.**—अभिहस्तांतरणपत्र (क्रमांक २३), हस्तांतरणपत्र (क्रमांक ६२) आणि, प्रकरणपरत्वे, भाडेपट्टयाचे हस्तांतरणपत्र (क्रमांक ६३) पहावे. | |
| **मुखत्यार.**—मुखत्यार म्हणून नोंद (क्रमांक ३०) व मुख्यत्यारनामा (क्रमांक ४८) पहावे. | |
| **दत्तक अनुज्ञापत्र.**—दत्तकपत्र (क्रमांक ३) पहावे. | |
| १२. **निवाडा.**—म्हणजे एखाद्या दाव्याच्या ओघात न्यायालयाच्या आदेशाद्वारे नव्हे तर अन्यथा लवादाकडे किंवा पंचाकडे एखादी बाब निर्देशित करण्यात आल्यावरून, त्याने दिलेला वाटणीचा निदेश देणारा निवाडा सोडून अन्य कोणताही लेखी निर्णय— | |
| (क्) निवाडा ज्याच्याशी संबंधित आहे अशा मालमत्तेची निवाड्यात दिल्याप्रमाणे किंमत किंवा मूल्य हे १,००० रुपयांहून अधिक नसेल त्या बाबतीत; | अशा रकमेच्या बंधपत्रावरील (क्रमांक १५) शुल्काएवढे शुल्क. |
| (ख्) अन्य कोणत्याही बाबतीत .. .. | पाच रुपये. |
| **सूट** | |
| [३]"मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १८७३' (१८७३ चा मुंबई अधिनियम ६) कलम ८१ किंवा | |
| 'मुंबई वंशपरंपरा पद अधिनियम, १८७४' (१८७४ चा मुंबई अधिनियम ३) कलम १८ खालील निवाडा. | |

१. आता 'शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१' (१९६१ चा ५२) पहा.
२. आता 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) पहा.
३. आता 'मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१' (१९०१ चा मुंबई अधिनियम ३) पहा.

| (१) | (२) |
|---|---|
| १३. विनिमयपत्र.—बंधपत्र, बँक नोट किंवा चलनी नोट नसलेले [1][ कलम २(२) * * * द्वारे व्याख्या केल्याप्रमाणे ] विनिमयपत्र— | |
| [2]* * * * * * * | |
| [3][(ख) मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असेल त्या बाबतीत,— | |
| (एक) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर तीन महिन्यांहून अधिक नाही इतक्या मुदतीने प्रदेय असेल तेव्हा— | |
| जर विपत्राची किंवा वचनचिठ्ठीची रक्कम ५०० रुपयांहून अधिक नसेल तर; | एक रुपया [4][ पंचवीस नवे पैसे ]. |
| जर ती ५०० रुपयांहून अधिक परंतु १,००० रुपयांहून अधिक नसेल तर; | दोन रुपये [5][ पन्नास नवे पैसे ]. |
| आणि, १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा जास्तीच्या दर १,००० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे; | दोन रुपये [5][ पन्नास नवे पैसे ]. |
| (दोन) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर तीन महिन्यांहून अधिक परंतु सहा महिन्यांहून अधिक नाही एवढ्या मुदतीने प्रदेय असेल तेव्हा— | |
| जर विपत्राची किंवा वचनचिठ्ठीची रक्कम ५०० रुपयांहून अधिक नसेल तर; | दोन रुपये [5][ पन्नास नवे पैसे]. |
| जर ती ५०० रुपयांहून अधिक परंतु १,००० रुपयांहून अधिक नसेल तर; | पाच रुपये. |
| आणि १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा जास्तीच्या दर १,००० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे; | पाच रुपये. |
| (तीन) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर सहा महिन्यांहून अधिक परंतु नऊ महिन्यांहून अधिक नाही एवढ्या मुदतीने प्रदेय असेल तेव्हा— | |
| जर विपत्राची किंवा वचनचिठ्ठीची रक्कम ५०० रुपयांहून अधिक नसेल तर; | तीन रुपये [6][पंचाहत्तर नवे पैसे]. |
| जर ती ५०० रुपयांहून अधिक परंतु १,००० रुपयांहून अधिक नसेल तर; | सात रुपये [5][पन्नास नवे पैसे]. |
| आणि १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा जास्तीच्या दर १,००० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे; | सात रुपये [5][पन्नास नवे पैसे]. |
| (चार) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर नऊ महिन्यांहून अधिक परंतु एक वर्षाहून अधिक नाही एवढ्या मुदतीने प्रदेय असेल तेव्हा— | |
| जर विपत्राची किंवा वचनचिठ्ठीची रक्कम ५०० रुपयांहून अधिक नसेल तर; | पाच रुपये. |
| जर ती ५०० रुपयांहून अधिक परंतु १,००० रुपयांहून अधिक नसेल तर; | दहा रुपये. |
| आणि १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा जास्तीच्या दर १,००० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे; | दहा रुपये. |

१. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे "आणि (३)" हा मजकूर वगळला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे नोंद (क) वगळली.

३. १९५६ चा अधिनियम ७६, कलम ४ आणि २ री अनुसूची यांद्वारे (ख) व (ग) या बाबींऐवजी दाखल केले (१ फेब्रुवारी १९५७ रोजी व तेव्हापासून).

४. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "चार आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "आठ आणे" याऐवजी घातले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

६. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "बारा आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) |
|---|---|
| (ग) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर एक वर्षाहून अधिक मुदतीने प्रदेय असेल तेव्हा,— | |
| जर विपत्राची किंवा वचनचिठ्ठीची रक्कम ५०० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; | दहा रुपये. |
| जर ती ५०० रुपयांपेक्षा अधिक परंतु, १,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; आणि | वीस रुपये. |
| १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा जास्तीच्या दर १,००० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे.] | वीस रुपये. |
| **१४. भरणपत्र.**—(थेट भरणपत्र धरून)— | [१][एक रुपया.] टीप.—भरणपत्र निरनिराळ्या भागांमध्ये काढले असल्यास, प्रत्येक संचावर त्याचा योग्य तो मुद्रांक असला पाहिजे. |

**सूट**

(क) जेव्हा भरणपत्रात वर्णन केलेला माल [२]"भारतीय बंदरे अधिनियम, १८८९" (१८८९ चा १०) याखाली व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही बंदराच्या सीमांमध्ये एका जागी स्वीकारला जातो आणि त्याच बंदराच्या सीमांमधील दुसऱ्या एखाद्या जागी सुपूर्द केला जातो तेव्हा असे भरणपत्र;

(ख) [३][भारताबाहेर] निष्पादित केलेले आणि [३][भारतात] सुपूर्द करावयाच्या मालमत्तासंबंधीचे भरणपत्र.

**१५. बंधपत्र.**—[कलम २ (५) द्वारे व्याख्या केल्याप्रमाणे] ऋणपत्र (क्रमांक २७) नसलेले आणि या अधिनियमाद्वारे किंवा 'न्यायालय फी अधिनियम, १८७०' (१८७० चा ७) याद्वारे अन्यथा उपबंधित न केलेले बंधपत्र—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिभूत केलेली रक्कम किंवा मूल्य १० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; | | | | | दोन आणे. |
| १० रुपयांपेक्षा अधिक परंतु ५० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; | | | | .. | चार आणे. |
| ५० | वरीलप्रमाणे | १०० | वरीलप्रमाणे | .. | आठ आणे. |
| १०० | वरीलप्रमाणे | २०० | वरीलप्रमाणे | .. | एक रुपया. |
| २०० | वरीलप्रमाणे | ३०० | वरीलप्रमाणे | .. | एक रुपया आठ आणे. |
| ३०० | वरीलप्रमाणे | ४०० | वरीलप्रमाणे | .. | दोन रुपये. |
| ४०० | वरीलप्रमाणे | ५०० | वरीलप्रमाणे | .. | दोन रुपये आठ आणे. |
| ५०० | वरीलप्रमाणे | ६०० | वरीलप्रमाणे | .. | तीन रुपये. |
| ६०० | वरीलप्रमाणे | ७०० | वरीलप्रमाणे | .. | तीन रुपये आठ आणे. |
| ७०० | वरीलप्रमाणे | ८०० | वरीलप्रमाणे | .. | चार रुपये. |
| ८०० | वरीलप्रमाणे | ९०० | वरीलप्रमाणे | .. | चार रुपये आठ आणे. |
| ९०० | वरीलप्रमाणे | १,००० | वरीलप्रमाणे | .. | पाच रुपये. |
| आणि १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा दर ५०० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे. | | | | | दोन रुपये आठ आणे. |

प्रशासन बंधपत्र (क्र. २), नौतारण बंधपत्र (क्र. १६), सीमाशुल्क बंधपत्र (क्र. २६), हानिरक्षण बंधपत्र (क्र. ३४), नौभार बंधपत्र (क्र. ५६), प्रतिभूती बंधपत्र (क्र. ५७) पहावे.

**सूट**

बंधपत्र, जेव्हा—

(क) 'बंगाल जलसिंचन अधिनियम, १८७६' (१८७६ चा बंगाल अधिनियम ३) कलम ९९ अनुसार केलेल्या नियमांखाली नामनिर्देशित केलेल्या प्रमुखांनी त्या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये योग्य रीत्या पार पाडण्याबाबत त्यांनी;

---

१. १९८५ चा अधिनियम ३२, कलम ५७ (क) द्वारे, "पंचवीस नवे पैसे" याऐवजी दाखल केले.
२. 'भारतीय बंदरे अधिनियम, १९०८' (१९०८ चा १५) यामधील संबद्ध उपबंध पहा.
३. १९५५ चा अधिनियम, ४३, कलम २ द्वारे "राज्ये" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला.

| (१) | (२) |
|---|---|
| (ख) धर्मार्थ दवाखाना किंवा रुग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे अन्य कोणतेही प्रयोजन यांना देण्यात आलेल्या खाजगी अभिदानांपासून मिळणारे स्थानिक उत्पन्न दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने, | |
| निष्पादित केलेले असेल तेव्हा. | |
| १६. **नौतारण बंधपत्र.**—म्हणजे, ज्या संलेखाद्वारे समुद्रपर्यटन करणाऱ्या जहाजाचा नौकाधिपती जहाजांचे जतन करण्याकरिता किंवा त्या जहाजाचा जलप्रवास चालू राहणे शक्य व्हावे म्हणून त्या जहाजाच्या प्रतिभूतीवर पैसे कर्जाऊ घेतो असा कोणताही संलेख. | तितक्याच रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क. |
| १७. **रद्द करणे.**—त्यासंबंधीचा संलेख (ज्या संलेखाद्वारे तत्पूर्वी केलेला कोणताही संलेख रद्द केला असेल तो धरून) साक्षांकित केलेला असेल व त्यासाठी अन्यथा उपबंध केला नसेल तर. | पाच रुपये. |
| हक्कसोडपत्र (क्र. ५५), संव्यवस्थापत्र रद्द करणे (क्र. ५८ ख), भाडेपट्टयाचे प्रत्यर्पण (क्र. ६१), न्याय व्यवस्था रद्द करणे (क्र. ६४ ख) हे देखील निर्देश पहावे. | |
| १८. **विक्रीचे प्रमाणपत्र.**—(वेगवेगळा लाट म्हणून विकलेल्या प्रत्येक मालमत्तेच्या संबंधात) दिवाणी किंवा महसुली न्यायालयाने अथवा जिल्हाधिकाऱ्याने अथवा अन्य एखाद्या महसुली अधिकाऱ्याने जाहीर लिलावात विकलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या खरेदीदारास दिलेले विक्रीचे प्रमाणपत्र— | |
| (क) खरेदीची किंमत १० रुपयांहून अधिक नसेल त्या बाबतीत; | [1][पंधरा नवे पैसे.] |
| (ख) खरेदीची किंमत १० रुपयांहून अधिक परंतु २५ रुपयांहून अधिक नसेल त्या बाबतीत; | पंचवीस नवे पैसे. |
| (ग) अन्य कोणत्याही बाबतीत .. .. | केवळ खरेदी किमतीच्या रकमेइतक्या प्रतिफलार्थ केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्का-इतके शुल्क. |
| १९. **प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज.**—प्रमाणपत्र किंवा दस्तऐवज धारण करणाऱ्याचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा, कोणत्याही निगमित कंपनीतील किंवा अन्य निगम-निकायातील किंवा त्यांचे कोणतेही शेअर्स, स्क्रिप किंवा पुंजरोखे यांवरील अधिकार किंवा अशा कंपनीतील किंवा निगम-निकायातील किंवा त्याचे शेअर्स, स्क्रिप किंवा पुंजरोख यांचा मालक होण्याविषयीचा हक्क यांचा पुरावा देणारे प्रमाणपत्र किंवा दस्तऐवज. | [1][पंधरा नवे पैसे.] |
| शेअर-वाटप पत्र (क्रमांक ३६) देखील पहावे. | |
| २०. **नौभाटक लेख.**—म्हणजे, ज्याद्वारे एखादे जलयान किंवा त्याचा एखादा विनिर्दिष्ट प्रमुख भाग, तो भाड्याने घेणाऱ्याच्या विशिष्ट कामांकरता भाड्याने दिला जातो असा (खेप-आगबोटीच्या भाड्याचा करार वगळून) कोणताही संलेख—मग त्यात दंडविषयक खंडाचा समावेश असो किंवा नसो. | एक रुपया. |

[2]* * * * *

१. १९२३ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "एक आणा" याऐवजी दाखल केले.
२. १९२७ चा अधिनियम ५, कलम ५ द्वारे अनुच्छेद २१ वगळला.

| (१) | (२) |
|---|---|
| २२. **तडजोडनामा.**—म्हणजे, ज्याद्वारे एखादा ऋणको आपली मालमत्ता आपल्या धनकोंच्या लाभासाठी अभिहस्तांकित करतो अथवा ज्याद्वारे अशा धनकोंच्या कर्जासंबंधाने तडजोड म्हणून किंवा लाभांशा-दाखल द्यावयाची रक्कम चुकती करण्याबद्दल त्यांना हमी देण्यात येते, अथवा ज्याद्वारे धनकोंच्या लाभासाठी ऋणकोचा धंदा निरीक्षकाच्या देखरेखीखाली किंवा अनुज्ञप्तिपत्रानुसार चालू रहावा म्हणून व्यवस्था केली जाते असा, एखाद्या ऋणकोने निष्पादित केलेला संलेख. | दहा रुपये. |
| २३. **अभिहस्तांतरणपत्र.**—[कलम २(१०) द्वारे व्याख्या केल्या-प्रमाणे] क्रमांक ६२ खाली ज्यावर शुल्क आकारण्यात येते, किंवा ज्यास त्यापासून सूट मिळते असे हस्तांतरणपत्र नव्हे,— | |
| अशा अभिहस्तांतरणपत्राच्या प्रतिफलाची त्यात नमूद केलेली रक्कम किंवा मूल्य ५० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; | आठ आणे. |
| ५० रुपयांपेक्षा अधिक परंतु १०० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; | एक रुपया. |
| १०० वरीलप्रमाणे २०० वरीलप्रमाणे .. | दोन रुपये. |
| २०० वरीलप्रमाणे ३०० वरीलप्रमाणे .. | तीन रुपये. |
| ३०० वरीलप्रमाणे ४०० वरीलप्रमाणे .. | चार रुपये. |
| ४०० वरीलप्रमाणे ५०० वरीलप्रमाणे .. | पाच रुपये. |
| ५०० वरीलप्रमाणे ६०० वरीलप्रमाणे .. | सहा रुपये. |
| ६०० वरीलप्रमाणे ७०० वरीलप्रमाणे .. | सात रुपये. |
| ७०० वरीलप्रमाणे ८०० वरीलप्रमाणे .. | आठ रुपये. |
| ८०० वरीलप्रमाणे ९०० वरीलप्रमाणे .. | नऊ रुपये. |
| ९०० वरीलप्रमाणे १,००० वरीलप्रमाणे .. | दहा रुपये. |
| आणि १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा दर ५०० रुपयांबद्दल किंवा त्याच्या भागामागे. | पाच रुपये. |
| **सूट** | |
| [1]''भारतीय कॉपीराईट अधिनियम, १८४७' (१८४७ चा २०) कलम ५ खाली केलेल्या नोंदीद्वारे केलेले कॉपीराईटचे अभिहस्तांकन. | |
| **सहभागीदारी विलेख.**—भागीदारी (क्रमांक ४६) पहा. | |
| २४. **नक्कल किंवा उतारा.**—कोणत्याही लोक कार्यपराधिकाऱ्याने किंवा त्याच्या आदेशावरून खरी नक्कल किंवा उतारा म्हणून प्रमाणित केलेली आणि न्यायालय फीसंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याखाली शुल्क आकारण्यास पात्र नसलेली नक्कल किंवा उतारा— | |
| (एक) जर अस्सल प्रत शुल्क आकारण्यास पात्र नसेल किंवा त्यावर आकारणीयोग्य असलेले शुल्क एक रुपयाहून अधिक नसेल तर; | आठ आणे. |
| (दोन) अन्य कोणत्याही बाबतीत— | एक रुपया. |
| **सूट** | |
| (क) कोणत्याही लोक कार्यालयातील अभिलेखासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या लोक कार्यपरा-धिकाऱ्याने जी नक्कल तयार करणे किंवा सादर करणे कायद्या-द्वारे स्पष्टपणे आवश्यक केलेले आहे अशा कोणत्याही कागदाची नक्कल. | |
| [2][(ख)] जन्म, बाप्तिस्मा विधी, नामकरण विधी, समर्पण विधी, विवाह, [3][घटस्फोट], मृत्यू किंवा दफने यासंबंधीच्या कोणत्याही नोंदवहीची नक्कल किंवा ती मधील उतारा.] | |

१. 'भारतीय कॉपीराईट अधिनियम, १९१४' (१९१४ चा ३) यामधील संबद्ध उपबंध पहावे.
२. १९०६ चा अधिनियम ५, कलम ७ द्वारे खंड (ख) व (ग) ऐवजी दाखल केले.
३. १९१४ चा अधिनियम १०, कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे समाविष्ट केले.

| (१) | (२) |
|---|---|
| २५. **प्रतिलेख किंवा प्रतिलिपी.**—शुल्क आकारण्यास पात्र अशा ज्या संलेखाच्या संबंधात योग्य शुल्क भरलेले आहे अशा कोणत्याही संलेखाचा प्रतिलेख किंवा त्याची प्रतिलिपी,— | |
| (क्) मूळ संलेखावर जे शुल्क आकारणीयोग्य आहे ते शुल्क एक रुपयाहून अधिक नसेल तर; | मूळ संलेखावर प्रदेय असलेल्या शुल्का-एवढेच शुल्क. |
| (ख्) अन्य कोणत्याही बाबतीत .. .. | एक रुपया. |
| **सूट** | |
| एखाद्या लागवडदारास दिलेल्या कोणत्याही भाडेपट्ट्याच्या बाबतीत शुल्क भरण्यापासून सूट दिलेली असेल तेव्हा, अशा भाडेपट्ट्याचा प्रतिलेख. | |
| २६. **सीमाशुल्क बंधपत्र.**— | |
| (क्) १,००० रुपयांहून अधिक रक्कम नसेल त्याबाबतीत, .. | अशा रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क. |
| (ख्) अन्य कोणत्याही बाबतीत, .. .. | पाच रुपये. |
| [1][२७. **ऋणपत्र.**—ते विकाऊ रोखा असून (मग ते गहाण-ऋणपत्र असो वा नसो) पुढील प्रकारे हस्तांतरणीय असेल तेव्हा,— | |
| (क्) पृष्ठांकनाद्वारे किंवा स्वतंत्र हस्तांतरण संलेखाद्वारे— | |
| रक्कम किंवा मूल्य १० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; .. | [2][वीस नवे पैसे.] |
| १० रुपयांपेक्षा अधिक परंतु ५० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; .. | [3][चाळीस नवे पैसे.] |
| ५० वरीलप्रमाणे १०० वरीलप्रमाणे .. | [4][पंचाहत्तर नवे पैसे.] |
| १०० वरीलप्रमाणे २०० वरीलप्रमाणे .. | एक रुपया [5][पन्नास नवे पैसे]. |
| २०० वरीलप्रमाणे ३०० वरीलप्रमाणे .. | दोन रुपये [6][पंचवीस नवे पैसे]. |
| ३०० वरीलप्रमाणे ४०० वरीलप्रमाणे .. | तीन रुपये. |
| ४०० वरीलप्रमाणे ५०० वरीलप्रमाणे .. | तीन रुपये [4][पंचाहत्तर नवे पैसे]. |
| ५०० वरीलप्रमाणे ६०० वरीलप्रमाणे .. | चार रुपये [5][पन्नास नवे पैसे]. |
| ६०० वरीलप्रमाणे ७०० वरीलप्रमाणे .. | पाच रुपये [6][पंचवीस नवे पैसे]. |
| ७०० वरीलप्रमाणे ८०० वरीलप्रमाणे .. | सहा रुपये. |
| ८०० वरीलप्रमाणे ९०० वरीलप्रमाणे .. | सहा रुपये [4][पंचाहत्तर नवे पैसे]. |
| ९०० वरीलप्रमाणे १,००० वरीलप्रमाणे .. | सात रुपये [5][पन्नास नवे पैसे]. |
| आणि १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा दर ५०० रुपयांबद्दल किंवा त्याच्या भागामागे. | तीन रुपये [4][पंचाहत्तर नवे पैसे]. |
| (ख्) सुपूर्दगीद्वारे— | |

---

१. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ७ द्वारे मूळ अनुच्छेदाऐवजी दाखल केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "तीन आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "सहा आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "बारा आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "आठ आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "चार आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) |
|---|---|
| अशा ऋणपत्राच्या प्रतिफलाची रक्कम किंवा मूल्य त्यात दिल्याप्रमाणे ५० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर; | [3][पंच्याहत्तर नवे पैसे]. |
| ५० रुपयांपेक्षा अधिक परंतु १०० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, .. | एक रुपया [1][पन्नास नवे पैसे]. |
| १०० वरीलप्रमाणे २०० वरीलप्रमाणे .. | तीन रुपये. |
| २०० वरीलप्रमाणे ३०० वरीलप्रमाणे .. | चार रुपये [1][पन्नास नवे पैसे]. |
| ३०० वरीलप्रमाणे ४०० वरीलप्रमाणे .. | सहा रुपये. |
| ४०० वरीलप्रमाणे ५०० वरीलप्रमाणे .. | सात रुपये [1][पन्नास नवे पैसे]. |
| ५०० वरीलप्रमाणे ६०० वरीलप्रमाणे .. | नऊ रुपये. |
| ६०० वरीलप्रमाणे ७०० वरीलप्रमाणे .. | दहा रुपये [1][पन्नास नवे पैसे]. |
| ७०० वरीलप्रमाणे ८०० वरीलप्रमाणे .. | बारा रुपये. |
| ८०० वरीलप्रमाणे ९०० वरीलप्रमाणे .. | तेरा रुपये [1][पन्नास नवे पैसे]. |
| ९०० वरीलप्रमाणे १,००० वरीलप्रमाणे .. | पंधरा रुपये. |
| आणि १,००० रुपयांपेक्षा अधिक अशा दर ५०० रुपयांबद्दल किंवा त्याच्या भागामागे. | सात रुपये [1][पन्नास नवे पैसे]. |

**स्पष्टीकरण.**—"ऋणपत्र" या संज्ञेमध्ये त्यास जोडलेल्या कोणत्याही व्याजविषयक कुपनांचा समावेश होतो, परंतु शुल्क ठरविताना अशा कुपनांच्या रकमेचा समावेश केला जाणार नाही.

**सूट**

नियमित कंपनीने किंवा अन्य निगम-निकायाने नोंदलेल्या गहाणखताच्या शर्तीनुसार काढलेल्या व त्याखाली द्यावयाच्या ऋणपत्रांच्या पूर्ण रकमेबाबत रीतसर मुद्रांकित असलेल्या ज्या ऋणपत्राद्वारे, कर्जधारक कंपनी किंवा निकाय ऋणपत्रधारकांच्या लाभासाठी आपली संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा भाग विश्वस्ताच्या स्वाधीन करतात ते ऋणपत्र :

परंतु, अशा प्रकारे काढलेली ऋणपत्रे उक्त गहाणखताच्या शर्तीनुसार काढली आहेत असे व्यक्त केलेले असले पाहिजे].

**कोणताही न्यास जाहीर करणे.**—न्यास (क्रमांक ६४) पहा.

| | |
|---|---|
| २८. **मालाच्या बाबतीतील सुपूर्दगी आदेश.**—म्हणजे, ज्या संलेखामुळे त्यात नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा तिच्या अभिहस्तांकितींना किंवा त्या संलेखाच्या धारकास कोणत्याही गोदीत किंवा बंदरात अथवा जेथे भाडे किंवा किराया देऊन माल साठवला आहे किंवा ठेवला आहे अशा कोणत्याही वखारीत अथवा कोणत्याही मालधक्क्यावर पडून असलेला एखादा माल ताब्यात घेण्याचा हक्क मिळतो असा कोणताही संलेख अशा मालावरील मालकीहक्काची विक्री किंवा हस्तांतरण झाल्यावर अशा मालाच्या मालकाने किंवा त्याच्या वतीने स्वाक्षरित केलेला असून जेव्हा मालाची किंमत वीस रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा असा संलेख. | एक आणा. |

**हक्कलेखांचा निक्षेप.**— [2][हक्कलेखनिक्षेप, तारणनिक्षेप किंवा तारण यासंबंधीचा करारनामा (क्रमांक ६) पहा].

**भागीदारीचे विसर्जन.**—भागीदारी (क्रमांक ४६) पहा.

| | |
|---|---|
| २९. **घटस्फोट.**—त्यासंबंधीचा संलेख म्हणजे ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एखादी व्यक्ती आपल्या विवाहाचा विच्छेद करते असा संलेख. | एक रुपया. |

**विश्वासदेय.**—त्यासंबंधीचा संलेख. संव्यवस्था (क्र. ५८) पहा. ..

**प्रतिलिपी.**—प्रतिलेख (क्रमांक २५) पहा. ..

---

१. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "आठ आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे "समन्यायिक गहाणाच्या रूपातील करारनामा (क्र. ६) पहा" याऐवजी दाखल केले.

३. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "बारा आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) |
|---|---|
| ३०. कोणत्याही उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ता, वकील किंवा मुखत्यार म्हणून नोंद.— [1][ 'भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६' (१९२६ चा ३८) याखाली किंवा ] [2]''विधिव्यवसायी अधिनियम, १८८४' (१८८४ चा ९) याने लेटर्स पेटंटद्वारे न्यायालयास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून,— | |
| (क) अधिवक्ता किंवा वकील यांच्या बाबतीत .. | पाचशे रुपये. |
| (ख) मुखत्याराच्या बाबतीत .. .. | दोनशे पन्नास रुपये. |
| **सूट** | |
| अधिवक्ता, वकील किंवा मुखत्यार याची एखाद्या उच्च न्यायालयाच्या पटावर अगोदरच नोंद करण्यात आली असेल तर, त्याची कोणत्याही उच्च न्यायालयाच्या पटावर होणारी नोंद. | |
| [3]* * * | * * |
| ३१. मालमत्ता विनिमय.—त्यासंबंधीचा संलेख. .. | अशा संलेखात दिल्याप्रमाणे सर्वाधिक किंमतीच्या मालमत्तेच्या मूल्याएवढ्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| उतारा.—नक्कल (क्र. २४) पहा. .. .. | |
| ३२. अधिक प्रभार.—त्यासंबंधीचा संलेख म्हणजे, गहाण मालमत्तेवर अधिक प्रभार लादणारा कोणताही संलेख— | |
| (क) जेव्हा मूळ गहाण हे, अनुच्छेद क्रमांक ४०-खंड (क) मध्ये उल्लेखिलेल्या वर्गाचे (म्हणजे कब्जासहित) असेल तेव्हा; | अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराच्या रकमेइतक्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरण पत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| (ख) जेव्हा असे गहाण अनुच्छेद क्रमांक ४०-खंड (ख) मध्ये उल्लेखिलेल्या वर्गाचे (म्हणजे कब्जाविना) असेल तेव्हा,— | |
| (एक) जर अधिक प्रभाराचा संलेख निष्पादित करण्याच्या वेळी, अशा संलेखाखाली मालमत्तेचा कब्जा देण्यात आला असेल किंवा देण्याचे कबूल करण्यात आले असेल तर; | (मूळ गहाण व आधीच ठेवलेला कोणताही अधिक प्रभार धरून) प्रभाराच्या एकूण रकमेएवढ्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील शुल्काइतके व अधिक प्रभारावर आधीच भरलेले शुल्क. |
| (दोन) याप्रमाणे कब्जा दिलेला नसेल तर .. | अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराच्या रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काइतके शुल्क. |
| ३३. दान.—त्यासंबंधीचा संलेख—संव्यवस्थापत्र (क्र. ५८) किंवा मृत्युपत्र किंवा हस्तांतरण (क्र. ६२) सोडून अन्य. | अशा संलेखात दिल्याप्रमाणे मालमत्तेचे जे मूल्य असेल त्या मूल्याएवढ्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| भाडे करारनामा किंवा सेवा करारनामा.—करारनामा (क्र. ५) पहा. | |

१. १९२६ चा अधिनियम ३८, कलम १९ व अनुसूचीद्वारे समाविष्ट केले.
२. नंतरच्या काळात निरसित.
३. १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे "समन्यायिक गहाण" यासंबंधीची नोंद वगळली.

| (१) | (२) |
|---|---|
| ३४. हानिरक्षण बंधपत्र.— | तितक्याच रकमेच्या प्रतिभूती-बंधपत्रावरील (क्र. ५७) शुल्काइतके शुल्क. |
| देवघेवनामा.—तडजोडनामा (क्र. २२) पहा. | |
| विमा.—विमापत्र (क्र. ४७) पहा. | |
| ३५. भाडेपट्टा.—अवर भाडेपट्टा किंवा पोटभाडेपट्टा व भाड्याने किंवा पोटभाड्याने देण्यासंबंधीचा कोणताही करारनामा यासुद्धा,— | |
| (क) अशा प्रकारच्या भाडेपट्ट्याद्वारे भाडे निश्चित केले असेल आणि ते कोणतेही अधिमूल्य भरले किंवा सुपूर्द केले नसेल त्या बाबतीत,— | |
| (एक) भाडेपट्टा एक वर्षाहून कमी मुदतीकरिता असल्याचे दिसत असेल त्या बाबतीत; | अशा भाडेपट्ट्याखाली जे अधिमूल्य भरावे किंवा सुपूर्द करावे लागणार तितक्या संपूर्ण रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काइतके शुल्क. |
| (दोन) भाडेपट्टा एक वर्षाहून कमी नाही पण तीन वर्षांहून अधिक नाही इतक्या मुदतीकरिता असल्याचे दिसत असेल त्या बाबतीत; | राखून ठेवलेल्या सरासरी वार्षिक भाड्याची रक्कम किंवा मूल्य यांच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काइतके शुल्क. |
| (तीन) भाडेपट्टा तीन वर्षांहून अधिक मुदतीकरिता असल्याचे दिसत असेल त्या बाबतीत; | राखून ठेवलेल्या सरकारी वार्षिक भाड्याच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| (चार) भाडेपट्टा कोणत्याही निश्चित मुदतीकरिता असल्याचे दिसत नसेल त्या बाबतीत; | जर दहा वर्षेपर्यंत तो भाडेपट्टा चालू राहिला तर पहिल्या दहा वर्षांकरिता जितके सरासरी वार्षिक भाडे भरावे किंवा सुपूर्द करावे लागणार त्याच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| (पाच) भाडेपट्टा शाश्वत काळाकरिता असल्याचे दिसत असेल त्या बाबतीत; | भाडेपट्ट्याच्या पहिल्या पन्नास वर्षांकरता जितके भाडे भरावे किंवा सुपूर्द करावे लागणार त्याच्या संपूर्ण रकमेच्या एक-पंचमांशाइतक्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| (ख) भाडेपट्टा हा, नजराणा किंवा अधिमूल्य याबद्दल अथवा आगाऊ दिलेल्या पैशाबद्दल देण्यात येऊन भाडे राखून ठेवलेले नसेल त्या बाबतीत; | त्या भाडेपट्ट्यात दिल्याप्रमाणे अशा नजराण्याच्या किंवा अधिमूल्याच्या किंवा आगाऊ दिलेल्या पैशाच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| (ग) भाडेपट्टा हा, राखून ठेवलेल्या भाड्याव्यतिरिक्त नजराणा किंवा अधिमूल्य याबद्दल किंवा आगाऊ दिलेल्या पैशाबद्दल देण्यात आला असेल त्या बाबतीत; | जर कोणताही नजराणा किंवा अधिमूल्य किंवा आगाऊ दिलेला पैसा यांचा भरणा किंवा सुपूर्दगी केली नसती तर त्या भाडेपट्ट्याबर जे शुल्क प्रदेय झाले असते त्याव्यतिरिक्त, त्या भाडेपट्टयात दर्शवलेल्या नजराण्याच्या अधिमूल्याच्या किंवा आगाऊ दिलेल्या पैशाच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क : |

| (१) | (२) |
|---|---|
| (ग)—चालू. | परंतु, जेव्हा भाडेपट्टा करून देण्यासंबंधीच्या करारनाम्यावर भाडेपट्ट्यास आवश्यक असलेला यथामूल्य मुद्रांक लावलेला असेल व अशा करारास अनुसरून नंतर एखादा भाडेपट्टा करून देण्यात आला असेल तेव्हा, अशा कोणत्याही बाबतीत, भाडेपट्ट्यावरील शुल्क आठ आण्यांहून अधिक असणार नाही. |
| **सूट**<br>(क) एखाद्या लागवडदाराच्या बाबतीत आणि निश्चित अशी मुदत व्यक्त केलेली असून अशी मुदत एक वर्षाहून अधिक नसेल किंवा राखीव सरासरी वार्षिक भाडे शंभर रुपयांहून जास्त असेल तेव्हा, कसणूक करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणताही नजराणा किंवा अधिमूल्य भरल्याशिवाय किंवा सुपूर्द केल्याशिवाय निष्पादित केलेला भाडेपट्टा (खाद्य किंवा पेय पदार्थांच्या उत्पादनासाठी केलेला झाडांचा भाडेपट्टा धरून). | |
| [1] *    *    *    * | * |
| ३६. **शेअर-वाटपपत्र.**—कोणत्याही कंपनीतील किंवा नियोजित कंपनीतील शेअर्सच्या वाटणीसंबंधातील किंवा कोणत्याही कंपनीने किंवा नियोजित कंपनीने उभारावयाच्या कर्जाच्या संबंधातील शेअर-वाटपपत्र.<br>प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज (क्र. १९) देखील पहा. | [2][दोन आणे]. |
| ३७. **पतपत्र.**—म्हणजे, ज्या संलेखाद्वारे एखादी व्यक्ती जिच्या प्रीत्यर्थ तो संलेख केला त्या व्यक्तीला पतउधार देण्यास दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस प्राधिकृत करते असा कोणताही संलेख.<br>हमीपत्र.—करारनामा (क्र. ५) पहा. | [3][दोन रुपये]. |
| ३८. **अनुज्ञप्तिपत्र.**—म्हणजे, धनको आपल्या हक्कमागण्या विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत तहकूब ठेवतील व ऋणकोला स्वविवेकानुसार व्यवहार चालवण्यास मुभा देतील असा, ऋणको व त्याचे धनको यांच्या दरम्यान झालेला कोणताही करारनामा. | दहा रुपये. |
| ३९. **कंपनीचा संस्थापन समयलेख.**—(क) "भारतीय कंपनी अधिनियम, १८८२' (१८८२ चा ६) याच्या कलम ३७ खालील संस्थापन नियमावली सोबत जोडली असेल तेव्हा; | पंधरा रुपये. |
| (ख) याप्रमाणे ती सोबत जोडली नसेल तेव्हा .. | चाळीस रुपये. |
| **सूट**<br>नफ्याकरता स्थापन न केलेल्या व [4][' भारतीय कंपनी अधिनियम, १८८२' (१८८२ चा ६) याच्या कलम २६ खाली नोंदणी झालेल्या कोणत्याही अधिसंघाचा संस्थापन समयलेख. | |
| ४०. **गहाणखत.**—[5][हक्कलेखनिक्षेप, तारणनिक्षेप किंवा तारण यासंबंधीचा करारनामा (क्र. ६)], नौतारण बंधपत्र (क्र. १६), पिकाचे गहाणखत (क्र. ४१), नौभार बंधपत्र (क्र. ५६), किंवा प्रतिभूति-बंधपत्र (क्र. ५७) सोडून अन्य— | |

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे सूट (ख) वगळली.
२. १९२३ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "एक आणा" याऐवजी दाखल केले.
३. १९८५ चा अधिनियम ३२, कलम ५० (ख) द्वारे, "एक रुपया" याऐवजी दाखल केले.
४. कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) मधील संबद्ध उपबंध पहावयाचे.
५. १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे "गहाणाबाबतचा करारनामा (क्र. ६)." याऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| (क) जेव्हा अशा गहाणखतात समाविष्ट असलेल्या मालमत्तेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कब्जा गहाणकाराने दिला असेल किंवा देण्याचे कबूल केले असेल तेव्हा; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेएवढ्या प्रतिफलाबद्दल केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील (क्र. २३) शुल्काइतके शुल्क. |
| (ख) जेव्हा उपरोक्तप्रमाणे [१] * * * कब्जा दिलेला नसेल किंवा देण्याचे कबूल केले नसेल तेव्हा; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काइतके शुल्क. |
| **स्पष्टीकरण.**—जेव्हा गहाणकार हा गहाणधारकास गहाण मालमत्तेच्या किंवा तिच्या भागाच्या भाड्याची उगराणी करण्याकरिता मुखत्यारनामा देतो किंवा त्यांचा भाडेपट्टा देतो तेव्हा, त्याने त्या अनुच्छेदाच्या अर्थानुसार कब्जा दिला असे मानले जाईल. | |
| (ग) जेव्हा असे गहाणखत म्हणजे एखादी सांपार्श्विक किंवा सहाय्यकारी किंवा अतिरिक्त किंवा बदली प्रतिभूती असेल किंवा उपरोक्त प्रयोजनाकरिता दिलेल्या अधिक हमीच्या रूपाने असेल तेव्हा, प्रमुख किंवा प्राथमिक प्रतिभूती रीतसर मुद्रांकित असेल तर— | |
| १,००० रुपयांहून अधिक नसलेल्या प्रत्येक प्रतिभूत रकमेकरिता, आणि, | आठ आणे. |
| १,००० रुपयांहून अधिक असलेल्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता. | आठ आणे. |

**सूट**

(१) 'जमीन सुधार कर्जे अधिनियम, १८८३' (१८८३ चा १९) किंवा 'शेतकरी कर्जे अधिनियम, १८८४' (१८८४ चा १२) याअन्वये कर्जाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा कर्जाऊ रकमांच्या परतफेडीसाठी प्रतिभूती म्हणून करून दिलेले संलेख.

(२) विनिमयपत्रासोबत असणारे तारणगहाणपत्र.

[२] * * * * * *

| (१) | (२) |
|---|---|
| **४१. एखाद्या पिकाचे गहाणखत.**—एखाद्या पिकाच्या कोणत्याही गहाणावर दिलेल्या कर्जाची परतफेड प्रतिभूत करण्यासाठी केलेल्या कराराचा पुरावा असणारा कोणताही संलेख यासुद्धा—मग गहाणाच्या वेळी पीक अस्तित्वात असो वा नसो— | |
| (क) अशा कर्जाची परतफेड त्या संलेखाच्या दिनांकापासून तीन महिन्यांहून अधिक नसणाऱ्या मुदतीत करावयाची असेल तेव्हा— | |
| २०० रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा प्रतिभूत केलेल्या प्रत्येक रकमेकरिता; आणि | एक आणा. |
| २०० रुपयांहून अधिक अशा प्रतिभूत केलेल्या दर २०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता; | एक आणा. |
| (ख) जेव्हा अशा कर्जाची परतफेड त्या संलेखाच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा अधिक परंतु [३][अठरा महिन्यांहून] अधिक नसणाऱ्या मुदतीत करावयाची असेल तेव्हा— | |
| १०० रुपयांहून अधिक नसेल अशा प्रतिभूत केलेल्या प्रत्येक रकमेकरिता; आणि | [४][दोन आणे]. |
| १०० रुपयांहून अधिक अशा प्रतिभूत केलेल्या दर १०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता. | [४][दोन आणे]. |

१. १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे "निष्पादनाच्या वेळी" हे शब्द वगळले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे सूट (३) वगळली.
३. १९०६ चा अधिनियम ५, कलम ७ द्वारे "एक वर्ष" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला.
४ १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे "चार आणे" याऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| ४२. **लेखप्रमाणकाचा लेख.**—म्हणजे, लेखप्रमाणक आपली पदीय कर्तव्ये पार पाडीत असताना त्याने किंवा अन्य कोणतीही व्यक्ती लेखप्रमाणक म्हणून विधितः काम चालवत असताना तिने केलेला किंवा स्वाक्षरित केलेला व प्रतिसाक्षन (क्र. ५०) सोडून अन्य कोणताही संलेख, पृष्ठांकन, अधिटिप्पणी, साक्षांकन, प्रमाणपत्र किंवा नोंद. | एक रुपया. |
| विनिमयपत्राचे किंवा वचनचिठ्ठीचे प्रतिसाक्षन (क्र. ५०) देखील पहा. | |
| [१][४३. **टिप्पणी किंवा ज्ञापन.**—आपल्या प्रकर्त्याकरिता खरेदी किंवा विक्री केल्याचे कळवण्यासाठी अशा प्रकर्त्यास दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठवलेली टिप्पणी किंवा ज्ञापन— | |
| (क) वीस रुपयांहून अधिक मूल्य असलेल्या कोणत्याही मालाकरिता; | दोन आणे. |
| (ख) वीस रुपयांहून अधिक मूल्याचा कोणताही पुंजरोखा किंवा विकाऊ रोखा याकरिता. | दहा रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, पुंजरोख्याच्या किंवा रोख्याच्या मूल्याच्या दर १०,००० रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे एक आणा.] |
| ४४. **नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयीची अधिटिप्पणी.**—नौकाधिपतीचे अधिकथन (क्र. ५१) देखील पहा. | आठ आणे. |
| **पैसे देण्याचा आदेश.**—विनिमयपत्र (क्र. १३) पहा. | |
| ४५. **वाटणी.**—त्यासंबंधीचा संलेख [कलम २(१५) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे]. | मालमत्तेपैकी अलग अलग काढलेल्या हिश्श्याच्या किंवा हिश्श्यांच्या मूल्या इतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क.<br><br>टीप.—मालमत्तेच्या वाटण्या केल्यानंतर उरलेला सर्वांत मोठा हिस्सा हा (किंवा जर सारख्याच मूल्याचे दोन किंवा अधिक हिस्से असून ते अन्य हिश्श्यांपैकी कोणत्याही हिश्श्यापेक्षा लहान नसतील तर, अशा समान हिश्श्यांपैकी एक हिस्सा हा) ज्यापासून अन्य हिस्से अलग अलग काढण्यात आले आहेत असा हिस्सा असल्याचे मानण्यात येईल :<br><br>परंतु, नेहमी असे की—<br><br>(क) जेव्हा मालमत्तेच्या अलग अलग हिश्श्यांत वाटण्या करण्याबाबतचा एखादा करार समाविष्ट असलेला वाटणी संलेख निष्पादित केलेला असेल व अशा करारास अनुसरून वाटण्या झाल्या असतील तेव्हा, अशा वाटण्या घडवून आणणाऱ्या संलेखावर आकारणीयोग्य असेल त्या शुल्कातून पहिल्या संलेखावर दिलेल्या शुल्काची रक्कम कमी केली जाईल, पण ते आठ आण्यांहून कमी असणार नाही; |

१. १९१० चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे मूळ अनुच्छेद ४३ ऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| | (ख) जेव्हा महसुली जमाबंदी झाल्यानंतर जमीन तीस वर्षांहून जास्त नसणाऱ्या मुदतीकरता व निर्धारणाची पूर्ण रक्कम देऊन धारण केलेली असेल तेव्हा, त्याबाबतीत शुल्काच्या प्रयोजनार्थ तिचे मूल्य, वार्षिक महसुलाच्या पाच पटींहून जास्त होणार नाही अशा रीतीने परिगणना करून ठरवले जाईल; |
| | (ग) जेव्हा कोणत्याही महसूल प्राधिकरणाने किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाने वाटण्या घडवून आणण्याविषयी दिलेला अंतिम आदेश किंवा लवादाने दिलेला वाटण्यांचा निदेश देणारा एखादा निवाडा यावर वाटणी संलेखाकरता आवश्यक असलेला मुद्रांक लावलेला असेल, आणि अशा आदेशास किंवा निवाड्यास अनुसरून नंतर वाटणी संलेख निष्पादित करून देण्यात आला असेल तेव्हा, त्याबाबतीत अशा संलेखावरील शुल्क आठ आण्यांहून अधिक असणार नाही. |
| ४६. भागीदारी.—क.—त्यासंबंधीचा संलेख— | |
| (क) जेव्हा भागीदारीचे भांडवल ५०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | दोन रुपये आठ आणे. |
| (ख) अन्य कोणत्याही बाबतीत, .. .. | दहा रुपये. |
| ख-तिचे विसर्जन. .. .. | पाच रुपये. |
| [1][तारणनिक्षेप किंवा तारण.—हक्कलेखनिक्षेप, तारणनिक्षेप किंवा तारण यासंबंधीचा करारनामा (क्र. ६) पहा]. | |

४७. विमापत्र.—

| | एकाच प्रतीत काढलेले असेल तर | सप्रतिलेख काढलेले असेल तर प्रत्येक भागाकरता |
|---|---|---|
| [5][क.—सागरी विमा (कलम ७ पहा)— | | |
| (१) जलप्रवासासंबंधी किंवा तदर्थ— | | |
| (एक) अधिमूल्य किंवा प्रतिफल हे, [2]* * * विमापत्राद्वारे विमा उतरवलेल्या रकमेच्या एक-अष्टमांश टक्के इतक्या दराहून अधिक नसेल तर; | [3][दहा नवे पैसे]. | [4][पाच नवे पैसे]. |
| (दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, विमापत्राद्वारे विमा उतरवलेल्या रकमेपैकी [6][एक हजार पाचशे रुपये] इतक्या प्रत्येक पूर्ण रकमेच्या आणि [6][एक हजार पाचशे रुपयांच्या] कोणत्याही अपूर्णांशाच्याही बाबत; | [3][दहा नवे पैसे]. | [4][पाच नवे पैसे]. |

१. १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे समाविष्ट केले.
२. १९६१ चा अधिनियम १५, कलम १६ द्वारे "पंधरा नवे पैसे किंवा" हे शब्द वगळले.
३. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "एक आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "अर्धा आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
५. १९०६ चा अधिनियम ५, कलम ७ द्वारे मूळ विभाग क आणि ख याऐवजी दाखल केले.
६. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ आणि १ ली अनुसूची याद्वारे "एक हजार रुपये" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला.

शा. म. मु. एच ४४१४—४ (१,०७४—९-९४)

| (१) | (२) |
|---|---|
| (२) मुदतबंद— | |
| (तीन) विमापत्राद्वारे विमा उतरवलेल्या रकमेपैकी एक हजार रुपये इतक्या प्रत्येक पूर्ण रकमेच्या आणि एक हजार रुपयांच्या अपूर्णांशाच्या बाबत— | |
| सहा महिन्यांहून अधिक नाही अशा मुदतीकरिता विमा उतरावयाचा असेल तर; | [1][पंधरा नवे पैसे]. [2][दहा नवे पैसे]. |
| सहा महिन्यांहून अधिक परंतु बारा महिन्यांहून अधिक नाही अशा कोणत्याही मुदतीकरिता विमा उतरावयाचा असेल तर; | [3][पंचवीस नवे पैसे]. [1][पंधरा नवे पैसे]. |
| ख.—[5][माल, व्यापारी माल, आंगिक चीजवस्तू, पिके आणि अन्य मालमत्ता यांना हानी किंवा नुकसान यांपासून विमारक्षण देणारा या अनुच्छेदात इतरत्र अंतर्भूत न केलेला आगविमा आणि अन्य वर्गातील विमा.]— | |
| (१) मूळ विमापत्राबाबत— | |
| (एक) विमा उतरवलेली रक्कम ५,००० रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | [4][पन्नास नवे पैसे]. |
| (दोन) अन्य कोणत्याही बाबतीत .. .. | एक रुपया. |
| आणि | |
| (२) मूळ विमापत्राचे कोणतेही नवीकरण केल्यावर अधिमूल्याच्या कोणत्याही रकमेचा भरणा झाल्याबद्दल दिलेल्या प्रत्येक पावतीबाबत. | आकारणीयोग्य अशी कोणतीही रक्कम असल्यास (क्र. ५३ पहा) त्याशिवाय आणखी, मूळ विमापत्राच्या बाबतीत प्रदेय असलेल्या शुल्काच्या निम्मे शुल्क |
| ग.—अपघात व रुग्णता विमा— | |
| (क) रेल्वे अपघाताच्या बाबतीत, एकेरी प्रवासापुरताच बंध असलेला. | [2][दहा नवे पैसे]. |
| **सूट** | |
| कोणत्याही रेल्वेच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाने प्रवास करणाऱ्या उतारूस देण्यात आला असेल तेव्हा; | |
| (ख) अन्य कोणत्याही बाबतीत—एका अपघाताच्या किंवा आजाराच्या बाबतीत प्रदेय होईल अशी कमाल रक्कम १,००० रुपयांहून अधिक नसेल तर, आणि १,००० रुपयांहून अधिक असेल तर देखील दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता. | [1][पंधरा नवे पैसे]. [7][परंतु, अपघातामुळे होणाऱ्या मृत्यूबद्दलच्या विमापत्राच्या बाबतीत, प्रदेय वार्षिक अधिमूल्य जेव्हा दर १,००० रुपयांमागे [6][२.५०] रुपयांहून अधिक नसेल तेव्हा, अशा संलेखावरील शुल्क हे, त्या संलेखाखाली प्रदेय होईल त्या कमाल रकमेपैकी दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता [2][दहा नवे पैसे] एवढे होईल.] |

१. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "दोन आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "एक आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "चार आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "आठ आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
५. १९२३ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "आग-विमा" याऐवजी दाखल केले.
६. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "रु. २–८–०" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
७. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे समाविष्ट केले.

| (१) | (२) | |
|---|---|---|
| [1][गग.—विमाकाराने किंवा त्याच्या हाताखाली कामावर लावलेल्या कामगारांना अपघात झाल्यामुळे झालेले नुकसान भरून देण्याच्या दायित्वाबद्दल किंवा 'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' (१९२३ चा ८) याखाली भरपाई देण्याच्या दायित्वाबद्दल हानिरक्षण म्हणून विमा अधिमूल्याच्या रूपाने प्रदेय असलेल्या दर १०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता.] | [2][दहा नवे पैसे]. | |
| [3][घ.—या अनुच्छेदाच्या विभाग ङ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेल्या प्रतिविम्याखेरीज, ज्याकरिता विशेष उपबंध केलेला नाही असा आयुर्विमा [4][किंवा सामूहिक विमा किंवा अन्य विमा]— | एकाच प्रतीत उतरवला असेल तर | सप्रतिलेख उतरवला असेल तर, प्रत्येक भागाकरता |
| (एक) २५० रुपयांहून अधिक नसेल अशा विमा उतरलेल्या प्रत्येक रकमेकरिता; | [5][पंधरा नवे पैसे]. | [2][दहा नवे पैसे]. |
| (दोन) २५० रुपयांहून अधिक पण ५०० रुपयांहून अधिक नसेल अशा विमा उतरवलेल्या प्रत्येक रकमेकरिता; | [6][पंचवीस नवे पैसे]. | [5][पंधरा नवे पैसे]. |
| (तीन) ५०० रुपयांहून अधिक पण १,००० रुपयांहून अधिक नसेल अशा विमा उतरवलेल्या प्रत्येक रकमेकरिता आणि दर १,००० रुपयांकरिता किंवा १,००० रुपयांहून अधिक अशा त्याच्या भागाकरितादेखील. | [7][चाळीस नवे पैसे]. | [8][वीस नवे पैसे]. |
| | [9][टीप.—जर सामूहिक विमापत्राचे नवीकरण करण्यात आले किंवा अन्यथा त्यात आपरिवर्तन करण्यात आले व त्यामुळे विम्याची रक्कम ही, ज्यावर मुद्रांकशुल्क अगोदरच भरण्यात आले आहे अशा विमा रकमेपेक्षा अधिक झाली तर विम्याच्या याप्रमाणे अधिक झालेल्या रकमेकरिता योग्य मुद्रांक लावला पाहिजे.] | |
| **सूट** केंद्र शासनाच्या प्राधिकाराखाली काढलेली, डाक आयुर्विम्याबाबतच्या नियमानुसार डाक कार्यालय महासंचालकांनी मान्यता दिलेली आयुर्विमापत्रे.] | | |
| ङ.—ज्या विमा कंपनीने [10][या अनुच्छेदाचा विभाग क किंवा विभाग ख यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे विमापत्र] दिले असेल तिने त्याद्वारे विमारक्षित केलेल्या रकमेपैकी विवक्षित भागाचे मूळ विम्याच्या आधारावर जे प्रदान करावे लागणार त्याबाबत हानिरक्षण किंवा हमी म्हणून दुसऱ्या कंपनीकडे प्रतिविमा उतरवणे. | मूळ विमापत्राच्या बाबतीत प्रदेय असलेल्या शुल्काच्या एक-चतुर्थांश पण [2][दहा नवे पैसे] याहून कमी नाही किंवा एक रुपयाहून अधिक नाही एवढे शुल्क : | |

१. १९२५ चा अधिनियम १५, कलम २ द्वारे समाविष्ट केले.
२. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "एक आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
३. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे मूळच्या विभाग घ ऐवजी दाखल केले.
४. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ७ द्वारे "किंवा अन्य विमा" याऐवजी दाखल केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).
५. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "दोन आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
६. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "चार आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
७. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "सहा आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
८. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "तीन आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
९. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ७ द्वारे समाविष्ट केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).
१०. १९२३ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे "सागरी विमापत्र किंवा आग विमापत्र" याऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| ङ.—चालू | [1][परंतु, जर प्रदेय शुल्काची एकूण रक्कम ही पाच नवे पैशांच्या पटीत नसेल तर, ती एकूण रक्कम त्यापुढील पाच नया पैशांच्या पटीत पूर्णांकित करण्यात येईल.] |

**सर्वसाधारण सूट**

विमाचिठ्ठी किंवा विमापत्र देण्याचा वचनबंधनामा.—परंतु, या अधिनियमाद्वारे अशा विमापत्राकरिता विहित केलेला मुद्रांक अशा चिठ्ठीवर किंवा वचनबंधनाम्यावर लावलेला नसेल तर, त्याखाली कसलीही हक्कमागणी करता येणार नाही, त्याचप्रमाणे त्यात नमूद केलेल्या विमापत्राची सुपूर्दगी करण्यास भाग पाडण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनाकरिता तो उपलब्ध होणार नाही.

| | |
|---|---|
| ४८. मुखत्यारनामा.—[कलम २ (२१) यात व्याख्या केल्याप्रमाणे] असलेले, पण प्रतिपत्र (क्र. ५२) नव्हे— | |
| (क्) जेव्हा एकाच संव्यवहाराच्या संबंधात एका किंवा अधिक दस्तऐवजांची नोंदणी करण्याच्या एकमेव प्रयोजनासाठी अथवा असा एक किंवा अधिक दस्तऐवज निष्पादित केल्याचे कबूल करण्यासाठी केला असेल तेव्हा; | आठ आणे. |
| (ख्) जेव्हा 'इलाखा लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२' (१८८२ चा १५) याखालील दाव्यांमध्ये किंवा कार्यवाहीत आवश्यक असेल तेव्हा; | आठ आणे. |
| (ग्) जेव्हा त्यामुळे खंड (क्) मध्ये उल्लेखिलेल्या बाबीहून अन्य अशा एकाच संव्यवहारात एका किंवा अधिक व्यक्तींना काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | एक रुपया. |
| (घ्) जेव्हा त्यामुळे पाचापेक्षा अधिक नसतील इतक्या व्यक्तींना संयुक्तपणे व पृथकपणे एकापेक्षा अधिक संव्यवहारांत किंवा सरसहा काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | पाच रुपये. |
| (ङ्) जेव्हा त्यामुळे पाचापेक्षा अधिक पण दहापेक्षा अधिक नसतील एवढ्या व्यक्तींना संयुक्तपणे आणि पृथकपणे एकापेक्षा अधिक संव्यवहारांत किंवा सरसहा काम चालवण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | दहा रुपये. |
| (च्) जेव्हा तो प्रतिफलार्थ देण्यात आलेला असून त्यामुळे कोणतीही स्थावर मालमत्ता विकण्याचा प्राधिकार मुखत्यारास मिळत असेल तेव्हा; | अभिहस्तांतरणपत्रावर (क्र. २३) प्रतिफलाच्या रकमेकरिता जितके शुल्क बसते तितके शुल्क. |
| (छ्) अन्य कोणत्याही बाबतीत .. .. | प्रत्येक प्राधिकृत व्यक्तीमागे एक रुपया. टीप.—"नोंदणी" या संज्ञेत 'भारतीय नोंदणी अधिनियम, १८७७'[२](१८७७ चा ३) याखालील नोंदणीसंबंधीच्या प्रत्येक आनुषंगिक क्रियेचा समावेश आहे. |

**स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदाच्या प्रयोजनासाठी, एकाच पेढीशी संबंधित असलेल्या एकाहून अधिक व्यक्ती या एकच व्यक्ती असल्याचे मानले जाईल.

| | |
|---|---|
| [३][४९. वचनचिठ्ठी.—[कलम २(२२) द्वारे व्याख्या केल्याप्रमाणे]— | |
| (क्) मागणीप्रदेय असेल तर— | |
| (एक) जेव्हा रक्कम किंवा मूल्य हे २५० रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | [४][दहा नवे पैसे]. |

१. १९६१ चा अधिनियम १४, कलम १६ द्वारे समाविष्ट केले.
२. 'भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८' (१९०८ चा १६) यामधील संबद्ध उपबंध पहा.
३. १९२३ चा अधिनियम ४३, कलम २ द्वारे मूळ अनुच्छेदाऐवजी दाखल केले.
४. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "एक आणा" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

अनुसूची १ ली—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| (दोन) जेव्हा रक्कम किंवा मूल्य हे २५० रुपयांहून अधिक परंतु १,००० रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | [1][पंधरा नवे पैसे.] |
| (तीन) अन्य कोणत्याही बाबतीत, .. .. | [2][पंचवीस नवे पैसे.] |
| (ख्) मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असेल तर— | मागणीवरून नव्हे तर अन्यथा प्रदेय असलेल्या व तेवढ्याच रकमेकरिता काढलेल्या विनिमयपत्रावरील (क्र. १३) शुल्काच्या निम्मे शुल्क.] |
| ५०. **विपत्र किंवा वचनचिठ्ठी याबाबतचे प्रतिसाक्षन.**—म्हणजे, लेखप्रमाणकाने किंवा विधितः लेखप्रमाणक म्हणून काम करणाऱ्या अन्य व्यक्तीने विनिमयपत्राचा किंवा वचनचिठ्ठीचा अवमान झाल्याचे साक्षांकित करण्यासाठी केलेले कोणतेही लेखी अधिकथन. | एक रुपया. |
| ५१. **नौकाधिपतीचे अधिकथन.**—म्हणजे, तोटयाचे समायोजन किंवा हानिसरासरींची परिगणना करण्याच्या दृष्टीने जहाजाच्या सफरीच्या तपशिलासंबंधी नौकाधिपतीने लिहून दिलेले कोणतेही अधिकथन, आणि जहाजावर माल न चढवण्याबद्दल किंवा जहाजातून तो न उतरवण्याबद्दल जहाज भाडयाने घेणाऱ्या किंवा मालप्रेषिती व्यक्तींविरुद्ध त्याने लेखी केलेले अधिकथन लेखप्रमाणकाने किंवा विधितः लेखप्रमाणक म्हणून काम करणाऱ्या अन्य व्यक्तीने साक्षांकित किंवा प्रमाणित केले असेल तेव्हा, असे प्रत्येक अधिकथन. | एक रुपया. |
| नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयीची अधिटिप्पणी (क्र. ४४) देखील पहा. | |
| ५२. **प्रतिपत्र.**—कोणत्याही व्यक्तीस, जिल्हा किंवा स्थानिक मंडळ किंवा नगरपालिका आयुक्तांचा निकाय यांच्या सदस्यांच्या कोणत्याही एका निवडणुकीत अथवा (क्) जिची पुंजी किंवा निधी शेअर्समध्ये विभागलेला असून तो हस्तांतरणीय असेल अशा निगमित कंपनीच्या किंवा अन्य निगम-निकायाच्या सदस्यांच्या, (ख्) स्थानिक प्राधिकरणाच्या, किंवा (ग्) कोणत्याही संस्थेचे मालक, सदस्य किंवा तिच्या निधीचे अंशदाते यांच्या कोणत्याही एका सभेमध्ये मतदान करण्याची शक्ती प्रदान करणारे. | [3][तीस नवे पैसे]. |
| ५३. **पावती.**—[कलम २(२३) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे] ज्याची रक्कम किंवा मूल्य वीस रुपयांहून अधिक असेल अशा कोणत्याही पैशाबद्दल किंवा अन्य मालमत्तेबद्दल दिलेली पावती. | [4][वीस नवे पैसे]. |

**सूट**

पावती—

(क्) रीतसर मुद्रांकित केलेला [5][कोणताही संलेख किंवा कलम ३ च्या परंतुकाखाली सूट देण्यात आलेला कोणताही संलेख]

---

१. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "दोन आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "चार आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे "पंधरा नवे पैसे" याऐवजी दाखल केले (१ जून १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे "दहा नवे पैसे" याऐवजी दाखल केले (१ जून १९७६ रोजी व तेव्हापासून).

५. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ आणि १ ली अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| (शासनाच्या वतीने निष्पादित केलेले कोणतेही संलेख) [१][किंवा कोणताही मागणी-प्रदेय धनादेश किंवा विनिमयपत्र] यामध्ये व्यक्त केलेले प्रतिफल-धन मिळाल्याची अथवा त्याद्वारे प्रतिभूत केलेले मुद्दल-धन, व्याज किंवा वार्षिकी किंवा अन्य नियतकालिक रक्कम मिळाल्याची पोच देणारी व त्यावर पृष्ठांकित केलेली किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेली; | |
| (ख) प्रतिफलाविना पैशाचा कोणताही भरणा झाल्याबद्दलची; | |
| (ग) जिच्यावर सरकारी महसूल निर्धारित झाला आहे त्या जमिनीबाबत किंवा ([२][१ नोव्हेंबर, १९५६ च्या निकटपूर्वी [३][मद्रास, मुंबई व आंध्र ही राज्ये जशी अस्तित्वात होती तशा] त्या राज्यांत]) इनाम जमिनीबाबत लागवडदाराने भाड्याचा कोणताही भरणा केल्याबद्दलची; | |
| (घ) वेतन किंवा भत्ते यांबद्दल [४][[५][भारतीय] भूसेना, [६][नौसेना] व वायुसेना] यांमधील अराजादिष्ट अधिकारी [६][किंवा पेटी ऑफिसर] [७][भूसैनिक, [६][नौसैनिक] किंवा वायुसैनिक] यांनी त्या नात्याने कामगिरी बजावत असताना दिलेली किंवा सशस्त्र पोलीस शिपायांनी दिलेली; | |
| (ङ) पावतीत निविष्ट असलेली रक्कम ज्या व्यक्तीच्या वेतनातून किंवा भत्त्यातून अभिहस्तांकित करण्यात आली असेल ती व्यक्ती [८][उक्त सेनांपैकी कोणत्याही] सेवेतील अराजादिष्ट अधिकारी [६][किंवा पेटी ऑफिसर], [९][भूसैनिक, [६][नौसैनिक] किंवा वायुसैनिक] असून त्या नात्याने कामगिरी बजावत असेल त्या बाबतीत, कुटुंबप्रमाणपत्रे धारण करणाऱ्यांनी दिलेली; | |
| (च) असे अराजादिष्ट अधिकारी [६][किंवा पेटी ऑफिसर], [९][भूसैनिक, [६][नौसैनिक], किंवा वायुसैनिक] म्हणून आपल्या सेवेबद्दल निवृत्तिवेतने किंवा भत्ते मिळणाऱ्या आणि अन्य कोणत्याही नात्याने शासनाच्या नोकरीत नसलेल्या अशा व्यक्तींनी अशी निवृत्तिवेतने किंवा भत्ते यांबद्दल दिलेली; | |
| (छ) आपण उगराणी केलेला जमीन-महसूल किंवा कर यांबद्दल मुखियाने किंवा लंबरदाराने दिलेली; | |
| (ज) खात्यावर टाकण्यासाठी कोणत्याही बँकव्यवसायीच्या हाती ठेवलेल्या पैशांबद्दल किंवा पैशांच्या रोख्यांबद्दल दिलेली : | |
| परंतु, ते ज्या व्यक्तीच्या खात्यावर टाकावयाचे तिच्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत किंवा तिच्या हातून ते मिळाले असे व्यक्त केलेले नसावे : | |

१. १९२८ चा अधिनियम १८, कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे समाविष्ट केले.
२. विधि अनुकूलन आदेश (क्रमांक २), १९५६ द्वारे समाविष्ट केले.
३. आंध्र (संघराज्य सूचीतील विषयांसंबंधी विधि अनुकूलन) आदेश, १९५४ द्वारे 'फोर्ट सेंट जॉर्ज व मुंबई या इलाख्यांमध्ये' याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९६३ रोजी व तेव्हापासून).
४. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ आणि १ ली अनुसूची याद्वारे "हर मॅजेस्टीची सेना किंवा हर मॅजेस्टीची भारतीय सेना" याऐवजी दाखल केले.
५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजेस्टीची" याऐवजी दाखल केले.
६. १९३४ चा अधिनियम ३५, कलम २ आणि अनुसूचीद्वारे दाखल केले.
७. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ आणि १ ली अनुसूची याद्वारे "किंवा सैनिक" याऐवजी दाखल केले.
८. वरील अधिनियमाच्या कलम २ आणि १ ली अनुसूची याद्वारे "उक्त दोन सेनांपैकी कोणत्याही" याऐवजी दाखल केले.
९. वरील अधिनियमाच्या कलम २ आणि १ ली अनुसूची याद्वारे "किंवा सैनिक" याऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| परंतु असेही की, कोणतीही निगमित कंपनी किंवा अन्य निगम-निकाय अथवा अशी प्रस्तावित किंवा नियोजित कंपनी किंवा निकाय यांतील शेअरच्या वाटपपत्राकरिता किंवा त्याबद्दल दिलेल्या किंवा जमा केलेल्या रकमेच्या अथवा त्याच्या कोणत्याही स्क्रिपवरील किंवा शेअरवरील मागणी-रक्कम मिळाल्याबद्दलच्या अथवा विकाऊ रोखा असलेल्या ऋणपत्राबाबतच्या पावतीला किंवा अभिस्वीकृतीला ही सूट लागू होणार नाही. | |
| [1][विमापत्र [क्र. ४७ख(२)] देखील पहा.] | |
| **५४. गहाण मालमत्तेचे प्रत्यंतरणपत्र.**—(क्) मालमत्ता ज्या प्रतिफलार्थ गहाण ठेवली होती त्याची रक्कम १,००० रुपयांहून अधिक नसेल तर; | प्रत्यंतरणपत्रात नमूद केलेल्या प्रतिफला-इतक्या रकमेकरता अभिहस्तांतरण-पत्रावर (क्र. २३) जितके शुल्क बसत असेल तितके शुल्क. |
| (ख्) अन्य कोणत्याही बाबतीत .. .. | दहा रुपये. |
| **५५. हक्कसोडपत्र.**—म्हणजे, ज्या संलेखाद्वारे [2][(ज्याकरिता कलम २३क मध्ये उपबंध केला आहे असे हक्कसोडपत्र नव्हे)] एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीविरुद्ध किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट मालमत्तेमरील हक्कमागणी सोडून देते असा कोणताही संलेख— | |
| (क्) जर हक्कमागणीची रक्कम किंवा मूल्य १,००० रुपयांहून अधिक नसेल तर; | हक्कसोडपत्रात लिहिलेल्या रकमेच्या किंवा मूल्याच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क. |
| (ख) अन्य कोणत्याही बाबतीत; .. .. | पाच रुपये. |
| **५६. नौभार बंधपत्र.**—म्हणजे, जहाजावर चढविलेल्या किंवा चढवावयाच्या मालावरील कर्ज प्रतिभूत करणारा आणि त्या कर्जाची परतफेड नियत बंदरावर माल पोहोचण्यावर अवलंबून ठेवणारा कोणताही संलेख. | प्रतिभूत केलेल्या कर्जाच्या रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्का-एवढे शुल्क. |
| **कोणताही न्यास किंवा संव्यवस्था याचे प्रत्याहरण.**— | |
| संव्यवस्था (क्र. ५८); न्यास (क्र. ६४) पहा. | |
| **५७. प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत.**—एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याबद्दल प्रतिभूती म्हणून, अथवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा अन्य मालमत्ता यांचा हिशेब देण्याकरिता निष्पादित केलेले अथवा एखाद्या कराराच्या रीतसर पालनाची हमी म्हणून एखाद्या जामीनदाराने निष्पादित करून दिलेले— | |
| (क्) जेव्हा प्रतिभूत केलेली रक्कम १,००० रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रा-वरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क. |
| (ख्) अन्य कोणत्याही बाबतीत. .. .. | पाच रुपये. |
| **सूट** | |
| बंधपत्र किंवा अन्य संलेख जेव्हा— | |
| (क्) 'बंगाल जलसिंचन अधिनियम, १८७६' (१८७६ चा बंगाल अधिनियम ३) कलम ९९ अनुसार केलेल्या नियमां-खाली नामनिर्देशित केलेल्या मुखियांनी, त्या अधिनियमा-खालील आपली कर्तव्ये योग्यरीत्या पार पाडण्यासाठी; | |
| (ख्) एखाद्या धर्मार्थ दवाखान्याला किंवा रुग्णालयाला किंवा सार्वजनिक उपयुक्ततेच्या अन्य कोणत्याही उद्दिष्टासाठी देण्यात येणाऱ्या खाजगी अंशदानांपासून येणारे स्थानिक उत्पन्न दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही व्यक्तीने; | |

१. १९०६ चा अधिनियम ५, कलम ७ द्वारे समाविष्ट केले.

२. १९०४ चा अधिनियम १५, कलम ८ द्वारे समाविष्ट केले.

| (१) | (२) |
|---|---|
| (ग्) 'मुंबई जलसिंचन अधिनियम, १८७९' (१८७९ चा मुंबई अधिनियम ५) याच्या कलम ७० खाली [1][राज्य शासनाने] केलेल्या नियमांपैकी क्र. ३क खाली; | |
| (घ्) 'जमीन सुधार कर्जे अधिनियम, १८८३' (१८८३ चा १९) किंवा 'शेतकरी कर्जे अधिनियम, १८८४' (१८८४ चा १२) याखाली कर्जाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा कर्जाऊ रकमांच्या परतफेडीबद्दलची प्रतिभूती म्हणून; | |
| (४) एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याबद्दल किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा अन्य मालमत्ता यांचा योग्य हिशेब देण्याबद्दल प्रतिभूती म्हणून [2][ [3][शासकीय]] अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी, | |
| निष्पादित केला असेल तेव्हा. | |
| ५८. संव्यवस्था—क.—त्यासंबंधीचा संलेख (विधवादेय विलेख धरून). | संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या अशा संव्यवस्थापत्रात नमूद केलेल्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क :<br>परंतु, संव्यवस्था करण्याबद्दलच्या करारपत्रावर संव्यवस्था-संलेखासाठी आवश्यक असणारा मुद्रांक लावलेला असून, त्या करारपत्रास अनुसरून नंतर संव्यवस्था-संलेख निष्पादित करण्यात आला असेल तर, अशा संलेखावरील शुल्क आठ आण्यांहून अधिक असणार नाही. |
| **सूट**<br>(क्) मुसलमानांमधील विवाहाच्या वेळी निष्पादित करून दिलेला मेहेरसंबंधीचा विलेख.<br>[4]* * * * * | |
| ख.—तिचे प्रत्याहरण .. .. | संव्यवस्था रद्द करण्याबद्दलच्या संलेखात दिल्याप्रमाणे संबंधित मालमत्तेच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क,—पण हे शुल्क दहा रुपयांहून अधिक असणार नाही. |
| न्यास (क्र. ६४) देखील पहा. | |
| ५९. शेअर-अधिपत्र.—[5]'भारतीय कंपनी अधिनियम, १८८२' (१८८२ चा ६) याखाली वाहकास दिलेली. | अधिपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या शेअर्सच्या नाममात्र रकमेइतक्या प्रतिफलाकरता अभिहस्तांतरणपत्रावर (क्र. २३) प्रदेय असलेल्या शुल्काच्या [6][दीडपट] शुल्क. |
| **सूट**<br>त्या शुल्काबद्दल तोड म्हणून पुढील रक्कम मुद्रांक शुल्क समाहारकाकडे भरल्यावरच केवळ जे अंमलात यावयाचे असे, [5][भारतीय कंपनी अधिनियम, १८८२' (१८८२ चा ६)—कलम ३०] याच्या उपबंधांस अनुसरून एखाद्या कंपनीने काढलेले शेअर अधिपत्र— | |

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर ऑफ बॉम्बे इन कौंसिल" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख दाखल केला.
२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "सरकारच्या" याऐवजी दाखल केले.
३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "काउनच्या" याऐवजी दाखल केले.
४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे सूट (ख) वगळली.
५. 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) यामधील संबद्ध उपबंध पहा.
६. १९१० चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे "तीन-चतुर्थांश" याऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
| --- | --- |
| (क्) कंपनीच्या संपूर्ण अभिदत्त भांडवलाच्या ¹[दीड] टक्का, किंवा | |
| (ख्) ज्या कंपनीने उक्त शुल्क किंवा तोडीची रक्कम पूर्णपणे चुकती केलेली असेल तिने जर त्यानंतर, आपल्या अभिदत्त भांडवलाच्या जोडीला आणखी शेअर्स विक्रीस काढले तर अशा जास्तीच्या भांडवलाच्या ¹[दीड] टक्का; | |
| **स्क्रिप.**—प्रमाणपत्र (क्र. १९) पहा. | |
| ६०. **नौवहन आदेश.**—कोणत्याही जहाजावरून माल वाहून नेण्यासाठी किंवा वाहून नेण्यासंबंधी काढलेला. | एक आणा. |
| ६१. **भाडेपट्टयाचा प्रत्यर्पणलेख.**— | |
| (क्) तो भाडेपट्टा जे शुल्क आकारण्यास पात्र असेल ते शुल्क पाच रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | असा भाडेपट्टा जेवढे शुल्क आकारण्यास पात्र असेल तेवढे शुल्क. |
| (ख्) अन्य कोणत्याही बाबतीत, .. .. | पाच रुपये. |
| **सूट** | |
| अशा भाडेपट्टयास शुल्कापासून सूट मिळालेली असेल तेव्हा, त्या भाडेपट्टयाचा प्रत्यर्पण लेख. | |
| ६२. **हस्तांतरण.**—(प्रतिफलासह किंवा त्याविना)— | |
| ²[(क्) एखाद्या निगमित कंपनीतील किंवा अन्य निगम-निकायातील शेअर्सचे; | शेअरच्या मूल्यांपैकी दर शंभर रुपयांमागे किंवा त्यांच्या भागामागे ³[पंचाहत्तर पैसे]. |
| (ख्) कलम ८ द्वारे ज्यांच्याकरता उपबंध करण्यात आलेला आहे अशी ऋणपत्रे धरीजकरून विकाऊ रोखे असलेल्या ऋणपत्रांचे—मग असे ऋणपत्र शुल्क आकारण्यास पात्र असो वा नसो; | ऋणपत्राच्या दर्शनी रकमेइतक्या प्रतिफलाबद्दल अभिहस्तांतरणपत्रावर (क्र. २३) प्रदेय असलेल्या शुल्काच्या ⁵[निम्मे] शुल्क. |
| (ग्) बंधपत्र, गहाणखत किंवा विमापत्र याद्वारे प्रतिभूत केलेल्या हितसंबंधाचे— | |
| (एक) जर अशा बंधपत्रावरील, गहाणखतावरील किंवा विमापत्रावरील शुल्क पाच रुपयांहून अधिक नसेल तर; | असे बंधपत्र, गहाणपत्र किंवा विमापत्र यावर आकारणीयोग्य असलेले शुल्क. |
| (दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, .. .. | पाच रुपये. |
| (घ्) '⁴महाप्रशासकाचा अधिनियम, १८७४'' (१८७४ चा २) कलम ३१ खालील कोणत्याही मालमत्तेचे; | दहा रुपये. |
| (ङ्) एका विश्वस्ताने दुसऱ्या विश्वस्ताकडे किंवा विश्वस्ताने हिताधिकाऱ्याकडे कोणत्याही न्यास मालमत्तेचे प्रतिफलाविना केलेले. | पाच रुपये किंवा या अनुच्छेदाच्या खंड (क्) ते (ग्) याखाली आकारणीयोग्य असेल अशी त्याहून कमी रक्कम. |
| **सूट** | |
| (क्) विनिमयपत्राची, धनादेशाची किंवा वचनचिठ्ठीची; | |
| (ख्) भरणपत्र, सुपूर्दगी आदेश, मालाचे अधिपत्र, किंवा मालावरील हक्कासंबंधीचा इतर वाणिज्यिक दस्तऐवज यांची; | |
| (ग्) विमापत्राची; | |
| (घ्) केंद्र शासनाच्या रोख्यांची; | |
| पृष्ठांकनाद्वारे हस्तांतरणे. | |
| कलम ८ देखील पहा. | |

१. १९९० चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे "तीन-चतुर्थांश" याऐवजी दाखल केले.
२. १९५५ चा अधिनियम ४३, कलम ७ द्वारे मूळ खंडाऐवजी दाखल केले (१ एप्रिल १९५६ रोजी व तेव्हापासून).
३. १९५८ चा अधिनियम १९, कलम १३ द्वारे "बारा आणे" याऐवजी दाखल केले (१ ऑक्टोबर १९५८ रोजी व तेव्हापासून).
४. 'महाप्रशासकाचा अधिनियम, १९१३' (१९१३ चा ३) याचे संबद्ध उपबंध पहावे.
५. १९९० चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे "एक-चतुर्थांश" याऐवजी दाखल केले.

| (१) | (२) |
|---|---|
| ६३. **भाडेपट्ट्याचे हस्तांतरण.**—पोटभाडेपट्ट्याद्वारे नव्हे तर अभिहस्तांकनाद्वारे केलेले | हस्तांतरणाच्या प्रतिफलाच्या रकमेइतक्या प्रतिफलाकरिता अभिहस्तांतरणपत्रावर (क्र. २३) जे शुल्क बसत असेल ते शुल्क. |
| **सूट** | |
| शुल्क देण्यापासून सूट मिळालेल्या कोणत्याही भाडेपट्ट्याचे हस्तांतरण. | |
| ६४. **न्यास.**—क.—न्यासबंधीची घोषणा—कोणत्याही मालमत्तेच्या किंवा मालमत्तेसंबंधीच्या न्यासाची घोषणा मृत्युपत्राहून अन्य अशा कोणत्याही संलेखाद्वारे केलेली. | संलेखात नमूद केल्याप्रमाणे संबंधित मालमत्तेच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (क्र. १५) शुल्काएवढे शुल्क,—पण ते पंधरा रुपयांहून अधिक असणार नाही. |
| ख.—त्याचे प्रत्याहरण—कोणत्याही मालमत्तेचा किंवा मालमत्तेसंबंधीचा न्यास मृत्युपत्राहून अन्य कोणत्याही संलेखाद्वारे रद्द करणे. | संलेखात नमूद केल्याप्रमाणे संबंधित मालमत्तेच्या मूल्याइतक्या किंवा रकमेइतक्या रकमेच्या बंधपत्रावर (क्र. १५) जेवढे शुल्क बसते तेवढे शुल्क,—पण ते दहा रुपयांहून अधिक असणार नाही. |
| संव्यवस्था (क्र. ५८) देखील पहा. | |
| **मूल्यांकन.**—मूल्यन (क्र. ८) पहा. | |
| **वकील.**—वकील म्हणून नोंद (क्र. ३०) पहा. | |
| ६५. **मालाचे अधिपत्र.**—म्हणजे, ज्या संलेखामुळे त्यात नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा किंवा तिच्या अभिहस्तांकितीचा किंवा तो संलेख धारण करणाऱ्या व्यक्तीचा कोणत्याही गोदीत किंवा बखारीत किंवा मालधक्क्यावर पडून असलेल्या एखाद्या मालावरील हक्क सिद्ध होत असेल असा आणि अशा तऱ्हेचा माल ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेत असेल अशा व्यक्तीने किंवा त्या व्यक्तीच्या वतीने स्वाक्षरित किंवा प्रमाणित केलेला असा कोणताही संलेख. | चार आणे. |

अनुसूची २ री :—[अधिनियमिती निरसित]. निरसन व विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०) कलम ३ व २ री अनुसूची याद्वारे निरसित.

# THE INDIAN STAMP ACT, 1899

# भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acknowledge | पोच देणे | [S. 2(23) (*a*)] |
| acknowledgement | (१) पोच | [S. 2(23) (d)] |
| | (२) अभिस्वीकृति | [Sch. I-1] |
| adjudication | अभिनिर्णय | [S. 31-m.n.] |
| ad valorem duty | यथामूल्य शुल्क | [S. 20(1)] |
| affix adhesive stamp | चिकट मुद्रांक लावणे | [S. 12(1)(*a*)] |
| aggregate amount | एकवट रक्कम | [S. 5] |
| allowance | सवलत | [S. 51-m.n.] |
| appraisement | मूल्यन | [Sch. I-8] |
| apprenticeship deed | शिकाऊ उमेदवारी विलेख | [Sch. I-9] |
| articles of association | संस्थापन नियमावली | [Sch. I-10] |
| articles of clerkship | व्यवसाय उमेदवारी करार | [Sch. I-11] |
| association | अधिसंघ | [Sch. I-10-exemption] |
| authority to adopt | दत्तक अनुज्ञापत्र | [Sch. I-11] |
| average price | सरासरी किंमत | [S. 22] |
| banker | बँकव्यवसायी | [S. 2(1)] |
| bill of exchange | विनिमयपत्र | [S. 2(2)] |
| bill of exchange payable on demand | मागणीप्रदेय विनिमयपत्र | [S. 2(3)] |
| bill of lading | भरणपत्र | [S. 2(4)] |
| bond | बंधपत्र | [S. 2(5)] |
| bottomry bond | नौतारण बंधपत्र | [S. 29(a)] |
| by accident | अभावितपणे | [S. 41-m.n.] |
| cancel a stamp | मुद्रांक रद्द करणे | [S. 19-proviso-(b)] |
| chargeable | (१) (of instrument) आकारणीपात्र | [S. 2(6)] |
| | (२) (of duty) आकारणीयोग्य | [S. 3(c)-proviso-(1)] |
| chargeable with duty | शुल्क आकारण्यास पात्र | [S. 3-m.n.] |
| charter-party | नौभाटक लेख | [Sch. I-20] |
| cheque | धनादेश | [S. 2(7)] |
| Collector | जिल्हाधिकारी | [S. 2(9)] |
| contract for sea-insurance | सागरी विम्याची संविदा | [S. 2(20)-last para.] |
| contrivance or device | क्लृप्ती किंवा हिकमत | [S. 68(c)] |
| conveyance | अभिहस्तांतरणपत्र | [S. 2(10)] |
| counterpart | प्रतिलेख | [S. 2(16)(b)] |
| cover | विमारक्षित करणे | [S. 2(19A)] |
| cultivate | लागवड करणे | [S. 2(16)(b)] |
| customs bond | सीमाशुल्क बंधपत्र | [S. 29(a)] |
| debentures or securities | ऋणपत्रे किंवा रोखे | [S. 8(1)] |
| demand | देणे | [S. 2(23)(c)] |
| denote | दर्शविणे | [S. 16] |
| draw upon one for a sum | —कडे रकमेची मागणी करणे | [S. 2(2)] |
| duly stamped | रीतसर मुद्रांकित | [S. 2(11)] |
| duplicate | प्रतिलिपी | [S. 6-proviso] |
| duty chargeable | आकारणीयोग्य शुल्क | [S. 3(c)-proviso-(1)] |
| embossed | उठावरेखित | [S. 2(13)(b)] |
| employ | योजना करणे | [S. 4(1)] |

इंग्रजी-मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| engage | बांधून घेणे | [S. 2(19)(a)] |
| engagement | (१) वचनबंधन | [S. 2(17)] |
| | (२) वचनबंधनामा | [Sch. I-47-Gen. exempt.] |
| engraved | कोरलेला | [S. 2(13)(6)] |
| fine | नजराणा | [Sch. I-35(b)] |
| for or upon a voyage | जलप्रवासासंबंधी किंवा तदर्थ | [S. 7(4)] |
| freight | वाहणावळ | [S. 2(20)(a)] |
| furniture | साजसामान | [S. 2(20)(*a*)] |
| give credit to | पतउधार देणें | [S. 2(3)(*c*)] |
| goods | माल | [S. 2(20)(a)] |
| Hereditary Offices Act | वंशपरंपरा पद अधिनियम | [Sch. I-12-exemption] |
| hypothecation | तारणगहाण | [Sch. I-40-exemption] |
| impounding of instrument | संलेख अवरुद्ध करून ठेवणे | [S. 33-m.n.] |
| impressed stamp | छापील मुद्रांक | [S. 2(13)] |
| inadmissible in evidence | पुराव्यात अस्वीकार्य | [S. 35-m.n.] |
| inadvertently | अनवधानाने | [S. 49(d)(8)] |
| indeterminate | अनिश्चित | [S. 26-m.n.] |
| inspectorship deed | देखरेखनामा | [Sch. I-34] |
| instrument of partition | वाटणी संलेख | [S. 2(15)] |
| inter vivos | जीवित व्यक्तींच्या दरम्यान | [S. 2(10)] |
| issue of bonds | बंधपत्रे पुरःसृत करणे | [S. 8(1)] |
| label | लेबल | [S. 2(13)(*a*)] |
| lease | भाडेपट्टा | [S. 2(16)] |
| letter of allotment of shares | शेअर वाटपपत्र | [Sch. I-36] |
| letter of credit | पतपत्र | [S. 2(3)(*c*)] |
| letter of licence | अनुज्ञप्तिपत्र | [Sch. I-38] |
| life policy | आयुर्विमापत्र | [S. 2(19)(b)] |
| make allowance for | —बाबत सवलत देणे | [S. 49] |
| making out | करून देणे | [S. 66-m.n.] |
| marketable security | विकाऊ रोखा | [S. 2(16A)] |
| mate's receipt | उप तांडेलाची पावती | [S. 2(4)] |
| memorandum | (१) यादी | [Sch. I-5] |
| | (२) ज्ञापन | [Sch. I-43] |
| | (३) समयलेख | [Sch. I-39] |
| memorandum of agreement | करारयादी | [Sch. I-5] |
| memorandum of association | संस्थापन समयलेख | [Sch. I-39] |
| merchandise | व्यापारी माल | [S. 2(20)(*a*)] |
| misused stamp | चुकीने वापरलेला मुद्रांक | [S. 52-m.n.] |
| mortgage-deed | गहाणखत | [S. 2(17)] |
| notarial act | लेखप्रमाणकाचा लेख | [S. 11(d)] |
| note | (१) चिठ्ठी | [S. 2(22)-para. 2] |
| | (२) अधिटिप्पणी | [Sch. I-44] |
| | (३) टिप्पणी | [Sch. I-43] |
| occupy | भोगवटा करणे | [S. 2(16](b)] |
| omission or error | भूलचूक | [S. 49(c)(3)] |
| outstanding loan | कर्ज | [S. 8(2)] |
| pawn or pledge | तारणनिक्षेप किंवा तारण | [S. 29(a)] |
| pay or deliver rent | भाडे करणे किंवा सुपूर्द करणे | [S. 2(16)(*b*)] |
| personal insurance | व्यक्तिगत विमा | [S. 2(19)(b)] |
| policy of group insurance | सामूहिक विमापत्र | [S. 2(19)(*a*)] |

इंग्रजी-मराठी शब्दसूची—समाप्त

| | | |
|---|---|---|
| policy of insurance | विमापत्र | [S. 2(19)] |
| policy of sea-insurance | सागरी विमापत्र | [S. 2(20)] |
| power | मुखत्यारी | [Sch. I-7] |
| power-of-attorney | मुखत्यारनामा | [S. 2(21)] |
| premium | अधिमूल्य | [S. 2(19)(*a*)] |
| promissory note | वचनचिठ्ठी | [S. 2(22)] |
| protest by the master of a ship | नौकाधिपतीचे अधिकथन | [Sch. I-51] |
| protest of bill or note | विपत्र किंवा वचनचिठ्ठी याबाबतचे प्रतिसाक्षन | [Sch. I-50] |
| proxy | प्रतिपत्र | [Sch. I-52] |
| public office | लोक कार्यपद | [S. 33(1)] |
| rate of exchange | विनिमय दर | [S. 22] |
| receipt | पावती | [S. 2(23)] |
| receive or take credit for | स्वीकारणे किंवा आपल्या जमेस घेणे | [S. 66] |
| reconveyance | प्रत्यंतरणपत्र | [Sch. I-54] |
| reduce, remit or compound duties | शुल्के कमी करणे, माफ करणे किंवा त्यांबाबत तडजोड करणे | [S. 9-m.n.] |
| refugee relief stamp | शरणार्थी सहाय्यता मुद्रांक | [S. 54B-m.n.] |
| release | हक्कसोडपत्र | [Sch. I-55] |
| remit | माफ करणे | [S. 8(2)-proviso] |
| respondentia bond | नौभार बंधपत्र | [Sch. I-56] |
| royalty | स्वामित्व | [S. 26-proviso] |
| scrip | स्क्रिप | [Sch. I-59(b)] |
| sea-policy | सागरी विमापत्र | [S. 2(20)] |
| settlement | संव्यवस्था | [S. 2(24)] |
| share-warrant | शेअर अधिपत्र | [S. 62(2)] |
| shipping order | नौभरण आदेश | [Sch. I-60] |
| soldier | सैनिक | [S. 2(25)] |
| spolied stamp | खराब झालेला मुद्रांक | [S. 49-m.n.] |
| stock | पुंजरोखा | [S. 21] |
| stock market | रोखे बाजार | [S. 2(16 A)] |
| tackle | सरंजाम | [S. 2(20)(*a*)] |
| through bill of lading | थेट भरणपत्र | [S. 2(4)] |
| tolls | टोलहक्क | [S. 2(4)] |
| total amount | एकूण रक्कम | [S. 8(1)] |
| transit | (१) मार्गक्रमण | [S. 2(20)(*b*)] |
| | (२) मार्गक्रम | [S. 2(20)(*b*)] |
| undesignedly | अहेतुकपणे | [S. 49(*d*)(8)] |
| unstamped | अमुद्रांकित | [S. 34-m.n.] |
| warrant of goods | माल अधिपत्र | [Sch. I-65] |
| writing | लिखाण | [S. 2(23)] |

# THE INDIAN STAMP ACT, 1899

## भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९

## मराठी—इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिटिप्पणी | note | [Sch. I-44] |
| अधिमूल्य | premium | [S. 2(19)(*a*)] |
| अधिसंघ | association | [Sch. I-10] |
| अनवधानाने | inadvertently | [S. 49(*d*)(8)] |
| अनिश्चित | indeterminate | [S. 26-m.n.] |
| अनुज्ञप्तिपत्र | letter of licence | [Sch. I-38) |
| अभावितपणे | by accident | [S. 41-m.n.] |
| अभिनिर्णय | adjudication | [S. 30-m.n.] |
| अभिहस्तांतरणपत्र | conveyance | [S. 2(10)] |
| अमुद्रांकित | unstamped | [S. 34-m.n.] |
| अहेतुकपणे | undesignedly | [S. 49(*d*)(8)] |
| आकारणीपात्र | chargeable | [S. 2(6)] |
| आकारणीयोग्य | chargeable | [S. 3(*c*)-proviso-(1)] |
| आकारणीयोग्य शुल्क | duty chargeable | [S. 3(*c*)-proviso-(1)] |
| आयुर्विमापत्र | life-policy | [S. 2(19)(*b*)] |
| उठावरेखित | embossed | [S. 2(13)(*b*)] |
| उप तांडेलाची पावती | mate's receipt | [S. 2(4)] |
| ऋणपत्रे किंवा रोखे | debentures or securities | [S. 8(1)] |
| एकवट रक्कम | aggregate amount | [S. 5] |
| एकूण रक्कम | total amount | [S. 8(1)] |
| —कडे रकमेची मागणी करणे | draw upon one for a sum | [S. 2(2)] |
| करून देणे | making out | [S. 66-m.n.] |
| क्लृप्ती किंवा हिकमत | contrivance or device | [S. 68(*c*)] |
| कोरलेला | engraved | [S. 2(13)(*b*)] |
| खराब झालेला मुद्रांक | spolied stamp | [S. 49-m.n.] |
| गहाणखत | mortgage deed | [S. 2(17)] |
| चिकट मुद्रांक लावणे | affix adhesive stamp | [S. 12(1)(*a*)] |
| चिठ्ठी | note | [S. 2(22)-para. 2] |
| चुकीने वापरलेला मुद्रांक | misused stamp | [S. 52-m.n.] |
| छापील मुद्रांक | impressed stamp | [S. 2(13)] |
| जलप्रवाससंबंधी किंवा तदर्थ | for or upon a voyage | [S. 7(4)] |
| जिल्हाधिकारी | Collector | [S. 2(9)] |
| जीवित व्यक्तींच्या दरम्यान | inter vivos | [S. 2(10)] |
| टिप्पणी | note | [Sch. I-43] |
| टोलहक्क | tolls | [S. 2(16)(*c*)] |
| तारणगहाण | hypothecation | [Sch. I-40-exemption] |
| तारणनिक्षेप किंवा तारण | pawn or pledge | [S. 29(*a*)] |
| थकलेले कर्ज | outstanding loan | [S. 8(2)] |
| थेट भरणपत्र | through bill of lading | [S. 2(4)] |
| दत्तक अनुज्ञापत्र | authority to adopt | [Sch. I-11] |
| दर्शविणे | denote | [S. 26] |
| देखरेखनामा | inspectorship deed | [Sch. I-34] |

| | | |
|---|---|---|
| देणे | demand | [S. 2(23)(*c*)] |
| धनादेश | cheque | [S. 2(7)] |
| नजराणा | fine | [Sch. I-35(*b*)] |
| नौकाधिपतीचे अधिकथन | protest by the master of a ship | [Sch. I-51] |
| नौतारण बंधपत्र | bottomry bond | [S. 29(*a*)] |
| नौभरण आदेश | shipping order | [Sch. I-60] |
| नौभाटक लेख | charter-party | [Sch. I-20] |
| नौभार बंधपत्र | respondentia bond | [Sch. I-50] |
| पतउधार देणे | give credit to | [S. 2(3)(*c*)] |
| पतपत्र | letter of credit | [S. 2(3)(*c*)] |
| पावती | receipt | [S. 2(23)] |
| पुंजरोखा | stock | [S. 21] |
| पुराव्यात अस्वीकार्य | inadmissible in evidence | [S. 35-m.n.] |
| प्रत्यंतरणपत्र | reconveyance | [Sch. I-54] |
| पोच | acknowledgement | [S. 2(23)(*d*)] |
| पोच देणे | acknowledge | [S. 2(23;(*a*)] |
| प्रतिपत्र | proxy | [Sch. I-52] |
| प्रतिलिपी | duplicate | [S. 6-proviso] |
| प्रतिलेख | counterpart | [S. 2(16)(*b*)] |
| —बाबत सवलत देणे | make allowance for | [S. 49] |
| बंधपत्र | bond | [S. 2(5)] |
| बंधपत्रे पुरःसृत करणे | issue of bonds | [S. 8(1)] |
| बँकव्यवसायी | banker | [S. 2(1)] |
| बांधून देणे | engage | [S. 2(19)(*a*)] |
| भरणपत्र | bill of lading | [S. 2(4)] |
| भाडेपट्टा | lease | [S. 2(16)] |
| भाडे भरणे किंवा सुपूर्द करणे | pay or deliver rent | [S. 2(16)(*b*)] |
| भूलचूक | omission or error | [S. 49(*c*)(3)] |
| भोगवटा करणे | occupy | [S. 2(16)(*b*)] |
| मागणीप्रदेय विनिमयपत्र | bill of exchange payable on demand. | [S. 2(3)] |
| माफ करणे | remit | [S. 8(2)-proviso] |
| मार्गक्रम | transit | [S. 2(20)(*b*)] |
| मार्गक्रमण | transit | [S. 2(20)(*b*)] |
| माल | goods | [S. 2(20)(*a*)] |
| माल अधिपत्र | warrant of goods | [Sch. I-65] |
| मुखत्यारनामा | power of attorney | [S. 2(21)] |
| मुखत्यारी | power | [Sch. I-7] |
| मुद्रांक रद्द करणे | cancel a stamp | [S. 19-proviso] |
| मूल्यन | appraisement | [Sch. I-8] |
| यथामूल्य | ad valorem duty | [S. 20(1)] |
| यादी | memorandum | [Sch. I-5] |
| योजना करणे | employ | [S. 4(1)] |
| रीतसर मुद्रांकित | duly stamped | [S. 2(11)] |
| रोखे बाजार | stock market | [S. 2(16*A*)] |
| लागवड करणे | cultivate | [S. 2(16)(*b*)] |
| लिखाण | writing | [S. 2(23)] |
| लेख प्रमाणकाचा लेख | notarial act | [S. 10(*d*)] |

## मराठी-इंग्रजी शब्दसूची—समाप्त

| | | |
|---|---|---|
| लेबल | label | [S. 2(13)(*a*)] |
| लोक कार्यपद | public office | [S. 33(1)] |
| लोक पदाधिकारी | public officer | [S. 35] |
| वंशपरंपरा पद अधिनियम | Hereditary Offices Act | [Sch. I-12--exemption] |
| वचनचिठ्ठी | promissory note | [S. 2(22)] |
| वचनबंधन | engagement | [S. 2(17)] |
| वचनबंधनामा | engagement | [Sch. I-47-Gen. exempt.] |
| वाटणी संलेख | instrument of partition | [S. 2(15)] |
| वाहणावळ | freight | [S. 2(20)(*a*)] |
| विकाऊ रोखा | marketable security | [S. 2(16*A*)] |
| विनिमय दर | rate of exchange | [S. 22] |
| विनिमयपत्र | bill of exchange | [S. 2(2)] |
| विपत्र किंवा वचनचिठ्ठी याबाबतचे प्रतिसाक्षन. | protest of bill or note | [Sch. I-50] |
| विमापत्र | policy of insurance | [S. 2(19)] |
| विमारक्षित करणे | cover | [S. 2(19*A*)] |
| व्यक्तिगत विमा | personal insurance | [S. 2(19)(*b*)] |
| व्यवसाय उमेदवारी करार | articles of clerkship | [Sch. I-11] |
| व्यापारी माल | merchandise | [S. 2(20)(*a*)] |
| शरणार्थी सहायता मुद्रांक | refugee relief stamp | [S. 54B-m.n.] |
| शिकाऊ उमेदवारी विलेख | apprenticeship deed | [Sch. I-9] |
| शुल्क आकारण्यास पात्र | chargeable with duty | [S. 3-m.n.] |
| शुल्के कमी करणे, माफ करणे किंवा त्यांबाबत तडजोड करणे. | reduce, remit or compound duties. | [S. 9-m.n.] |
| शेअर-अधिपत्र | share warrant | [S. 2(62)2] |
| शेअर-वाटपपत्र | letter of allotment of shares | [Sch. I-36] |
| संलेख अवरुद्ध करून ठेवणे | impounding of instrument | [S. 33-m.n.] |
| संव्यवस्था | settlement | [S. 2(24)] |
| संस्थापन नियमावली | articles of association | [Sch. I-10] |
| संस्थापन समयलेख | memorandum of association | [Sch. I-39] |
| समयलेख | memorandum | [Sch. I-39] |
| सरंजाम | tackle | [S. 2(20)(*a*)] |
| सरासरी किंमत | average price | [S. 22] |
| सवलत | allowance | [S. 51-m.n.] |
| सागरी विमापत्र | (1) policy of sea-insurance | [S. 2(20)] |
| | (2) sea-policy | [S. 2(20)] |
| सागरी विम्याची संविदा | contract for sea-insurance | [S. 2(20)] |
| साजसामान | furniture | [S. 2(20)(*a*)] |
| सामूहिक विमापत्र | policy of group insurance | [S. (2)(19)*A*] |
| सीमाशुल्क बंधपत्र | customs bond | [S. 29(*a*)] |
| सैनिक | soldier | [S. 2(25)] |
| स्क्रिप | scrip | [Sch. I-59(*b*)] |
| स्वामित्व | royalty | [S. 26-proviso] |
| स्वीकारणे किंवा आपल्या जमेस घेणे | receive or take credit for | [S. 66] |
| हक्कसोडपत्र | release | [Sch. I-55] |
| ज्ञापन | memorandum | [Sch. I-43] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई